सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
Solapur Tarun Bharat
छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर | शनिवार, दि. २३ मे २०२६ | वर्ष – ४ थे | अंक ३९ | पाने : ८ | किंमत रु. ६/- | dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## कृत्रिम बुद्धिमत्ता क्षेत्रात महाराष्ट्र आघाडीवर; 'मुंबई टेक वीक'ची देवेंद्र फडणवीस यांच्याकडून घोषणा

तभा वृत्तसेवा

मुंबई : कृत्रिम बुद्धिमत्ता हे भविष्यातील परिवर्तनाचे सर्वात प्रभावी माध्यम आहे. जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात -ख स्वीकारण्याची आवश्यकता आहे. मुंबई टेक वीकसारख्या उपक्रमांमुळे -ख मधील संधी युवकांपर्यंत पोहोचतील आणि महाराष्ट्र देशातील -ख नवोन्मेषाचे अग्रगण्य केंद्र बनेल, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज मुंबई टेक वीक (MTW) २०२६ ची घोषणा सह्याद्री अतिथिगृहात केली, त्यावेळी ते बोलत होते. टेक एंटरप्रेन्योर्स असोसिएशन ऑफ मुंबई (टीम ) तर्फे महाराष्ट्र शासनाच्या सहकार्याने, आयडीएफसी बँक आणि मेटा यांच्या संयुक्त सहकार्याने आयोजित हा कार्यक्रम दि २९ आणि ३० मे रोजी जिओ वर्ल्ड कन्व्हेन्शन सेंटर येथे होणार आहे. इंडिया : आय इन एक्शन या थीमअंतर्गत आयोजित मुंबई टेक वीक २०२६ मध्ये विविध क्षेत्रांतील एआयच्या प्रत्यक्ष वापराचे सादरीकरण होणार असून मेटा , एंथ्रॉपिक , ओपेनाई , गूगल क्लाउड आणि नेसा यांसारख्या कंपन्यांचा सहभाग असेल.यावेळी मुंबई टेक वीक लोगोचे अनावरण करण्यात आले. मुख्यमंत्री



फडणवीस म्हणाले की, शासन ए आय चा विविध विभागांमध्ये वापर करत आहे,-ख च्या माध्यमातून प्रशासन अधिक सक्षम आणि परिणामकारक होत आहे. शासन या परिवर्तनात सर्वात मोठा भागधारक म्हणून सक्रिय भूमिका बजावत आहे.मुंबई टेक वीकसारख्या व्यासपीठांमुळे -ख संदर्भातील अनुभव लोकांपर्यंत अधिक व्यापक पातळीवर पोहोचतील, असा विश्र्वास व्यक्त करत त्यांनी या कार्यक्रमात शासनाच्या -ख उपक्रमांचे अनुभवात्मक सादरीकरण करण्याची सूचनाही केली.टीम च्या वाढत्या विस्ताराचे कौतुक करत मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, अधिकाधिक तरुण आणि तंत्रज्ञान क्षेत्रातील व्यावसायिक या उपक्रमाशी जोडले जात आहेत, ही सकारात्मक बाब आहे. महाराष्ट्र शासन क्षेत्रातील नवोन्मेष आणि उद्योगवृद्धीसाठी सदैव तुमच्या पाठीशी उभे आहे. गेल्या वर्षापेक्षा अधिक भव्य आणि प्रभावी मुंबई टेक वीक आयोजित करूया आणि महाराष्ट्रातील युवकांना -ख क्षेत्रातील नव्या संधींशी जोडून त्यांना जागतिक पातळीवरील संधी उपलब्ध असेल.मुंबई टेक वीक (MTW बाबत टीम चे सह-अध्यक्ष आणि गव्हर्निंग कौन्सिल सदस्य हर्ष जैन म्हणाले, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे सहकार्य आणि मुंबई टेक वीकच्या संकल्पनेवरील त्यांच्या विश्वासाबद्दल आम्ही आभारी आहोत. टेक एंटरप्रेन्योर्स असोसिएशन ऑफ मुंबई (टीम ) तर्फे महाराष्ट्र शासनाच्या सहकार्याने, आयडीएफसी बँक यांच्या सहकार्याने आणि मेटा यांच्या संयुक्त सहकार्याने आयोजित हा कार्यक्रम २९ आणि ३० मे रोजी जिओ वर्ल्ड कन्व्हेन्शन सेंटर येथे पार पडणार आहे. इंडिया : आय इन एक्शन या थीमअंतर्गत आयोजित मुंबई टेक वीक २०२६ मध्ये विविध क्षेत्रांतील ऐ आय च्या प्रत्यक्ष वापराचे सादरीकरण होणार असून मेटा , एंथ्रॉपिक , ओपेनाई , गूगल क्लाउड आणि नेसा यांसारख्या कंपन्यांचा सहभाग असेल. एमटीयू २०२६ हे केवळ चर्चांपुरते मर्यादित न राहता उद्योगांचे स्वरूप कसे बदलत आहे आणि प्रत्यक्ष आर्थिक संधी कशा निर्माण करत आहे, हे दाखवण्यासाठी तयार करण्यात आले आहे आणि म्हणूनच मुंबई हे त्यासाठी सर्वोत्तम ठिकाण आहे. महाराष्ट्र शासन आमचा भागीदार असल्याने, मुंबई आणि महाराष्ट्राच्या -ख अर्थव्यवस्थेसाठी हा एक ऐतिहासिक टप्पा ठरवण्याची संधी आम्हाला मिळाली आहे.हर्ष जैन म्हणाले की, ए आय सादरीकरणांव्यतिरिक्त मुंबई टेक वीकमध्ये मध्ये ऐ एक्सीलेंस अवॉर्ड्स २०२६, अर्ली स्टेज स्टार्टअप शोकेस , ऐ आय आधारित जॉब फेयर यांचेही आयोजन करण्यात येणार आहे. या जॉब फेअरमध्ये २५ हून अधिक कंपन्या भरती प्रक्रिया राबवणार असून ३०,००० हून अधिक उमेदवारांसाठी २५० पेक्षा अधिक रोजगार संधी उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. याशिवाय मास्टरक्लासेस आणि स्टोरीज अनप्लग्ड सत्रांचे आयोजन होईल. मुख्य कार्यक्रमाच्या पूर्वतयारीसाठी मुंबईभर १४ सॅटेलाईट इव्हेंट्स आयोजित करून परिसंस्थेतील अधिक व्यापक सहभाग सुनिश्र्चित करण्यात येणार आहे.

## अमेरिका - इराण युद्ध पुन्हा भडकण्याचे चिन्ह ?



वृत्तसंस्था

वॉशिंग्टन : अमेरिका आणि इराण यांच्यामधील अणुप्रकल्प आणि होर्मुझच्या सामुद्रधुनीच्या मार्गाचा वाद आता अधिकच पेटला आहे. इराणजवळ असलेला युरेनियमचा साठा आणि होर्मुझच्या समुद्री मार्गावरील टोल वसुलीच्या मुद्द्यावरून दोन्ही देश त्यांच्या भूमिकेवर ठाम आहेत. अशातच अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी युरेनियम साठ्याबाबत इराणला थेट आणि कडक शब्दांत इशारा दिला आहे. यावर इराण काय प्रत्युत्तर देतो आणि आता दोन्ही देशांतील संघर्ष अधिक वाढणार का याकडे संपूर्ण जगाचे लक्ष लागले आहे.

इराणने गोळा केलेला युरेनियमचा साठा हा अण्वस्त्रांच्या निर्मितीसाठीच असल्याचा ठाम विश्र्वास अमेरिकेने व्यक्त केला आहे. दुसरीकडे, इराणने मात्र हा साठा केवळ ऊर्जा निर्मितीसाठी साठवला असल्याचा दावा केला आहे. ट्रम्प यांनी यावर आक्रमक भूमिका घेत म्हटले की, 'आम्हाला तो साठा नको, पण आम्ही तो इराणलाही मिळवू देणार नाही. तो ताब्यात घेतल्यानतंर आम्ही तो कदाचित नष्ट करू. ' दरम्यान, इराणचे सर्वोच्च नेते, 'मोजताबा खामेनी' यांनी हा युरेनियमचा साठा कोणत्याही परिस्थितीत देशाबाहेर पाठवला जाणार नाही, असा थेट आदेश जारी केला आहे.

तसेच होर्मुझच्या सागरी मार्गावरून जाणाऱ्या जहाजांवर टोल किंवा शुल्क आकारणे, इराणच्या या निर्णयावर डोनाल्ड ट्रम्प यांनी तीव्र आक्षेप घेतला आहे. 'आम्हाला हा सागरी मार्ग पूर्णपणे खुला आणि मुक्त हवा आहे. तो एक आंतरराष्ट्रीय जलमार्ग आहे, तिथे कोणताही टोल चालणार नाही.' असे ट्रम्प यांचे म्हणणे आहे. अमेरिका आणि इराण यांच्यातील वाढत्या तणावामुळे आतंरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाच्या किमतीत खूप चढ-उतार होत असून, जागतिक बाजारपेठेतही चिंता निर्माण झाली आहे.

## एसबीआय पाच दिवस बंद ?

नवी दिल्ली : देशातील सर्वात मोठी सरकारी बँक असलेल्या स्टेट बँक ऑफ इंडिया च्या ग्राहकांसाठी महत्त्वाची सूचना समोर आली आहे. उद्यापासून म्हणजेच शनिवार २३ मे ते २८ मे २०२६ दरम्यान एसबीआयच्या शाखा सलग अनेक दिवस बंद राहण्याची शक्यता असल्याने ग्राहकांनी आपली अत्यावश्यक बँकिंग कामे आजच पूर्ण करून घ्यावीत, असे आवाहन करण्यात आले आहे. वीकेंडच्या सुट्ट्या, प्रस्तावित कर्मचारी संप आणि बकरी ईदच्या सुट्ट्यांमुळे शाखांमधील नियमित व्यवहारांवर मोठा परिणाम होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. त्यामुळे चेक क्लिअरिंग, रोकड व्यवहार, पासबुक अपडेट आणि शाखेशी संबंधित इतर कामांमध्ये अडथळे निर्माण होऊ शकतात.

## रायगडचा पायरी मार्ग बंद

रायगड : रायगड किल्ल्यावर ३० आणि ३१ मे रोजी पायी जाण्याचा मार्ग पूर्णपणे बंद राहणार आहे. शिवराज्याभिषेक सोहळ्यापूर्वी उंच कड्यांवरील सैल दगड हटवण्यासाठी विशेष मोहीम राबवण्यात येणार असून, सुरक्षेच्या कारणास्तव प्रशासनाने हा निर्णय घेतला आहे. मात्र, रोपवे सेवा सुरू राहणार आहे.

## लातुरात तिसऱ्या डॉक्टरची चौकशी

लातूर : NEET पेपरफुटी प्रकरणात उइखने लातूरमध्ये चौकशीची व्याप्ती वाढवली असून आज औसा रोड परिसरातील तिसऱ्या डॉक्टरची चौकशी सुरू केली आहे. यापूर्वी डॉ. मनोज शिरुरे आणि डॉ. प्रवीण कुलकर्णी यांच्या घरी झाडाझडती करून महत्त्वाची कागदपत्रे व डेटा ताब्यात घेण्यात आला होता. आणखी काही डॉक्टरांची चौकशी होण्याची शक्यता आहे.

## अभिजित दीपके यांना जीवे मारण्याची धमकी

नवी दिल्ली : 'कॉकरोच जनता पार्टी'चे संस्थापक अभिजित दीपके यांनी सोशल मीडियावर जीवे मारण्याची धमकी मिळाल्याचा दावा केला आहे. अमेरिकेतही मारून टाकू असा इशारा देणारे स्क्रीनशॉट त्यांनी शेअर केले असून, या घटनेनंतर सोशल मीडियावर मोठी खळबळ उडाली आहे.

## गायीला राष्ट्रीय पशु करा

मुंबई : राज्यात गोवंश हत्याबंदीचा कायदा पारित झाल्यापासून राज्यात त्याची कडक अंमलबजावणी सुरू आहे. दरवर्षीप्रमाणे यंदाही बकरी सणानिमित्त शेतकऱ्यांकडून बकरे खरेदीविक्री सुरु आहे. मात्र, सोलापूर शहरात आधुनिक कत्तलखाने नसल्यानं बकरे कापण्याची मोठी अडचण निर्माण होते. त्यासाठी घरीच बकरे कापण्याची परवानगी द्यावी, यासाठी मुस्लिम बांधवांनी जिल्हाधिकारी कार्तिकेयन यांची भेट घेत बैठक घेतली. माध्यमांना प्रतिक्रिया देताना जमीयत ए उलेमा हिंद संघटनेचे पदाधिकारी हसीब नदाफ यांनी मागणी केली, गायीला राष्ट्रीय पशु घोषित करा, जेणेकरून गायीचे महत्व वाढेल, गाईच्या संवर्धनासाठी, शेतकऱ्यांना भरपूर अनुदान मिळेल. गाईच्या दुधाला भाव मिळेल, अशी मागणी मुस्लिम समाजाने केली आहे.

## हेरगिरीचा पर्दाफाश

चंदीगड : पंजाब पोलिसांनी एका कथित प्रकरणाचा पर्दाफाश केला आहे. पठाणकोटमध्ये भारतीय लष्कर आणि निमलष्करी दलांच्या हालचालींशी संबंधित संवेदनशील माहिती पाकिस्तानातील हस्तकांना पुरवल्याच्या आरोपाखाली एका व्यक्तीला ताब्यात घेण्यात आलं आहे. अटक करण्यात आलेल्या व्यक्तीची ओळख चक धारीवाल गावचा रहिवासी बलजीत सिंग अशी झाली आहे.

## पंतप्रधानांच्या इंधन बचतीच्या आवाहनाला शिंदेसेनेची '१४ वाहनांची' सलामी





तभा वृत्तसेवा

कन्नड : देशाचे पंतप्रधान सातत्याने इंधन बचत, साधेपणा आणि पर्यावरण संवर्धनाचे आवाहन करत असताना कन्नडमध्ये मात्र त्याच आवाहनाला शिंदेसेनेकडून विरोधाभासी सलामी दिल्याचे चित्र पाहायला मिळाले. उद्योगमंत्री उदय सामंत यांच्या दौऱ्यात तब्बल १४ वाहनांचा ताफा सहभागी झाल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

कन्नड शहरातील एका खासगी मंगल कार्यालयात शुक्रवारी शिवसेना पदाधिकारी व कार्यकर्त्यांचा मेळावा आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमासाठी उद्योगमंत्री सामंत यांच्यासह अनेक नेत्यांचा मोठा लवाजमा दाखल झाला. वाढत्या पेट्रोल-डिझेल दरामुळे सामान्य नागरिक त्रस्त असताना मंत्र्यांच्या ताफ्यातील वाहनांची संख्या मात्र चर्चेचा विषय ठरली.ग्रामीण भागातून सुद्धा मोठ्या प्रमाणात शेकडो कार्यकर्ते भाडोत्री चार चाकी वाहनांसह दाखल झाले होते

विशेष म्हणजे, पंतप्रधानांकडून वारंवार इंधन बचतीचे आवाहन केले जात असताना सत्ताधारी नेत्यांच्या दौऱ्यांमध्ये मात्र वाहनांचा मोठा ताफा दिसून येत असल्याने नागरिकांनी संताप व्यक्त केला. जनतेला काटकसरीचे सल्ले आणि स्वतः मात्र आलिशान ताफे, अशी टीका सोशल मीडियावरून करण्यात आली.

दरम्यान, मेळाव्यात बोलताना उद्योगमंत्री सामंत यांनी २०१७ मध्ये कन्नड एमआयडीसीचा निर्णय झाला होता, मग नऊ वर्षांत ती का झाली नाही याचे आत्मचिंतन झाले पाहिजे, असे वक्तव्य केले. मात्र, गेल्या अनेक वर्षांपासून सत्ता हातात असतानाही एमआयडीसीचा प्रश्न प्रलंबित राहिल्याने नागरिकांनी या वक्तव्यावरही प्रश्नचिन्ह उपस्थित केले.

मेळाव्यात अब्दुल सत्तार, संदिपान भुमरे, राहुल शेवाळे, रमेश बोरनारे यांच्यासह अनेक पदाधिकारी उपस्थित होते. मात्र, कार्यक्रमापेक्षा मंत्र्यांच्या ताफ्याचीच अधिक चर्चा शहरात रंगलेली दिसून आली.

## .. तर मुलांना ओबीसी आरक्षणाचा लाभ का ?

वृत्तसंस्था

नवी दिल्ली :ओबीसी आरक्षण आणि क्रीमी लेयरची मर्यादा या विषयी सुप्रीम कोर्टात एका प्रकरणावर सुनावणी सुरु होती. या सुनावणीवेळी सुप्रीम कोर्टाने उपस्थित केलेला प्रश्न सध्या चर्चेला कारण ठरला आहे.सुनावणीवेळी सप्रीम कोर्टाने महत्त्वाचं वक्तव्य केलं. एखाद्या विद्यार्थ्याचे दोन्ही पालक आई-वडील हे ख-ड अधिकारी आहेत तर त्याला आरक्षणाचा लाभ का मिळायला हवा? असा सवाल कोर्टाने केला. कोर्टाच्या या प्रश्र्नानंतर पुन्हा एकदा क्रीमी लेयरच्या मर्यादा आणि आरक्षण याबाबतच्या चर्चांना उधाण आलं आहे.

## एव्हरेस्ट सर केला, पण परतीचा प्रवास ठरला अखेरचा! दोन भारतीय गिर्यारोहकांचा दुर्दैवी मृत्यू

वृत्तसंस्था

काठमांडू : जगातील सर्वात उंच शिखर असलेल्या माऊंट एव्हरेस्ट वर यशस्वी चढाई केल्यानंतर परतीच्या प्रवासात दोन भारतीय गिर्यारोहकांचा मृत्यू झाल्याची अत्यंत दुःखद घटना समोर आली आहे. या घटनेमुळे गिर्यारोहण क्षेत्रात शोककळा पसरली असून एव्हरेस्ट मोहिमेतील वाढत्या धोक्यांबाबत पुन्हा एकदा चिंता व्यक्त केली जात आहे.



नेपाळची राजधानी काठमांडू येथून मिळालेल्या माहितीनुसार, मृत गिर्यारोहकांची ओळख अरुण कुमार तिवारी आणि संदीप अरे अशी झाली आहे. दोघांनीही अत्यंत कठीण परिस्थितीत एव्हरेस्ट शिखर सर केले होते. मात्र खाली उतरताना अतिशय थकवा, ऑक्सिजनची कमतरता आणि शरीराची मर्यादा ओलांडल्याने त्यांची प्रकृती अचानक खालावली.माहितीनुसार, संदीप अरे यांनी बुधवारी (२० मे) एव्हरेस्ट शिखरावर यशस्वी चढाई केली होती, तर अरुण कुमार तिवारी यांनी गुरुवारी सायंकाळी सुमारे ५.३० वाजता शिखर गाठले. दोघेही परतीच्या मार्गावर असताना त्यांना प्रचंड थकवा जाणवू लागला. उणे तापमान, विरळ हवा आणि कठीण बर्फाळ मार्गामुळे त्यांची तब्येत अधिकच बिघडली. नेपाळ एक्स्पिडिशन ऑपरेटर्स असोसिएशनचे महासचिव ऋषी भंडारी यांनी सांगितले की, मार्गदर्शक आणि बचाव पथकाने दोन्ही गिर्यारोहकांना वाचवण्यासाठी शर्थीचे प्रयत्न केले. मात्र अत्यंत प्रतिकूल हवामान आणि शारीरिक थकव्यामुळे त्यांचे प्राण वाचवता आले नाहीत.

## नवी मुंबईत ५०४ इमारती 'धोकादायक' घोषित

तभा वृत्तसेवा

नवी मुंबई : पावसाळा अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपला असताना, नवी मुंबई महानगरपालिकेने (छ्वचउ) संभाव्य दुर्घटना आणि जीवितहानी टाळण्यासाठी कंबर कसली आहे. महापालिकेने पावसाळ्यापूर्वी शहरात केलेल्या सखोल रचनात्मक सर्वेक्षणानुसार (स्ट्रक्चरल ऑडिट), २०२६-२७ या वर्षासाठी नवी मुंबईतील तब्बल ५०४ इमारती अधिकृतरीत्या 'धोकादायक' असल्याचे घोषित केले आहे. पावसाळ्यात एखादी जुनी इमारत कोसळून मोठी हानी होऊ नये, या उद्देशाने महापालिकेने या धोकादायक इमारतींमधील रहिवाशांना आपली घरे तत्काळ रिकामी करून सुरक्षित स्थळी जाण्याचा अत्यंत कडक इशारा दिला आहे.



प्राप्त झालेल्या सर्वेक्षण अहवालानुसार, पालिकेने या धोकादायक इमारतींची त्यांच्या धोक्याच्या तीव्रतेनुसार चार वेगवेगळ्या श्रेणींमध्ये विभागणी केली आहे. हे वर्गीकरण खालीलप्रमाणे आहे, 'सी-१' अतिधोकादायक: या यादीतील तब्बल ५२ इमारती राहण्यासाठी पूर्णपणे अयोग्य आणि 'अतिधोकादायक' ठरवण्यात आल्या आहेत. या इमारती कधीही कोसळू शकतात, त्यामुळे त्या तत्काळ रिकाम्या करणे अत्यंत गरजेचे आहे. 'सी-२ए' तत्काळ दुरुस्ती: या श्रेणीत १०२ इमारतींचा समावेश असून, येथील रहिवाशांना इमारतीची मोठी रचनात्मक दुरुस्ती करण्यासाठी घरे तात्पुरती खाली करावी लागणार आहेत. 'सी-२बी' रहिवासी न हलवता दुरुस्ती: या प्रकारातील २९७ इमारतींना दुरुस्तीची गरज आहे, मात्र त्यासाठी नागरिकांना घरे रिकामी करण्याची आवश्यकता नाही. ते तिथे राहूनच इमारतीची डागडुजी करू शकतात. 'सी-३' किरकोळ दुरुस्ती: ५३ इमारतींमध्ये केवळ किरकोळ स्वरूपाच्या दुरुस्तीची आवश्यकता असल्याचे पालिकेने स्पष्ट केले आहे.

## मतदार यादी पुनरिक्षण मोहीम सुरु

तभा वृत्तसेवा

मुंबई : राज्य निवडणूक आयोगाची आज पत्रकार परिषद पार पडली. राज्य निवडणूक आयोगाचे मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोक्कलिंगम यांनी यावेळी माहिती दिली. मतदार याद्यांबाबत आगामी काळात महत्त्वाचं काम केलं जाणार आहे. याबाबत त्यांनी माहिती दिली. आम्ही दरवर्षी रिवीजनसाठी येतो, त्यावेळी विचारतो की, आता असलेल्या यादीमध्ये तुम्हाला काही बदल करायचा आहे का? तुमचा पत्ता बदलला का? तुमचा फोटो बदलायचा आहे का? लग्न झाल्यानंतर तुमचं नाव बदलायचं का? असे काही बदल करायचे असतील तर आम्ही फॉर्म भरतो. बदल नसेल तर फॉर्म भरत नाही हे आमच्या समरी रिवीजनचे प्रोसिजर आहे, अशी माहिती एस. चोक्कलिंगम यांनी दिली.

२० जूनला मतदार यादीमध्ये असलेल्या प्रत्येक मतदाराचे एनोमरेशन फॉर्म तयार करण्यात येईल. म्हणजे २० जूनला मतदार यादीत असलेल्या मतदारांचे नाव, त्यांचा पत्ता आणि सर्व एनोमरेशन फॉर्ममध्ये प्रिंट करुन मिळणार. ते प्रत्येक लोकांच्या घरी घेऊन येणार. त्याला दोन प्रश्न विचारण्यात येणार. आज तुम्हाला दाखवत असलेली माहिती बरोबर आहे का किंवा त्यामध्ये बदल झालेली आहेत का? बदल असू शकतात. हे सर्व बदल करण्यासाठी संधी देण्यात येते, अशी माहिती त्यांनी दिली.

आम्ही चार प्रश्न विचारतो. संबंधित मतदार येथून दुसरीकडे कुठे गेला आहे का ते कुणाला माहिती नाही? मग तो गैरहजर म्हणून नोंद करतो. मतदार दुसरीकडे शिफ्ट झाला आहे का? त्याची नोंद घेतो. मृत्यू झाला असेल तर मृत्यूचे प्रमाणपत्राची प्रत घेऊन प्रक्रिया करतो. तसेच ड्युप्लिकेट असेल तर कारवाई करतो. ड्युप्लिकेट नावे शोधण्याचं काम निवडणूक आयोग करत आहे. नाव जुळत असतील तर सगळे तपासायचे असते आणि फोटो सिमिलर एन्ट्रीसचे नवीन प्रयत्न सुरु आहेत, अशीदेखील माहिती एस. चोक्कलिंगम यांनी दिली.

निवडणूक आयोग ही महत्त्वाची कामे राज्यात करणार आहे. त्यासाठी राज्यात १ लाख २५३ इड्ज कामावर असणार आहेत. काम मोठे असल्याने इड्ज ला मदत करण्यासाठी सुद्धा आम्ही सूचित केले आहे. काम जास्त असेल तर इतर फिल्ड लेव्हल वर्कर त्यांच्यासोबत काम करणार आहेत. या प्रोग्रामासाठी प्रशिक्षण २० ते २९ जूनमध्ये होणार, असं चोक्कलिंगम यांनी सांगितलं.






# मनपा कार्यालयातील हिंसाचारावर खासदारांचा संताप

## नगरसेवकांच्या हाणामारी प्रकरणाची वरिष्ठ स्तरावर चौकशी करा – खा.कल्याण काळे

तभा वृत्तसेवा
जालना । प्रतिनिधी

जालना महानगरपालिका कार्यालयातील महापौर यांच्या दालनात दिनांक ११ मे २०२६ रोजी दोन नगरसेवकांमध्ये झालेल्या गंभीर मारहाण व हाणामारीच्या घटनेबाबत जालना जिल्ह्याचे खासदार यांनी पोलीस अधीक्षक, जालना यांना निवेदन देऊन कठोर व निष्पक्ष कारवाईची मागणी केली आहे.

सदर घटनेत लोखंडी रॉड, खंजीर यांसारख्या घातक शस्त्रांचा वापर झाल्याची माहिती समोर येत असून, सार्वजनिक व शासकीय कार्यालयात अशा प्रकारचा हिंसाचार घडणे ही अत्यंत गंभीर बाब असल्याचे खासदार डॉ. काळे यांनी म्हटले आहे.

या घटनेमुळे महानगरपालिका परिसरातील कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला असून, नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. सदर प्रकरणात संबंधित पक्षांकडून परस्परांविरुद्ध गुन्हे दाखल करण्यात आले असून, भारतीय न्याय संहितेअंतर्गत जिवे मारण्याचा



प्रयत्न, घातक शस्त्रांचा वापर, गंभीर दुखापत करणे तसेच सार्वजनिक कार्यालयातील शांतता भंग करणे यांसारखी गंभीर कलमे लावण्यात आल्याची माहिती आहे. मात्र, घटना घडून जवळपास १२ दिवस उलटूनही आरोपींवर प्रभावी कारवाई झालेली नसल्याबद्दल खासदार डॉ. काळे यांनी नाराजी व्यक्त केली आहे. तसेच, या गंभीर स्वरूपाच्या गुन्ह्यांमध्ये तडजोडीच्या माध्यमातून प्रकरण मागे घेण्याचे प्रयत्न होत असल्याची माहिती समोर येत असून, अशा प्रकरणांमध्ये न्यायालयीन प्रक्रिया व पोलीस तपास यांना बाधा पोहोचणार नाही याची दक्षता घेणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले. खासदार डॉ. कल्याण काळे यांनी पोलीस प्रशासनाकडे सर्व आरोपींवर निष्पक्ष, पारदर्शक व तात्काळ कायदेशीर कारवाई करण्यात यावी, तपास वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या देखरेखीखाली करण्यात यावा, घातक शस्त्रांचा वापर व सार्वजनिक कार्यालयातील हिंसाचाराची सखोल चौकशी करण्यात यावी, कोणत्याही दबावाखाली तपास प्रक्रियेत हस्तक्षेप होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी, भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी महानगरपालिका परिसरात आवश्यक सुरक्षा उपाययोजना करण्यात याव्यात अश्या मागण्या केल्या आहेत. लोकशाही व्यवस्थेतील सार्वजनिक संस्थांमध्ये अशा प्रकारे हिंसाचार होणे अत्यंत दुर्दैवी असून, कायद्याचा धाक कायम राखण्यासाठी पोलीस प्रशासनाने तात्काळ व कठोर कार्यवाही करावी, अशी मागणी खासदार डॉ. कल्याण काळे यांनी केली आहे. सदरील निवेदन देण्याचा वेळी महानगर जिल्हाध्यक्ष डॉ.विशाल धानुरे, रघुवीर गुडे, दिनेश सुराणा, शमशोद्दीन शेख, बाबासाहेब सोनवणे, नारायण वाडेकर, सुरज येलगंटीवार, वसीम कादिर, अंकुश शिंदे, भारत लोढा, इतर मान्यवर उपस्थित होते.

## संक्षिप्त

### जिल्हाधिकारी कार्यालयात दहशतवाद व हिंसाचार विरोधी शपथ

तभा वृत्तसेवा
जालना । प्रतिनिधी

माजी पंतप्रधान राजीव गांधी यांच्या स्मृतीदिनानिमित्त दि. २१ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयात दहशतवाद व हिंसाचार विरोधी शपथ घेण्यात आली.

यावेळी नायब तहसिलदार तुषार निकम, सतिश तायडे, किशोर तायडे, महसुल सहायक याया पठाण, रवी हेलगट, अनिल शिंगाडे, राहुल खंदारे, संपदा कुलकर्णी, शिल्पा मगरे, सविता भोकरे, पांडे आदी कर्मचाऱ्यांची उपस्थिती होती.

### राजु कसबे यांना छ.राजर्षी शाहू महाराज समाजभूषण पुरस्कार जाहीर

तभा वृत्तसेवा
परतुर । प्रतिनिधी



अण्णाभाऊ साठे पीपल्स फोर च्या वतीने दिला जाणारा यंदाचा मानाचा छत्रपती राजर्षी शाहू महाराज समाजभूषण पुरस्कार २०२६ परभणी जिल्ह्यातील जिंतूर तालुक्यातील वर्णा गावातील मातंग समाजातील तरुण तडफदार सामाजिक कार्यकर्ते तथा लहू क्रांती संघर्ष सेना महाराष्ट्र.या सामाजिक संघटनेचे अध्यक्ष श्री.राजू कसबे यांना जाहीर झाला आहे.

शिव,फुले, शाहू, अण्णाभाऊ, आंबेडकरी चळवळीतील विविध राजकीय आर्थिक सांस्कृतिक आणि वैचारिक क्षेत्रातील निस्वार्थपणे व उल्लेखनीय योगदानाची दखल घेऊन त्यांची या पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे याची अधिकृत घोषणा पुरस्कार निवड समितीच्या वतीने करण्यात आली आहे. अण्णाभाऊ साठे पीपल्स फोर्सच्या वतीने नुकतीच त्यांना या पुरस्काराचे निवड पत्र प्रदान करण्यात आले आहे. सन्मानचिन्ह आणि सन्मानपत्र असे या पुरस्कारचे स्वरूप आहे.

छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांच्या जयंतीचे औचित्य साधून शुक्रवार २६ जून २०२६ रोजी दुपारी १२ वाजता सिडको नवीन नांदेड येथे पुरस्कार सोहळ्यात विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या हस्ते श्री राजू कसबे यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार असल्याची माहिती छत्रपती राजर्षी शाहू महाराज समाजभूषण पुरस्कार २०२६ निवड समितीचे प्रमुख ॲड.सुजाता पोहरे ,डी एस वाघमारे, बा रा वाघमारे यांनी दिली आहे श्री. राजू कसबे यांना हा मानाचा पुरस्कार घोषित झाल्याबद्दल राजकुमार वैरागड, अशोक साबळे,विठ्ठल नाटकर, सुखदेव घोडे, ॲड.सुनील कसबे , आकाश कुचेकर, विजय माने, शेषराव घोडे, संजय चौरे ,किशोर गवारे, दिपक बिरांजे, रवी दळवी, इंद्रजीत दूधगोंडे, मोहन कांबळे,अशोक पारखे, अशोक तूरूपझाडे, विकास लोंढे,अनिल तांबे, अनिल आठवे, सतीश थोरात, विठ्ठल भारसाकळे, खंडू वाघमारे, सुनील सकट, संजय सोनुने, परमेश्वर जाधव, गणेश लालझरे,नाना लांडगे,सुनील गवारे,चांगदेव ठोकाळे, राजू भालके, मोहन आरसे, दत्ता क्षीरसागर,रामप्रसाद बावीसे, कैलास काळे,बाळू सौदागर, शंकर पांजगे, संतोष अंभुरे, दादासाहेब चौरे, यांच्यासह राज्यातील व जिल्ह्यातील सामाजिक, कायदेशीर व सांस्कृतिक क्षेत्रातील मान्यवराकडून त्यांच्यावर कौतुकाचा व अभिनंदनचा वर्षाव होत आहे

### अंबड प्रशासनाची वाळू माफियांवर 'हायवे'वर धडक कारवाई

**भोकरवाडी टोलनाक्यावर ६० लाखांचा मुद्देमाल जप्त, दोन हायवा चालकांवर गुन्हे दाखल**

तभा । वृत्तसेवा
अंबड । प्रतिनिधी

गोदावरी नदीपात्रातून बेकायदेशीरपणे वाळू उत्खनन व वाहतूक करणाऱ्या माफियांविरुद्ध अंबड महसूल विभागाने आता थेट महामार्गावरही धडक कारवाई सुरू केली आहे. साष्टपिंपळगाव येथून छत्रपती संभाजीनगरच्या दिशेने विनापरवाना वाळू घेऊन जाणाऱ्या दोन हायवा ट्रकवर भोकरवाडी टोलनाका येथे छापा टाकून त्यांना जप्त करण्यात आले आहे. या कारवाईत तब्बल ६० लाख २१ हजार ८०० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून, दोन चालकांविरुद्ध अंबड पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

## गटविकास अधिकारी सतत गैरहजर; मनसेचा खळखट्याक आंदोलनाचा इशारा

तभा वृत्तसेवा
जाफ्राबाद । प्रतिनिधी

पंचायत समिती जाफ्राबाद येथील गटविकास अधिकारी सतत गैरहजर राहत असल्यामुळे तालुक्यातील ग्रामीण विकासकामांवर गंभीर परिणाम होत असल्याचा आरोप महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे तालुका सचिव पंढरीनाथ गजानन म्हस्के यांनी केला आहे. याबाबत त्यांनी गटविकास अधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी आणि संबंधित प्रशासनाला निवेदन देऊन तातडीने कारवाईची मागणी केली आहे.

निवेदनात म्हटले आहे की, पंचायत समिती कार्यालयातील गटविकास अधिकारी वारंवार गैरहजर राहत असल्याने प्रशासनातील कामकाज विस्कळीत झाले आहे. विशेषतः घरकुल योजना, ग्रामपंचायतींना मिळणारा विकास निधी, विविध शासकीय योजनांचे प्रस्ताव आणि ग्रामस्तरावरील विकासकामांच्या



मंजुरी वेळेत होत नसल्याने अनेक कामे रखडली आहेत. त्यामुळे ग्रामीण भागातील विकासकामे पूर्णपणे ठप्प झाल्याचे चित्र निर्माण झाले आहे.

याशिवाय अधिकारी कार्यालयात उपस्थित नसल्यामुळे ग्रामस्थ, लोकप्रतिनिधी आणि कर्मचारी यांना विनाकारण मानसिक व आर्थिक त्रास सहन करावा लागत असल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे. अनेक नागरिकांना आपल्या कामांसाठी पंचायत समिती कार्यालयाच्या वारंवार फेऱ्या माराव्या लागत असून प्रशासनाविषयी तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

मनसेच्या वतीने प्रशासनाला सात दिवसांचा अल्टिमेटम देण्यात आला असून, या कालावधीत स्वतंत्र गटविकास अधिकारी नियुक्त करून ठप्प विकासकामे तातडीने मार्गी लावावीत, अशी मागणी करण्यात आली आहे. अन्यथा महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने तीव्र खळखट्याक आंदोलन करण्यात येईल, असा इशारा निवेदनातून देण्यात आला आहे. या निवेदनाच्या प्रती जिल्हा परिषद जालना चे मुख्य कार्यकारी अधिकारी तसेच जाफ्राबाद पोलीस ठाणे यांना पाठवण्यात आल्या आहेत.

## जिल्हा काँग्रेस कमिटीच्या जिल्हाध्यपदी कल्याण दळे तर शहराध्यक्षपदी डॉ.विशाल धानुरे

तभा वृत्तसेवा
जालना प्रतिनिधी





जालना जिल्हा काँग्रेस कमिटीच्या जिल्हाध्यपदी ओबीसी नेते कल्याण दळे तर जालना शहराध्यक्षपदी डॉ. विशाल धानुरे यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचे सरचिटणीस वेणुगोपाल यांनी ही नियुक्ती केली आहे. कल्याण दळे हे ओबीसी नेते म्हणून परिचित आहेत. तसेच ते बारा बलुतेदार महासंघाचे प्रदेशाध्यक्ष आहेत. यापूर्वी ते महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे सरचिटणीस म्हणून कार्यरत होते. आता त्यांच्यावर पक्षाने जालना जिल्हाध्यपदाची जबाबदारी सोपवली आहे. जालना शहराध्यक्षपदी नियुक्ती झालेले डॉ. विशाल धानुरे हे यापूर्वी काँग्रेसचे शहर जिल्हा उपाध्यक्ष म्हणून कार्यरत होते. दरम्यान, आपण जालना जिल्ह्यातील काँग्रेस पक्षाचे संघटन मजबूत करण्यावर भर देणार असून निष्ठावंत कार्यकर्त्यांचा सन्मान केला जाईल, असे कल्याण दळे यांनी म्हटले आहे. एका मायक्रो ओबीसी घटकातील कार्यकर्त्यांवर जालना जिल्हाध्यक्षपदाची जबाबदारी सोपविल्याबद्दल त्यांनी काँग्रेस नेते मंडळींचे आभार मानले आहेत

## विधानपरिषद साठी भास्कर आबा दानवे यांच्या उमेदवारीची शिफारस करा

तभा वृत्तसेवा
जालना । प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर व जालना स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघाच्या विधानपरिषद निवडणुकीसाठी भारतीय जनता पार्टीकडून जालना महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर मुकुंदराव दानवे यांना उमेदवारी देण्यात यावी, अशी मागणी भाजपा जालना महानगरातील पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी लोकनेते माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब पाटील दानवे यांच्याकडे आज दि. २० मे २०२६ रोजी जालना येथे निवेदनाद्वारे केली.

यावेळी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, भास्कर आबा दानवे हे सलग जालना विधानसभा मतदारसंघात पूर्णवेळ संघटन बांधणीचे कार्य केले आहे. त्यांनी मतदारसंघात भाजपा पक्षाच्या शाखा स्थापन करून पक्ष संघटना तळागाळापर्यंत मजबूत करण्यासाठी मोठे योगदान दिले आहे. पक्ष संघटनेत विविध जबाबदाऱ्या सांभाळताना त्यांनी जालना नगरपरिषद उपनगराध्यक्ष, भाजपा जिल्हा उपाध्यक्ष, १०१–जालना विधानसभा प्रमुख तसेच सध्या जालना महानगर जिल्हाध्यक्ष म्हणून प्रभावी काम केले असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले. तसेच स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघातील आगामी विधानपरिषद निवडणुकीत भारतीय जनता पार्टीकडून भास्कर आबा दानवे यांना उमेदवारी मिळावी यासाठी महाराष्ट्र प्रदेश नेतृत्वाकडे शिफारस करावी, अशी मागणी पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी केली व पक्षासाठी सातत्याने काम करणाऱ्या आणि कार्यकर्त्यांमध्ये मजबूत संपर्क असलेल्या भास्कर आबा दानवे यांना पक्षाने संधी दिलीच पाहिजे, अशी भावना देखील यावेळी पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी व्यक्त केली. यावेळी राजेश राऊत, अशोक पांगारकर, बद्रीनाथ पठाडे, महेश निकम, संतोष लोखंडे,



सोपान पेंढारकर, सतीश जाधव, धनराज काबलिये, अमोल धानुरे, सुनील खरे, संजय डोंगरे, संध्या देठे, सिद्धिविनायक मुळे, शशिकांत घुगे, विजय कामड, आकाश देशमाने, दिपक साळवे, दुर्गेश कुरील, रोहित खोडवे, अर्जुन गेही, संजय भगत, मनोज बिडकर, वसंत शिंदे, अमोल कारंजेकर, सुनील पवार, शिवप्रकाश चितळकर, गोविंद ढेंबरे, राजेंद्र भोसले, परसराम तळेकर, बद्री भसांडे, अनिल सरकटे, राजाराम जाधव, कृष्णा खिल्लारे, गजानन खरात, निवृत्ती लंके, दत्ता जाधव, सतीश केरकळ, सुमित सुरडकर, विष्णू डोंगरे, नंदकुमार ठाकूर, सुधाकर खरात, रामेश्वर शेजूळ, तुकाराम कळकुंबे, शिवाजी गायकवाड, कैलास सोळुंके, हरिभाऊ गोरे, गोवर्धन उबाळे, करण निकाळजे, रवि कायंदे, नागेश अंभोरे, योगेश शिमगे, बाळू कावळे, दांडायित, कृष्णा गायके, विकास कदम, महेश मुळे, सागर वाहूळकर, गौरव गोधेकर, जगदीश खरात, विठ्ठल इंदलकर, शरद सोनुने, उद्धव ढवळे, रामदास गायकवाड, नानासाहेब देव्हडे, सतीश जारे, बाबूलाल चव्हाण, शाम जाधव, लासिराम राठोड, गणेश वाघमारे, लक्ष्मण जाधव, लक्ष्मण राठोड, गजानन घुले, राजू उगले, राजू कळकुंबे, बाबासाहेब चाळगे, बद्री वाघ, राजेश घोडके, मदन गवारे, सत्यनारायण ढोकळे यांच्यासह भाजपा जालना विधानसभेतील विविध पदाधिकारी, कार्यकर्ते व प्रतिनिधी उपस्थित होते.

## जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली 'पुतळा समितीची' आढावा बैठक संपन्न

तभा वृत्तसेवा
जालना । प्रतिनिधी



जिल्ह्यातील पुतळे आणि स्मारकांच्या सुरक्षिततेसाठी जिल्हाधिकारी कार्यालयात आज 'पुतळा समिती'ची आढावा बैठक पार पडली. यावेळी बैठकीस जिल्हाधिकारी आशिमा मित्तल, पोलीस अधीक्षक तेगबीर सिंह संधू, निवासी उपजिल्हाधिकारी शशिकांत हदगल तसेच विविध संबंधित विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

यावेळी बैठकीत मुख्यत्वे जिल्ह्यातील सर्व सार्वजनिक पुतळ्यांच्या परिसरातील कायदा, सुव्यवस्था आणि सुरक्षिततेचा सविस्तर आढावा घेण्यात आला. संवेदनशील ठिकाणांवर विशेष पोलीस गस्त ठेवण्याबाबत तसेच सीसीटीव्ही (उउढत) यंत्रणा प्रभावीपणे कार्यान्वित करण्याबाबत पोलीस अधीक्षकांशी चर्चा झाली. जिल्हाधिकारी यांनी महापुरुष आणि क्रांतीकारकांच्या पुतळ्यांच्या परिसराची नियमित स्वच्छता, रंगरंगोटी व योग्य देखभाल राखण्यासाठी स्थानिक स्वराज्य संस्थांना तातडीने आवश्यक सूचना देण्याचे निर्देश दिले. याशिवाय, कोणत्याही ठिकाणी नियमांचे उल्लंघन करून किंवा विनापरवाना पुतळे उभारले जाणार नाहीत, याची दक्षता प्रशासनाने घेण्याचे आदेशही जिल्हाधिकारी यांनी दिले.

बैठकीत प्रशासनाने पुतळ्यांच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक उपाययोजना करत असल्याचे स्पष्ट केले असून, नागरिकांनी देखील या नियमांचे पालन करण्यास सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले.

## शेतकऱ्यांना कॅन मध्ये डिझेल उपलब्ध करून द्या, आमदार बबनराव लोणीकरांनी मुख्यमंत्र्यांकडे केलेल्या मागणीला यश

### जालना जिल्हाधिकाऱ्यांनी पत्र काढून शेतकऱ्यांना कॅन मध्ये डिझेल देण्याची दिली परवानगी

तभा वृत्तसेवा
जालना । प्रतिनिधी

शेतकऱ्यांचे शेती मशागतीचे काम जोमाने सुरू असून, जालना जिल्हाधिकाऱ्यांनी पेट्रोल पंप चालकांना शेतकऱ्यांना कॅन मध्ये डिझेल न देण्याचा निर्णय घेतला होता या पार्श्वभूमीवर माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्याकडे मागणी करत शेतकऱ्यांना त्यांचे ट्रॅक्टर पेट्रोल पंपावर आणून केवळ २० लिटर डिझेल घेऊन परत जाणे परवडणारे नव्हते, ट्रॅक्टरच्या पंपावर जाण्या–येण्यातच अर्धे डिझेल खर्च होत होते याची दखल घेत आमदार बबनराव लोणीकर यांनी मुख्यमंत्र्यांना शेतकऱ्यांना कॅन मध्ये डिझेल उपलब्ध करून द्या अशा प्रकारची मागणी केली होती



आमदार लोणीकर यांनी केलेल्या या मागणीची तात्काळ दखल घेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जालना जिल्हाधिकाऱ्यांना शेती कामासाठी मशागतीसाठी लागणारे ट्रॅक्टरचे डिझेल कॅन मध्ये उपलब्ध करून देण्याचे आदेश दिले होते

या पार्श्वभूमीवर जालना जिल्हाधिकाऱ्यांनी तात्काळ आदेश काढत शेतकऱ्यांना कॅनमध्ये डिझेल उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेतला असून यामुळे निश्चितच शेतकऱ्यांचा वेळ आणि थेट कामाच्या ठिकाणी डिझेल घेऊन जाता येणार असल्याने होणारा अनावश्यक खर्च टळणार आहे आमदार लोणीकरांनी केलेल्या या मागणीला यश आल्याने परतूर मंठा विधानसभा मतदारसंघातील शेतकऱ्यांनी आमदार बबनराव लोणीकर यांचे आभार मानले आहे

यासंदर्भात माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांनी ते म्हणले शेतकऱ्यांच्या अडीअडचणीत आपण सदैव शेतकऱ्यांच्या पाठीशी असून, ऐन मशागतीच्या दिवसांमध्ये केवळ २० लिटर डिझेल साठी ट्रॅक्टर पेट्रोल पंपावर घेऊन येणे व त्या ठिकाणाहून परत जाणे यासाठीच अर्धे डिझेल खर्च होत होते त्यामुळे आपण या संदर्भामध्ये तात्काळ भूमिका घेत मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्याकडे शेतकऱ्यांना कॅन मध्ये डिझेल उपलब्ध करून देण्याची आपण मागणी केली होती या मागणीला यश आले असून शेतकरी बांधवांच्या वतीने आमदार बबनराव लोणीकर यांनी मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांचे आभार मानत जिल्हाधिकाऱ्यांनी तात्काळ पत्र काढून शेतकऱ्यांना कॅन मध्ये डिझेल देण्याची परवानगी दिल्याबद्दल जिल्हाधिकाऱ्यांना धन्यवाद दिले आहेत.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## संक्षिप्त वृत्त...

### परभणी जिल्ह्यात पेट्रोल-डिझेल टंचाई तीव्र : शेतकरी व वाहनधारक हैराण : पेट्रोलपंपावर लांबच्या लांब रांगा

परभणी,/प्रतिनिधी : परभणी शहरासह संपूर्ण जिल्ह्यात पेट्रोल व डिझेलची तीव्र टंचाई निर्माण झाली असून सर्वच पेट्रोल पंपांवर वाहनधारकांच्या लांबच लांब रांगा लागत आहेत. यामुळे सर्वसामान्य नागरिकांसह शेतकरी हैराण झाले आहेत.

युद्धजन्य परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर गेल्या काही महिन्यांपासून इंधन टंचाईचे संकट निर्माण झाले आहे. राज्य व केंद्र सरकारकडून पुरेसा इंधनसाठा उपलब्ध असल्याचे स्पष्ट करण्यात आले असले, तरी प्रत्यक्षात जिल्ह्यात पेट्रोल व विशेषतः डिझेलचा तुटवडा जाणवत आहे. जिल्हा प्रशासनानेदेखील अधिकृत प्रसिद्धीपत्रकाद्वारे इंधनाचा तुटवडा नसल्याचा दावा केला आहे. मात्र, परिस्थिती याउलट असल्याचे चित्र सध्या दिसून येत आहे. अनेक पेट्रोलपंपांवर डिझेल उपलब्ध नसल्याचे फलक सातत्याने लावण्यात येत आहेत. परिणामी, ज्या पंपांवर इंधन उपलब्ध आहे त्या ठिकाणी वाहनधारकांना रखरखत्या उन्हात तासनतास प्रतीक्षा करावी लागत आहे.

शेती मशागतीच्या कामांसाठी ट्रॅक्टरमध्ये डिझेल भरण्यासाठी शेतकरी कॅन घेऊन पेट्रोलपंपांवर येत आहेत. मात्र, अनेक ठिकाणी कॅनमध्ये डिझेल देण्यास नकार दिला जात असल्याच्या तक्रारी समोर येत आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे. जिल्हाभर अशी गंभीर परिस्थिती निर्माण झाली असताना पेट्रोलपंप चालक तसेच प्रशासनाकडून स्पष्ट माहिती दिली जात नसल्याने नागरिकांमध्ये संभ्रमाचे वातावरण आहे. इंधन टंचाईमुळे वाहतूक, शेती आणि दैनंदिन व्यवहारांवर मोठा परिणाम होत असल्याचे नागरिकांकडून सांगितले जात आहे.

### मनपाच्या पथकाद्वारे २० किलो प्लास्टिक जप्त; ८ हजार ४०० रुपयांचा दंड वसूल

परभणी,/प्रतिनिधी : महानगरपालिकेच्या वतीने शहरातील बाजारपेठ परिसरात प्लास्टिक बंदी मोहिमेअंतर्गत धडक तपासणी मोहीम राबविण्यात आली. या कारवाईदरम्यान अंदाजे १५ ते २० किलो प्लास्टिक जप्त करण्यात आले असून संबंधित व्यापाऱ्यांकडून ८ हजार ४०० रुपयांचा दंड वसूल करण्यात आला.

उपायुक्त यांच्या आदेशानुसार तसेच मुख्य स्वच्छता निरीक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली प्रभाग समिती 'अ' अंतर्गत ही मोहीम राबविण्यात आली. मोहिमेदरम्यान भाजीपाला विक्रेते व इतर व्यापाऱ्यांची तपासणी करून प्लास्टिक वापर करणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली. या मोहिमेत लक्ष्मण जोगदंड, कुणाल भारसाकळे, दिलीप वाहुळे यांच्यासह सफाई कर्मचाऱ्यांनी सहभाग घेतला. महानगरपालिकेच्या या कारवाईमुळे प्लास्टिक वापरणाऱ्या व्यापाऱ्यांमध्ये खळबळ उडाली आहे.

### भरधाव कारच्या धडकेत दुचाकीस्वार ठार; दोघेजण गंभीर जखमी : केरवाडी बसस्थानक परिसरातील घटना; कार चालकाविरुद्ध गुन्हा दाखल

पालम,/प्रतिनिधी : भरधाव वेगातील टाटा सफारी कार चालकाने दुचाकीला दिलेल्या जोरदार धडकेत एकाचा मृत्यू झाला असून दोघेजण गंभीर जखमी झाले आहेत. ही घटना बुधवारी (दि. २०) सायंकाळी साडेसात ते आठ वाजण्याच्या दरम्यान पालम-गंगाखेड रोडवरील केरवाडी बसस्थानक परिसरात घडली.

मिळालेल्या माहितीनुसार, मोसीन अब्दुल कादर यांनी आपल्या ताब्यातील एमएच २६ बी.सी. ७७२७ क्रमांकाची टाटा सफारी कार भरधाव वेगात निष्काळजीपणे चालवून दुचाकीला पाठीमागून जोरदार धडक दिली. या अपघातात नामदेव खंडुजी जाधव (वय ४५, रा. केरवाडी) यांचा मृत्यू झाला. तर हरिओम रंगनाथ भुसनर व हनुमंत लक्ष्मण खरात हे दोघेजण गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.

दरम्यान, लक्ष्मण गंगाधरराव जाधव यांच्या फिर्यादीवरून कारचालकाविरुध्द गुन्ह्याची नोंद करण्यात आली आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक प्रकाश लोखंडे करीत आहेत.

### हातनूर येथे खरीप हंगाम पूर्वतयारी मेळावा उत्साहात : कृषी विभागाकडून शेतकऱ्यांना सोयाबीन पेरणी व बीज प्रक्रियेबाबत मार्गदर्शन

सेलू,/प्रतिनिधी : तालुक्यातील हातनूर येथे कृषी विभागाच्या वतीने बुधवारी (दि. २०) खरीप हंगाम पूर्वतयारी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. या मेळाव्यात खरीप हंगामातील विविध पिकांबाबत शेतकऱ्यांना सविस्तर माहिती देण्यात आली. तसेच सुधारित वाणांचा वापर करून उत्पादनवाढ कशी साधता येईल, याविषयी मार्गदर्शन करण्यात आले.

मेळाव्यात उपस्थित शेतकऱ्यांना सोयाबीन बियाण्यांची उगवण क्षमता प्रात्यक्षिकाद्वारे दाखवून देण्यात आली. यासोबतच सोयाबीन बीज प्रक्रिया प्रात्यक्षिक सादर करून बीज प्रक्रियेचे महत्त्व पटवून देण्यात आले. सोयाबीन पेरणीसाठी बीबीएफ पद्धतीचे फायदे आणि त्याचा उत्पादनवाढीसाठी होणारा उपयोग याबाबतही सविस्तर माहिती देण्यात आली. या मेळाव्यासाठी कृषी कार्यालयातील प्रणिता घंटलवाड, सुहास धोपटे आणि बलभीम आवटे यांनी पुढाकार घेतला. कार्यक्रमास परिसरातील ५० हून अधिक शेतकरी उपस्थित राहून सक्रिय सहभाग नोंदविला.

### कसबे यांना मानाचा 'छत्रपती राजर्षी शाहू महाराज समाजभूषण पुरस्कार जाहीर

परभणी,/प्रतिनिधी : राजू कसबे यांना अण्णाभाऊ साठे पीपल्स फोर्सच्या वतीने दिला जाणारा यंदाचा मानाचा 'छत्रपती राजर्षी शाहू महाराज समाजभूषण पुरस्कार २०२६' जाहीर करण्यात आला आहे. जिंतूर तालुक्यातील वर्णा गावचे रहिवासी असलेले राजू कसबे हे मातंग समाजातील तरुण व तडफदार सामाजिक कार्यकर्ते असून ते लहू क्रांती संघर्ष सेना महाराष्ट्र या सामाजिक संघटनेचे अध्यक्ष आहेत.

शिव, फुले, शाहू, अण्णाभाऊ आणि आंबेडकरी चळवळीतील विविध राजकीय, आर्थिक, सांस्कृतिक व वैचारिक क्षेत्रात निस्वार्थपणे केलेल्या उल्लेखनीय योगदानाची दखल घेत त्यांची या पुरस्कारासाठी निवड करण्यात आल्याची अधिकृत घोषणा पुरस्कार निवड समितीच्या वतीने करण्यात आली.

# इंधन बचतीसाठी एसटी अधिकाऱ्यांनीही एसटीनेच प्रवास करावा! वाढती इंधन दरवाढ, टंचाईच्या पार्श्वभूमीवर कास्ट्राईबचे विभागीय सचिव दामोधरे यांची मागणी

जिंतूर,/प्रतिनिधी:- देशासह राज्यात दिवसेंदिवस पेट्रोल-डिझेलचे दर वाढत असून देशात इंधन टंचाईचे सावट अधिक गडद होत चालले आहे. अशा परिस्थितीत सामान्य नागरिकांना सार्वजनिक वाहतुकीचा वापर करण्याचे आवाहन शासनाकडून वारंवार केले जाते. मात्र दुसरीकडे राज्य परिवहन महामंडळातील अनेक विभाग नियंत्रक,,लाईन चेकर, सुरक्षा दक्षता पथकातील अधिकारी व अन्य वरिष्ठ कर्मचारी स्वतः शासकीय वाहनांचा वापर बिनदिक्कत करत असल्याचे चित्र अनेक ठिकाणी दिसून येत आहे.

परभणी जिल्ह्यासह आपल्या एसटी विभागात हिंगोली जिल्हा पण येतो या दोन्ही जिल्ह्यातील सर्व आगारास भेटी देण्यासाठी अधिकारी वर्ग जात असतो अशा वेळी गाव तेथे व आगार तेथे एसटी उपलब्ध आहेतच त्यामुळे ''इंधन बचतीचा संदेश फक्त जनतेसाठीच का?'' असा सवाल आता प्रवासी व एसटी कर्मचारी उपस्थित करू लागले आहेत. एसटी महामंडळ हे ग्रामीण भागातील जनतेचे जीवनवाहन मानले जाते. हजारो कर्मचारी आणि लाखो प्रवाशांची जीवनरेखा असलेल्या एसटीनेच इंधन बचतीचा आदर्श घालून देणे अपेक्षित आहे. जर विभाग नियंत्रक, लाईन चेकर, सुरक्षा अधिकारी व निरीक्षक यांनी अधिकृत कामासाठी शक्य तितक्या प्रमाणात एसटी बसने प्रवास केला, तर केवळ इंधन बचतच होणार नाही तर सामान्य प्रवाशांच्या अडचणी देखील प्रत्यक्ष समजू शकतील, अशी भावना प्रवाशांकडून व्यक्त होत आहे. अनेकदा अधिकारी वातानुकूलित खासगी वाहनातून दौरे करतात, तर दुसरीकडे सामान्य प्रवासी गर्दी, उशीर, नादुरुस्त बस आणि अपुऱ्या फेऱ्यांचा सामना करत असतात. अधिकारी प्रत्यक्ष एसटीने प्रवास करू लागले तर बसची स्थिती, चालक-वाहकांच्या समस्या, प्रवाशांच्या तक्रारी, बसस्थानकांची अवस्था याचा वास्तव अनुभव त्यांना मिळेल. त्यामुळे व्यवस्थापनात सुधारणा होण्यास मदत होऊ शकते. इंधन दरवाढीमुळे एसटी महामंडळावरही मोठा आर्थिक ताण निर्माण झाला आहे. अनेक आगारांमध्ये डिझेल खर्च कमी करण्यासाठी चालकांना,कर्मचाऱ्यांना मायलेज वाढविण्याचे आदेश दिले जातात त्यांना सळो की पळो करून सोडतात. मात्र त्याच वेळी अधिकारी वर्गाने स्वतः इंधन बचतीचा आदर्श ठेवणे आवश्यक असल्याचे कर्मचारी संघटनांचे मत आहे. ''जनतेला आणि कर्मचाऱ्यांना काटकसरीचे धडे देणाऱ्या अधिकाऱ्यांनी प्रथम स्वतः एसटीचा वापर करावा,'' अशी मागणी आता जोर धरू लागली आहे. पर्यावरण संवर्धनाच्या दृष्टीनेही सार्वजनिक वाहतूक महत्त्वाची मानली जाते. एकाच बसमधून अनेक प्रवासी प्रवास करत असल्याने इंधनाची मोठ्या प्रमाणात बचत होते. त्यामुळे शासनाने आणि एसटी प्रशासनाने अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी ''एसटीने प्रवास प्रथम'' अशी मोहीम राबवावी, अशी मागणी सामाजिक संघटनांकडून होत आहे. दरम्यान, काही प्रवाशांनी उपरोधिक प्रतिक्रिया देताना ''सामान्य माणसाला एसटी आणि अधिकाऱ्यांना चारचाकी'' अशी टीका केली आहे. तर काही कर्मचारी म्हणतात की, अधिकारी जर प्रत्यक्ष एसटीतून प्रवास करू लागले तर बससेवा सुधारण्यासाठी अधिक गांभीर्याने निर्णय घेतले जातील. देशातील वाढते इंधन संकट, आर्थिक ताण आणि पर्यावरण संरक्षण याचा विचार करता आता प्रश्न उपस्थित होत आहे ''एसटी अधिकारी खरोखरच इंधन बचतीसाठी स्वतः एसटीने प्रवास करण्यास तयार होतील का?''

अशी मागणी कास्ट्राईब संघटनेचे विभागीय सचिव देविदास दामोधरे (आगळे दादा) यांनी केली आहे

## ई-फार्मसी विरोधात औषध विक्रेत्यांद्वारे कडकडीत बंद : शहरासह जिल्ह्यातील चित्र : प्रशासनास निवेदन : ऑनलाईन विक्री, किंमत धोरण व अधिसूचना माघारी घेण्याची मागणी

परभणी./प्रतिनिधी: ई-फार्मसी विरोधात औषध विक्रेत्यांद्वारे कडकडीत बंद : शहरासह जिल्ह्यातील चित्र : प्रशासनास निवेदन : ऑनलाईन विक्री, किंमत धोरण व अधिसूचना माघारी घेण्याची मागणी करण्यात आली आहे.

ऑनलाइन औषधविक्रीतील (ई-फार्मसी) वाढ, मोठ्या कंपन्यांचे किंमत धोरण तसेच जीएसआर २२० (ई) व जीएसआर ८१७ (ई) या अधिसूचना मागे घ्यावी, या मागणीसाठी अखिल भारतीय औषधी विक्रेता संघटनेने २० मे रोजी पुकारलेल्या एक दिवसीय देशव्यापी बंद आंदोलनास परभणी महानगरासह जिल्ह्यात जोरदार प्रतिसाद मिळाला.

महाराष्ट्र राज्य केमिस्ट अँन्ड ड्रगिस्ट असोसिएशन आणि ऑल इंडिया ऑर्गनायझेशन ऑफ केमिस्ट अँन्ड ड्रगिस्ट यांनी आपल्या मागण्यांसंदर्भात निवेदन प्रसिद्ध केले होते. देशभरातील सुमारे १२ लाख ४० हजार औषध विक्रेत्यांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या या संघटनांच्या विविध मागण्या शासन दरबारी निर्णयाविना अद्याप प्रलंबित आहेत, हे निदर्शनास आणून दिले होते. विशेषतः ई- फार्मसीद्वारे औषध विक्री करतांना वैद्यकीय प्रिस्क्रिप्शनची योग्य तपासणी न करता मोठ्या प्रमाणावर औषधे दिली जात आहेत. यामुळे स्व-औषधोपचाराचे प्रमाण झपाट्याने वाढत असून नागरिक नकळत स्वतःच्या आरोग्याशी खेळ करत आहेत. तज्ज्ञांच्या मते, डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय घेतलेली औषधे अनेकदा दुष्परिणामकारक ठरु शकतात, त्यामुळे दीर्घकालीन आजार वाढण्याची शक्यता आहे, असे या संघटनेने म्हटले होते.

याशिवाय मोठ्या कंपन्यांकडून कमी दरात औषध विक्री होत असल्याने लहान औषध विक्रेते आर्थिक अडचणीत सापडत असल्याचेही या संघटनांनी नमूद केले. सरकारने तातडीने निर्णय घ्यावेत, अशी अपेक्षा व्यक्त केली. या अनुषंगानेच २० मे रोजी संपूर्ण देशभरातील औषध विक्रेते एक दिवशीय आंदोलन करीत सरकारचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न करत आहोत, असे संघटनांनी नमूद केले.

दरम्यान, महानगरासह जिल्ह्यातील संतप्त औषध विक्रेत्यांनी संघटनांनी पुकारलेल्या या आंदोलनास जोरदार प्रतिसाद दिला. संपूर्ण शहरात सर्वदूर औषधी दुकाने दिवसभर पूर्णतः बंद होती. या दरम्यान, जिल्हा केमिस्ट अँन्ड ड्रगीस्ट असोसिएशनचे अध्यक्ष संजय मंत्री, सचिव सूर्यकांत हाके, कोषाध्यक्ष पवन झांजरी यांच्यासह अन्य औषध विक्रेत्यांनी निवासी उपजिल्हाधिकारी श्रीमती अनुराधा ढालकरी यांची भेट घेऊन तपशीलवार निवेदन सादर केले. या मागण्यांची तातडीने दखल घ्यावी, अशी अपेक्षा व्यक्त केली.

## संघटन प्रमुख प्रदीप कोकडवार यांचा सुधीर मुनगंटीवार यांच्या हस्ते सन्मान



परभणी,/प्रतिनिधी: समाजकार्य आणि जनहितासाठी कार्यरत असलेले जेष्ठ पत्रकार तथा महाराष्ट्र आर्य वैश्य महासभेचे राज्य संघटन प्रमुख प्रदीप कोकडवार या समाज सेवकाला राज्यस्तरीय आदर्श रत्न पुरस्काराने नुकतेच पुणे येथे गौरविण्यात आले त्याबद्दल माजी मंत्री आमदार सुधीरभाऊ मुनगंटीवार यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

नांदेड नगरीत वासवी अर्बन उदघाट कार्यक्रमात उपस्थित प पु हभप एकनाथ महाराज साधू महासभेचे अध्यक्ष नंदकुमार गादेवार, महासचिव गोविंदराव बिडवई, दिलीपभाऊ कंदकुर्ते, एकनाथराव मामडे, अनिल मनाठकर, सदानंद मेडेवार, राजूभाऊ मुक्कावार, दिपक निलावार, विजय कुंचनवार, नरेंद्र येरावार, शंतनु कोटगिरे , अनिल मुगटकर, भागवत लोकमनवार, गजानन चिद्रेवार, प्रणव मनूरवार, लक्ष्मीकांत मुक्कावार, प्रभाकर पत्तेवार, रविंद्र बंडेवार,बिपीन गादेवार,संजय काचावार, राजू मोतेवार यांच्यासह अनेक मान्यवर, महासभेचे पदाधिकारी उपस्थित होते.

## उन्हाळी मशागतीच्या कामांत बळीराजा मग्न



सोनपेठ,/प्रतिनिधी: या वर्षी राज्यात मान्सूनचे आगमन लवकरच होणार असल्याचा अंदाज हवामान खात्याने दर्शविला असुन खरिपाची पेरणीही वेळेत म्हणजे मृग नक्षत्रावर होणार असल्याचे सांगितले जात आहे. त्यामुळे येत्या खरिपाच्या पेरण्याच्या पुर्व तयारीसाठी बळीराजा उन्हाळी शेती मशागतीच्या कामामध्ये मग्न झाला असल्याचे पहावयास मिळत आहे. शेतकरी राजाला द्विगुणीत करणारा क्षण म्हणजे मृग नक्षत्रावर होणारी काळ्या आईची ओटीभरणी होय.त्या क्षणाची तो आतुरतेने वाट पाहत असतोआणि त्यासाठी संपुर्ण उन्हाळाभर रखरखत्या उन्हामध्ये काळ्या आईला नटवीण्यासाठी शेती मशागतीची कामे करून पेरणीला सज्ज होतो. सध्या गेलो पंधरा दिवसांत सोनपेठाचा पारा ४४ अंशांनी चढलेला आहे त्यामुळे निश्चितच उन्हाची तिव्रता वाढलेली आहे. आशामध्ये नागरीक घराबाहेर पडणे टाळतात. परंतु शेतकरी मात्र संपूर्ण उन्हात शेतीमधील उन्हाळी खोडकी,वखारणी,नांगरट,पळाटी काढने,काडीकचरा वेचून बाहेर काढून टाकणे इत्यादी प्रकारचे उन्हाळी मशागतीची कामे उरकतांना दिसुन येत आहे.यावेळी विहीर पुनर्भरण,चर खोदणे,पावसामुळे शेतीमधील साचलेल्या पाण्याला बांधावरुन नाली खोदून वाट काढून देणे,बांध बंदिस्त करून पावसाचे पाणी अडवून सखल भागातील एका कडेला साचण्याची व्यवस्था करण्यात येत आहेत. एकंदरीत शेती मशागतीच्या कामांत बळीराजा मात्र ईतर कामांना बगल देऊन रममाण झाल्याचे पहावयास मिळत आहे.

## गोवंश वाहतूक प्रकरणी बोरी पोलिसांची कारवाई चार बैलांसह ८ लाख ५० हजारांचा मुद्देमाल जप्त;दोन आरोपी ताब्यात

जिंतूर/प्रतिनिधी: जिंतूरपरभणी रोडवर गोवंश जनावरांची अवैधरित्या वाहतूक करणाऱ्या बोलेरो पिकअपवर बोरी पोलिसांनी धडक कारवाई करत चार बैलांसह सुमारे आठ लाख पन्नास हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. या प्रकरणी दोन आरोपींना ताब्यात घेण्यात आले असून त्यांच्याविरोधात विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



दि. २१ मे रोजी सकाळी साडेआठ वाजण्याच्या सुमारास जिंतूर ते परभणी मार्गावरील दीक्षाभूमी समोर ही कारवाई करण्यात आली. पोलिसांना मिळालेल्या माहितीनुसार, बोलेरो पिकअप (क्र. -०४--५२३२) मधून गोवंश जनावरे कत्तलीसाठी नेत असल्याची माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी तत्काळ सापळा रचून वाहन अडविले. वाहनाची तपासणी केली असता त्यामध्ये चार बैल अत्यंत निर्दयीपणे कोंबून बांधल्याचे आढळून आले. जनावरांना आकुड दोरीने बांधून त्यांची वाहतूक केली जात असल्याचे निदर्शनास आले. पोलिसांनी प्रत्येकी सुमारे ५० हजार रुपये किंमतीचे चार बैल तसेच ६ लाख ५० हजार रुपये किंमतीची बोलेरो पिकअप असा एकूण आठ लाख पन्नास हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. या प्रकरणी रियाज जाकेर कुरेशी (वय २४, रा. जिंतूर) व तौफीक मुसा कुरेशी (वय ३२, रा.जिंतूर) यांच्याविरोधात गु.र.नं. १५३/२०२६ अन्वये कलम ३(५) , प्राण्यांना क्रूरतेने वागविण्यास प्रतिबंध अधिनियम १९६० तसेच महाराष्ट्र प्राणी संरक्षण कायदा १९७६ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या कारवाईत बोरी पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक रामेश्वर धोंडगे यांच्या मार्गदर्शनाखाली पीएसआय महादेव गायकवाड, बीट जमादार शेख वसीम, राजेश जटाळ, श्रीराम दंडवते व रामप्रसाद कंठाळे यांनी सहभाग घेतला. फिर्याद पोलीस शिपाई प्रकाश लिंबाजी मोरे यांनी दिली असून पुढील तपास शेख वसीम हे करीत आहेत.

# शेतकऱ्याच्या मुलाची झेप थेट देशातील नामांकित विद्यापीठांत; तब्बल १५.६५ लाखांची शिष्यवृत्ती मिळवत वैभव ठोंबरेची यशोगाथा

जिंतूर,/प्रतिनिधी: शेतकऱ्याच्या मुलाची झेप थेट देशातील नामांकित विद्यापीठांत; तब्बल १५.६५ लाखांची शिष्यवृत्ती मिळवत वैभव ठोंबरेची यशोगाथा जिंतूर प्रतिनिधी ग्रामीण भागातील युवकांनी मोठी स्वप्ने पाहिली तर ती जिद्द, चिकाटी आणि अथक परिश्रमांच्या जोरावर नक्कीच पूर्ण होऊ शकतात, याचे प्रेरणादायी उदाहरण निवळी येथील वैभव वैजेनाथ ठोंबरे याने घालून दिले आहे. अत्यंत हालाखीच्या परिस्थितीत शिक्षण घेत असलेल्या या शेतकरी पुत्राने एकाच वेळी देशातील दोन नामांकित विद्यापीठांमध्ये उच्च शिक्षणासाठी प्रवेश मिळवत मोठे यश संपादन केले आहे. विशेष म्हणजे त्याला तब्बल १५ लाख ६५ हजार रुपयांची शिष्यवृत्तीही प्राप्त झाली आहे.

वैभव ठोंबरे याची देशातील प्रतिष्ठित समजल्या जाणाऱ्या येथे ''एम. एस्सी. सस्टेनेबिलिटी सायन्स अँड प्रॅक्टिस'' या पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी निवड झाली असून त्याला १५.६५ लाख रुपयांची शिष्यवृत्ती जाहीर करण्यात आली आहे. ग्रामीण पार्श्वभूमीतून आलेल्या विद्यार्थ्यासाठी हे यश अत्यंत उल्लेखनीय मानले जात आहे. याचबरोबर वैभवची येथे ''एम.ए. इन डेव्हलपमेंट'' या पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी देखील निवड झाली आहे. सामाजिक विकास, ग्रामीण परिवर्तन आणि शाश्वत विकास या विषयांमध्ये वैभवला विशेष



रुची असून त्याने सातत्यपूर्ण अभ्यास आणि सामाजिक भान जपत हे यश मिळवले आहे. तसेच येथे ''एम.ए. इन रुरल मॅनेजमेंट'' या अभ्यासक्रमाच्या मुलाखतीसाठीही त्याची निवड झाली आहे. त्यामुळे वैभवच्या शैक्षणिक प्रवासाला आणखी नवी दिशा मिळण्याची शक्यता निर्माण झाली आहे. घरची परिस्थिती अत्यंत कठीण असतानाही वैभवने कधीही हार मानली नाही. शेतकरी कुटुंबातील मुलगा म्हणून अनेक आर्थिक आणि सामाजिक अडचणींना सामोरे जात त्याने शिक्षणाची वाट अखंड सुरू ठेवली. या यशाचे श्रेय त्याने आपल्या आई-वडिलांसह , तसेच कठीण काळात साथ देणाऱ्या मित्रपरिवाराला दिले आहे. ''अपयश आले तरी खचून न जाता प्रयत्न सुरू ठेवले, त्यामुळेच आज हे यश मिळाले,'' अशी भावना वैभवने व्यक्त केली. भविष्यात ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शन, शैक्षणिक उपक्रम आणि सामाजिक विकासाच्या क्षेत्रात काम करण्याची इच्छाही त्याने व्यक्त केली आहे. वैभव ठोंबरे याच्या या यशामुळे निवळी गावासह संपूर्ण परिसरातून त्याच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत असून ग्रामीण भागातील युवकांसाठी त्याची यशोगाथा प्रेरणादायी ठरत आहे.

## अग्रलेख...

# ऊर्जासंकट पेलणारे ऊर्जाबळ!

पश्चिम आशियातील दीर्घकाळ सुरू असलेल्या संघर्षामुळे भारतात ऊर्जासंकट गडद झाले आहे हे खरे आहे; पण हे संकट एकट्या भारतातील नाही. जगातील अनेक राज्यांना इराण-अमेरिका युद्धाच्या झळा पोहोचू लागल्या आहेत. भारताप्रमाणे अन्य अनेक देशांना ऊर्जासंकटाचा सामना करावा लागत आहे. अनेक देशांतील ऊर्जासंकटामुळे अर्थव्यवस्था खिळखिळ्या होऊ लागल्या आहेत, इंधनाची तीव्र टंचाई जाणवू लागली आहे. विदेशी चलनाच्या तिजोऱ्या रित्या होऊ लागल्या आहेत. भारताची स्थिती मात्र अजूनही या संकटाशी भक्कमपणे सामना करत आहे. काही आठवड्यांपूर्वी तेल, इंधन वायू टंचाईच्या भीतीने जनतेची तारांबळ उडाली आणि टंचाईसदृश स्थिती निर्माण झाल्याची भावना जनतेमध्ये पसरविण्याच्या विरोधकांच्या प्रयत्नांनी त्यामध्ये भर घातली, पण परिस्थिती पूर्वपदावर आणण्यासाठी सरकारने व यंत्रणांनी प्रामाणिकपणे केलेल्या प्रयत्नांचा अनुभव लोकांस येऊ लागल्यावर विरोधकांचा तो डाव फसला. वस्तुतः सद्यस्थितीत निर्माण झालेल्या ऊर्जासंकटास प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे सरकार जबाबदार नाही, ही बाब जनता जाणते. या परिस्थितीत संकटाचे खापर केंद्र सरकारवर फोडून मोदी यांची प्रतिमा मलिन करण्याचा प्रयत्न करण्याऐवजी परिस्थितीचा सामूहिकपणे सामना करण्यात अधिक समंजसपणा दाखविण्याची अपेक्षा असताना, विरोधकांनी सातत्याने चालविलेल्या सरकारविरोधी मोहिमेचा फुगा पंतप्रधानांच्या ताज्या विदेश दौऱ्यातील यशस्वी शिष्टाईमुळे पुरता फुटल्यात जमा झाला आहे.

गेल्या आठवड्यात १५ मे रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी राजधानीतून संयुक्त अरब अमिरातींच्या दौऱ्यासाठी प्रयाण केले, तेव्हा देशातील विरोधकांचा पवित्रा मोदी यांच्या प्रतिमाभंजनाची सारी हत्यारे सरसावून हल्ल्याच्या तयारीचा होता. विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्या विदेश दौऱ्यांच्या खर्चाचा व त्यांनी जाहीर केलेल्या उत्पन्नाचा कोठेच मेळ बसत नसल्याचा मुद्दा उचलत भाजपाने राहुल गांधी यांना जाब विचारण्यास सुरुवात केली. तोंड लपविण्याची वेळ आलेल्या विरोधकांनी राहुल गांधींच्या बचावासाठी पंतप्रधान मोदी यांच्या विदेश दौऱ्यावर चिखलफेक करावयास सुरुवात केली, हे यामागचे खरे कारण होते. राहुल गांधी यांनी वारंवार केलेल्या विदेश दौऱ्यांमधून कोणते देशहित साधले, या प्रश्नाचे उत्तर विरोधक अजूनही शोधत आहेत; पण मोदी यांच्या प्रत्येक विदेश दौऱ्याने देशाला काय दिले याचे स्वच्छ उत्तर सातत्याने जनतेसमोर येत राहिले आहे. पंतप्रधानांनी नेदरलँडस्, स्वीडन, नॉर्वे, इटली या देशांना भेटी देऊन भारताच्या ऊर्जासंकटाविरोधातील संघर्षाकरिता नवी ऊर्जा गोळा केल्याचे स्पष्ट झाले आहे. सहा दिवसांत पाच देशांचा दौरा करून मायदेशी परतलेल्या पंतप्रधानांनी आपल्या संयुक्त अरब अमिरातीमधील जेमतेम तीन तासांच्या मुक्कामात राष्ट्रपती मोहम्मद बिन जायेद यांच्यासोबतच्या चर्चेनंतर तब्बल सात करार केले आणि पेट्रोलियम पदार्थांच्या राखीव साठ्यांची हमी मिळवून देशापुढील संभाव्य संकटाच्या तीव्रतेवर तोडगा काढला. आता हा देश भारताकरिता तीन कोटी बॅरल कच्चे तेल राखून ठेवणार आहे. युद्धस्थिती अधिकच चिघळली तर निर्माण होणाऱ्या तेलसंकटाच्या काळात हा राखीव साठा भारतासाठी दिलासादायक ठरणार आहे. परंतु देशहिताच्या मुद्यावरही राजकारण करून प्रतिमाहननाची मोहीम राबविण्याच्या भावनेने पछाडलेल्यांनी त्याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले असावे. दौऱ्याच्या दुसऱ्या टप्प्यातील नेदरलँडस्मधील दीड दिवसांच्या मुक्कामात भारताने नेदरलँडबरोबर तब्बल १७ सामंजस्य करार केले. मोबाईल फोन, मोटारींकरिता लागणाऱ्या सेमिकंडक्टर चिप्सच्या उद्योगात स्वयंपूर्ण होण्याकरिता मोदी सरकार करीत असलेल्या प्रयत्नांतील यशाचा टप्पा या करारांमुळे अधिक जवळ आला आहे. केवळ चिप्सच्या आयातीवर अवलंबून असलेल्या देशात नेदरलँडस्च्या सहकार्याने देशातील पहिला सेमिकंडक्टर चिप्स निर्मितीचा प्रकल्प सुरू होणार आहे. स्वीडन, नॉर्वे यांच्यासोबतच्या करारातूनही भारताने द्विपक्षीय व्यापार, द्रवरूप वायू खरेदी, जलविद्युत, अणुऊर्जा, हरित ऊर्जा निर्मितीच्या क्षेत्रातील पुढची पावले टाकण्याकरिता सहकार्याचे बळ मिळविले. हा पंतप्रधानांच्या विदेश दौऱ्याचा सारांश ठरला आहे.

इराण-अमेरिका युद्धामुळे भारतासमोर आर्थिक, मानवी आणि राष्ट्रीय सुरक्षिततेशी संबंधित आव्हाने उभी राहिली आहेत. अशा कोणत्याही प्रसंगातील आव्हाने पेलताना समाज, राजकीय पक्ष, सरकार आणि सरकारी यंत्रणांनी सहकार्याच्या भावनेतून सामंजस्य दाखवावे, अशी अपेक्षा साहजिक असते. या संघर्षाच्या अल्पकालीन आणि दीर्घकालीन परिणामांना सामोरे जाण्यासाठी केंद्र सरकार काही निश्चित धोरणांवर काम करीत असल्याची ग्वाही पंतप्रधान मोदी यांनी फेब्रुवारीत युद्धाचे सावट गडद होत असतानाच दिली होती. पंतप्रधानांचे ते वक्तव्य केवळ देशवासीयांना दिलासा देण्यापुरते शाब्दिक नव्हते. नॉर्डिक परिषदेत भारताची भूमिका मांडताना त्यांनी व्यक्त केलेल्या भावनांमधूनही त्याचे पुरेसे पुरावे मिळाले आहेत. पश्चिम आशियातील संघर्षातून निर्माण झालेल्या जागतिक ऊर्जा संकटाच्या पार्श्वभूमीवर नॉर्वेमधील ओस्लो येथे झालेली तिसरी नॉर्डिक शिखर परिषद भारताच्या धोरणात्मक सुरक्षिततेसाठी महत्त्वाची ठरली असून नॉर्वे, स्वीडन, फिनलंड, डेन्मार्क आणि आईसलँड हे नॉर्डिक देश भारताचे नैसर्गिक भागीदार म्हणून उदयास येत आहेत, ही बाब या परिषदेमुळे अधोरेखित झाली आहे. जगातील एक प्रमुख तेल आणि गॅस निर्यातदार असलेल्या नॉर्वेसह नॉर्डिक देशांसोबत झालेल्या दीर्घकालीन करारांमुळे आगामी दीड दशकातच ऊर्जा पुरवठा आणि हरित ऊर्जा तंत्रज्ञानाची ग्वाही भारतास मिळाली आहे. डेन्मार्क, स्वीडन, नॉर्वे, फिनलंड आणि आईसलँड या नॉर्डिक देशांसोबत भारताने हरित तंत्रज्ञान, संरक्षण, आर्क्टिक संशोधन, डिजिटल पायाभूत सुविधा आणि मुक्त व्यापार या क्षेत्रांत सहकार्य वाढविण्याचा निर्धार व्यक्त केला असून हवामान बदल, स्वच्छ ऊर्जा, जलव्यवस्थापन, नितळ अर्थव्यवस्था आणि ६जी तंत्रज्ञान यांसारख्या क्षेत्रांत संयुक्त संशोधन व गुंतवणुकीचा मार्ग खुला झाला आहे. भारताच्या परराष्ट्र नीतीच्या दृष्टीनेदेखील ही परिषद महत्त्वाची ठरली आहे. एका बाजूला रशियासोबत ऊर्जा व संरक्षण क्षेत्रातील सहकार्याची भागीदारी मजबूत करतानाच युरोपमधील प्रगत, तंत्रज्ञान समृद्ध आणि पर्यावरणाबाबत जागरूक असलेल्या देशांशीही धोरणात्मक नाते जोडण्याच्या प्रयत्नांतून भारताने आपली राजनैतिक स्वायत्तता सिद्ध केली आहे. नॉर्डिक परिषद हे त्यासाठी सज्जड निमित्त ठरले. हरित विकास हा केवळ पर्यावरणापुरता सीमित विषय नसून आंतरराष्ट्रीय संबंध मजबूत करणारे आर्थिक आणि भू-राजकीय साधन आहे, हे या परिषदेत भारताने स्पष्ट केले. विकसित भारत हे पंतप्रधान मोदी यांचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी अक्षय ऊर्जा, कार्बन-कपात, स्मार्ट शहरे, हरित जहाजबांधणी, अत्याधुनिक संरक्षण तंत्रज्ञान, सायबर सुरक्षा, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि डिजिटल प्रशासनात जगात अग्रस्थानी असलेल्या नॉर्डिक देशांचे सहकार्य मिळाले, तर विकसित भारताचे पंतप्रधानांचे स्वप्न पूर्ण करणाऱ्या विकासाच्या प्रक्रियेस वेग येईल. नॉर्डिक परिषदेतील पंतप्रधानांच्या उपस्थितीची या कारणांमुळे नोंद घ्यावी लागेल. थोडक्यात, बदलत्या जागतिक शक्तिसमीकरणात भारत कोणत्याही एका गटाकडे झुकलेला राहणार नाही, तर विविध शक्तिकेंद्रांशी समांतर संबंध ठेवून स्वतःची स्वतंत्र जागतिक भूमिका निर्माण करेल, असा स्पष्ट संदेश या शिखर परिषदेतून भारताने दिला आहे. नॉर्डिक देशांसोबतचे सहकार्य हे त्या व्यापक नव्या भारतीय परराष्ट्र नीतीचेच एक आधुनिक, हरित आणि तंत्रज्ञानाधारित रूप मानावे लागेल. भारत आता केवळ पारंपरिक महासत्तांच्या मर्जीवर अवलंबून राहणारा देश राहिलेला नाही, असा स्पष्ट संदेश नॉर्डिक राष्ट्रांच्या शिखर परिषदेतून भारताने जगाला दिला आहे. इकडे विरोधक मात्र, पत्रकार परिषदेत माध्यमांच्या प्रश्नाला मोदी यांनी बगल दिली, या मुद्यावर राईचा पर्वत करत प्रतिमाहननाची मोहीम पुढे कशी न्यावी यासाठी केविलवाणे प्रयत्न करीत आहेत. गेल्या दशकभरापासून सतत सुरू असलेल्या या मोहिमेचे काय होणार हे आगामी काळात ठरणारच आहे!

---

## अर्थविशेष

**हितेश पारसे**

# रोख व्यवहारावर आयकराची नजर; कोणते व्यवहार ठरू शकतात धोकादायक?

**मोठे रोख व्यवहार करण्यापूर्वी प्रत्येक नागरिक, व्यावसायिक आणि मालमत्ता व्यवहार करणाऱ्यांनी जाणून घ्याव्यात अशा महत्त्वाच्या आयकर तरतुदी**

भारतात डिजिटल व्यवहारांचे प्रमाण वाढत असले तरी आजही अनेक व्यवहार रोख स्वरूपात केले जातात. घरगुती व्यवहार असो, व्यवसायातील व्यवहार असो, मालमत्ता खरेदी-विक्री असो किंवा मित्र-नातेवाईकांमधील आर्थिक मदत असो - ''रोखीने व्यवहार केला तर काय अडचण आहे?'' हा प्रश्न अनेकदा विचारला जातो. परंतु आज परिस्थिती बदलली आहे. आयकर विभागाकडे आता केवळ आयकर रिटर्नची माहिती नसून विविध आर्थिक स्रोतांमधून मिळणाऱ्या माहितीचे विश्लेषण करण्याची क्षमता उपलब्ध आहे. बँक व्यवहार, मालमत्ता व्यवहार, व्यवसायातील उलाढाल, आर्थिक व्यवहारांची नोंद, विविध आर्थिक अहवाल यांचा एकत्रित विचार केला जातो. यामुळे आज प्रश्न फक्त 'व्यवहार झाला का?' एवढाच राहत नाही, तर 'तो व्यवहार कोणत्या माध्यमातून झाला?' हाही तितकाच महत्त्वाचा झाला आहे. अनेक वेळा व्यवहार पूर्णपणे खरा असूनही, व्यवहाराची पद्धत आयकर कायद्याच्या तरतुदींशी विसंगत असल्यास मोठा दंड लागू होऊ शकतो. या लेखात आपण रोख व्यवहारांशी संबंधित महत्त्वाच्या तरतुदी, सामान्य चुका, उदाहरणे आणि नागरिकांनी घ्यावयाची काळजी यांचा सविस्तर आढावा घेणार आहोत.

रोख व्यवहारांवर आयकर विभागाचे लक्ष का वाढले आहे? सरकारचे उद्दिष्ट दोन प्रमुख बाबींशी संबंधित आहे : १. आर्थिक व्यवहारांमध्ये पारदर्शकता वाढवणे. २. अनौपचारिक व अनोंदित व्यवहारांवर नियंत्रण ठेवणे. यासाठी आयकर कायद्यात काही विशेष तरतुदी करण्यात आल्या आहेत. विशेषतः मोठे रोख व्यवहार, कर्ज व्यवहार, मालमत्ता व्यवहार, व्यवसायातील रोख प्राप्ती, उच्च मूल्य आर्थिक व्यवहार. हे विभागाच्या लक्षात येऊ शकतात.

**१. रोखीने कर्ज किंवा ठेव स्वीकारण्यावरील निर्बंध**

(सध्याचा कायदा -- कलम २६९ एसएस नवीन आयकर कायदा - कलम १८५) अनेक वेळा व्यवसायात किंवा वैयक्तिक गरजेत लोक एकमेकांकडून पैसे घेतात. उदा. मित्राकडून व्यवसायासाठी पैसे घेणे, नातेवाईकांकडून आर्थिक मदत घेणे, दुकानासाठी भांडवल उभे करणे, व्यवसायात तात्पुरते कर्ज घेणे. परंतु आयकर कायदा अशा व्यवहारांसाठी विशिष्ट पद्धत सांगतो. जर २०,००० किंवा त्यापेक्षा जास्त रक्कम खालील स्वरूपात स्वीकारली जात असेल : कर्ज, ठेव, विशिष्ट आगाऊ रक्कम. तर ती रक्कम रोखीने स्वीकारणे टाळावे. ही मर्यादा इतकी कमी का ठेवली आहे? कारण अशा व्यवहारांद्वारे अनेकदा अनौपचारिक व्यवहार, नोंद नसलेली आर्थिक देवाणघेवाण किंवा उत्पन्न लपवण्याची शक्यता निर्माण होऊ शकते.

उदाहरण - १. श्री अ यांनी मित्राकडून व्यवसायासाठी ३ लाख रोख घेतले. दोघांनी पावती लिहिली. नंतर पैसे परतही केले. अनेकांना वाटेल की व्यवहार खरा असल्यामुळे अडचण नाही. परंतु व्यवहाराची पद्धत तपासली जाऊ शकते.

उदाहरण - २. वडिलांनी मुलाला व्यवसायासाठी ५०,००० रोख दिले. व्यवहार कौटुंबिक असल्यामुळे नियम लागू होणार नाहीत असा गैरसमज अनेकदा दिसतो. व्यवहाराचे स्वरूप आणि परिस्थिती महत्त्वाची असते.

दंड किती लागू होऊ शकतो? : (सध्याचा कायदा -कलम २७१ डी) जर तरतूद लागू झाली तर काही परिस्थितींमध्ये स्वीकारलेल्या रकमेइतकाच दंड लागू होऊ शकतो.

**२. एका व्यक्तीकडून मोठी रोख रक्कम स्वीकारणे** - सर्वाधिक दुर्लक्षित नियम (सध्याचा कायदा- कलम २६९ एसटी नवीन आयकर कायदा- कलम १८६). ही तरतूद सर्वसामान्य नागरिकांनी सर्वाधिक समजून घेण्याची गरज आहे. साधारणपणे एका व्यक्तीकडून २ लाख किंवा त्यापेक्षा जास्त रक्कम रोखीने स्वीकारणे टाळावे. ही मर्यादा खालील तीन परिस्थितींमध्ये लागू होऊ शकते : (अ) एका दिवसात. उदाहरण : ग्राहकाने एका दिवसात २.१० लाख रोख दिले. (ब) एका व्यवहारासाठी. उदाहरण : फ्लॅट बुकिंगसाठी : पहिला हप्ता - १ लाख, दुसरा हप्ता - १.२० लाख. एकूण व्यवहार एकाच उद्देशासाठी असल्यास जोखीम निर्माण होऊ शकते. (क) एका कार्यक्रमाशी संबंधित. उदाहरण : लग्न आयोजनासाठी अनेक वेळा रोख रक्कम घेण्यात आली. एकूण रक्कम मोठी असल्यास व्यवहार तपासला जाऊ शकतो.

दंड किती? (सध्याचा कायदा - कलम २७१डीए) काही परिस्थितींमध्ये स्वीकारलेल्या रकमेइतका दंड लागू होऊ शकतो.

**३. व्यवसाय करणाऱ्यांनी विशेष काळजी का घ्यावी?**

व्यवसायात खालील व्यवहार सर्वाधिक जोखीम निर्माण करतात : आगाऊ बुकिंग, रोखीने विक्री, मोठे ग्राहक पेमेंट, कंत्राटी देयके, सेवा शुल्क, व्यापारी उचल. उदाहरण : दुकानदाराने एका ग्राहकाकडून २.५० लाख रोख घेतले... व्यवहार बिलामध्ये दाखवला. जीएसटी भरला. तरीही रोख व्यवहाराची पद्धत स्वतंत्रपणे तपासली जाऊ शकते.

**४. मालमत्ता व्यवहार - सर्वाधिक संवेदनशील क्षेत्र**

रिअल इस्टेटमध्ये अनेकदा असे व्यवहार दिसतात : टोकन रक्कम, बुकिंगसाठी आगाऊ रक्कम, ताबा रक्कम, अनौपचारिक रोख व्यवहार. येथे लोक असा विचार करतात- 'नोंदणी झाली की सर्व ठीक.' परंतु आज व्यवहारातील निधीचा स्रोत, पेमेंट पद्धत आणि दस्तावेज यांना तितकेच महत्त्व आहे. उदाहरण : फ्लॅटची किंमत ६० लाख. त्यातील ५ लाख रोख आणि उर्वरित बँकेत. अशा व्यवहारांमध्ये भविष्यात पुराव्याचे प्रश्न निर्माण होऊ शकतात.

**५. काही सामान्य गैरसमज :** ''वेगवेगळ्या दिवसांत पैसे घेतले तर चालते'' नेहमीच तसे नसते. ''कुटुंबातील व्यवहारांवर नियम लागू होत नाही'' प्रत्येक परिस्थिती स्वतंत्र असते. ''रिटर्नमध्ये दाखवले म्हणजे सुरक्षित'' नोंद करणे आणि व्यवहाराची पद्धत हे वेगळे विषय आहेत. ''जीएसटी भरला म्हणजे आयकर प्रश्न येणार नाही'' दोन्ही कायदे स्वतंत्र आहेत.

**६. मग नागरिकांनी काय करावे? :** मोठ्या व्यवहारांसाठी पुढील पद्धत वापरणे अधिक सुरक्षित ठरू शकते - यूपीआय, एनईएफटी, आरटीजीएस, खातेदार चेक, अधिकृत बँकिंग माध्यम तसेच व्यवहाराचे कारण लिहून ठेवा, पावत्या जतन करा, मालमत्ता व्यवहारात स्वतंत्र नोंदी ठेवा, व्यवसायातील व्यवहार वेळेवर नोंदवा.

**नवीन आयकर कायद्यात काय बदलले? :** नवीन आयकर कायद्यात अनेक कलमांचे क्रमांक बदलण्यात आले आहेत.

| सध्याचा कायदा | नवीन आयकर कायदा |
| --- | --- |
| कलम २६९एसएस | कलम १८५ |
| कलम २६९एसटी | कलम १८६ |

मात्र, मूलभूत उद्देश बदललेला नाही - मोठ्या रोख व्यवहारांवर नियंत्रण आणि आर्थिक पारदर्शकता.

**निष्कर्ष :** रोख व्यवहार करणे म्हणजे प्रत्येक वेळी चुकीचे असे नाही. पण आजच्या काळात मोठे व्यवहार करताना फक्त विश्वास पुरेसा नाही; पुरावा, योग्य माध्यम आणि योग्य दस्तावेजीकरण आवश्यक आहे. कारण अनेक वेळा करदात्याला अडचण व्यवहारामुळे नाही, तर व्यवहार कसा केला यामुळे निर्माण होते. लक्षात ठेवा - ''मोठा व्यवहार करा, पण योग्य पद्धतीने करा.''

९०९६३३२३५३

(लेखक कर व मालमत्ता हस्तांतरण सल्लागार आहेत.)

---

## वेध

**प्रफुल्ल व्यास**

# जबाबदारी घरच्यांची की शेजाऱ्यांची?

आज भारत एका विचित्र वळणावर उभा आहे. एका बाजूला देश चंद्रावर पोहोचतो आहे, जगाला डिजिटल क्रांतीचे धडे देतो आहे, तर दुसऱ्या बाजूला आपल्या तरुण पिढीच्या नसांमध्ये हळूहळू विष उतरते आहे. हे विष म्हणजे अमली पदार्थ. काही दिवसांपूर्वी दिल्लीत १८२ कोटी रुपयांचा 'कॅप्टागॉन' नावाचा सिंथेटिक ड्रग पकडला गेला. या ड्रगला जगभरात 'जिहादी ड्रग' म्हणून ओळखले जाते. हा एका पिढीला आतून पोखरण्याचा, समाजाला कमकुवत करण्याचा आणि राष्ट्राच्या भवितव्यावर घाला घालण्याचा विषय आहे. युवकांना नशेचा आधार का घ्यावा वाटतो? या प्रश्नाचे उत्तर शोधण्याची गरज आहे. आज अनेक ठिकाणी सिगारेट, दारू, हुक्का, व्हेप्स, गोळ्या, पावडर या गोष्टी आधुनिकतेचे प्रतीक बनवल्या गेल्या आहेत.



आज अनेक घरांमध्ये पैसा वाढला, पण संवाद कमी झाला. महागडे मोबाईल आले, पण मायेची दोन वाक्ये हरवली. संस्कारांना वाटाण्याच्या अक्षता लावल्या जात आहेत. पालक दिवसभर कामात व्यस्त आणि मुलं मोबाईलमध्ये! मुलगा अचानक एकटा राहू लागतो, चिडचिड करतो, रात्री उशिरा बाहेर राहतो, पैशांची मागणी वाढवतो. पण, अनेक पालक वय वाढते आहे म्हणून दुर्लक्ष करतात. जेव्हा वास्तव समोर येते, तेव्हा उशीर झालेला असतो. यात समाजाचाही मोठा दोष आहे. आजच्या तरुणावर प्रचंड ताण आहे. स्पर्धा, बेरोजगारी, अपयश, नात्यांमधील अस्थिरता आणि सोशल मीडियाच्या जाळ्यात अडकतो आहे. पैसे मिळवण्यासाठी सायबर गुन्ह्यांचे 'वॉर' वाढले आहेत. ज्यांच्या हातात उद्याचा भारत आहे, तेच जर नशेत बुडाले तर देशाच्या भविष्याचे काय? हे फक्त पोलिस किंवा सरकारचे काम नाही. हा समाजाचा लढा आहे. पालकांनी जागे झाले पाहिजे. शाळा-महाविद्यालयांनी फक्त गुणांची स्पर्धा न घेता जीवन जगण्याचे शिक्षण दिले पाहिजे. आज नशेला 'ग्लॅमर' मिळाले आहे. चित्रपट, वेब सीरिज, रील्स यामध्ये धूम्रपान, दारू, ड्रग्ज यांना स्टाईल समजले जाते. तिथे धूर सोडतो आणि टाळ्या मिळवतो. पण त्याच धुराने हजारो तरुणांचे आयुष्य जळते, हे कुणी दाखवत नाही. आज गरज आहे ती कठोर कारवाईसोबत सामाजिक जागृतीची. दिल्लीत सापडलेल्या 'कॅप्टागॉन'सारख्या ड्रगला 'जिहादी ड्रग' म्हटले जाते. कारण जगातील अनेक तपास यंत्रणांनी याचा संबंध युद्धग्रस्त भागांशी, हिंसक नेटवर्कशी आणि तस्करीच्या साखळीशी जोडला आहे. हे ड्रग माणसाला कृत्रिम ऊर्जा देते, झोप कमी करते. म्हणजेच देवदत्त विचारशक्तीवरच हल्ला करते. त्यामुळे ड्रग माफियांना कोणतीही दया दाखवली जाऊ नये. कारण हे लोक पैशासाठी पिढ्या बरबाद करतात. आपण आपल्या मुलांना फक्त महागडे फोन देणार आहोत की मजबूत संस्कारही देणार आहोत? आपण त्यांना पार्टीची संस्कृती देणार का? आपण फक्त पैसे देऊन जबाबदारी संपवणार आहोत का? ड्रग्जची आग शहरातून गावाकडे, कॉलेजमधून शाळेकडे आणि बाहेरून घरात पोहोचली आहे. अजूनही आपण डोळे झाकून बसलो तर उद्या खूप उशीर झालेला असेल. आपण पुढच्या पिढीला उज्ज्वल भविष्य देत आहोत की विनाश? लक्षात ठेवा, सीमेवरचा शत्रू देशावर हल्ला करतो. पण, ड्रग्ज देशाच्या भविष्यावर हल्ला करतात. कॅप्टागॉन हा एक सिंथेटिक स्टिम्युलंट ड्रग्ज आहे. १९६० च्या दशकात जर्मनीत फेनेथाइलीन तयार झाले. दिल्लीत जप्त केलेल्या २२७.७ किलो कॅप्टागॉनची अंदाजे किंमत सुमारे १८२ कोटी रुपये असल्याचे सांगितले जाते. या ड्रग्जची सुरुवात जर्मनी येथे झाली. १९६०-७० च्या दशकात त्याचा वैद्यकीय वापर होता. नंतर उत्पादन बंद झाले, पण पुढे अवैध उत्पादन वाढत गेले. या ड्रगची तस्करी प्रामुख्याने सौदी अरब, जॉर्डन, यूएई, कुवैत, इराक, लेबनान अशा मध्य पूर्वेकडील देशांकडे होते; काही अहवालांमध्ये युरोपमध्येही तस्करी होत असल्याचे नमूद आहे. भारतातून पकडलेले ड्रग्ज मध्य पूर्वेकडे जाणार होते. या जिहादी ड्रग्जच्या अवैध वाहतुकीसाठी दिल्लीत सीरियन नागरिकाला अटक करण्यात आली. हा अमली पदार्थ कंटेनरमध्ये वेगळ्या मालाच्या नावाखाली पाठवत घरगुती सामानात लपवून पुढे नेण्याचा प्रयत्न होता. दिल्लीतील तपास यंत्रणेने हे ड्रग्ज पकडले असले तरी या घटनेमुळे कायदा व सुव्यवस्थेवर पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह उपस्थित होते. पण, या गोष्टींना घरातूनच प्रतिबंध घालण्याची सुरुवात होणे गरजेचे आहे. दुर्दैवाने काही परिवार बऱ्याचदा ओल्या पार्ट्यांमध्ये चीअर्स करीत असतात. अशा वेळी कोण कोणाला अडवणार आहे. तुम्ही चंगळ करणार आहात. पण, पुढची पिढी वाया जाते आहे, याची जाण घरच्यांनी ठेवायची की शेजाऱ्यांनी?

९८८१९०३७६५

---


## तंत्रवेध

**डॉ. दीपक शिकारपूर**

# मोल्टबुक : एआय एजंट्सचा समाज

आजचा काळ वेगाने बदलत आहे. विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे आपल्या जगण्याच्या पद्धतीत बदल झाला आहे. या बदलांमध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेचा मोठा वाटा आहे. मोल्टबुक हे एक आधुनिक डिजिटल व्यासपीठ कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित सेवा आणि साधने उपलब्ध करून देते. या व्यासपीठाचा मुख्य उद्देश म्हणजे व्यक्ती, विद्यार्थी, शिक्षक, उद्योजक आणि संस्था यांना माहिती, लेखन, विश्लेषण आणि संवादासाठी मदत करणे. हे व्यासपीठ वापरकर्त्यांना सोप्या पद्धतीने प्रश्न विचारण्याची आणि त्यावर त्वरित उत्तर मिळविण्याची सुविधा देते. हे पूर्णपणे कृत्रिम बुद्धिमत्ता एजंटसाठी तयार केलेले सामाजिक जाळे आहे. या ठिकाणी माणसांना प्रवेश नाही. येथे फक्त यंत्रे एकमेकांशी संवाद साधतात. म्हणजेच संगणक प्रणाली, स्वयंचलित कार्यक्रम आणि बुद्धिमान सॉफ्टवेअर हेच एकमेकांशी चर्चा करतात, माहितीची देवाणघेवाण करतात आणि प्रतिसाद देतात. 'ओपनक्लॉव' नावाच्या मुक्त-स्रोत एआय एजंट फ्रेमवर्कचा वापर करून अनेक एआय एजंट तयार झाले. हे एजंट्स ई-मेल व्यवस्थापन, चॅट प्रतिसाद, कामांचे नियोजन अशी विविध कामे करू शकतात. हे व्यासपीठ मानवी प्रोग्रामरने तयार केले असले, तरी त्यात त्याने स्वतःच्या एआय सहायकाचा वापर करून 'मोल्टबुक'ची प्रणाली आणि काही कामे एजंटवर सोपविली आहेत.

लाँच होताच 'मोल्टबुक' त्वरित लोकप्रिय झाले आणि काहीच दिवसात लाखो एजंट्स या नेटवर्कवर सक्रिय झाले. परंपरागतपणे एआय मॉडेल हे मानवी वापरकर्त्यांच्या प्रश्नांची उत्तरे देतात. मोल्टबुकचा उद्देश केवळ संवाद नाही, तर एआय एजंटमध्ये सामूहिक समन्वय, व्यवस्थापन आणि सहयोगाचे नमुने तयार होणे हा आहे. तिथे एजंट्स स्वतः प्रश्न विचारू शकतात, उत्तर देऊ शकतात, उत्तरांचे मूल्यांकन करू शकतात आणि सुसंगत माहिती तयार करू शकतात. मोल्टबुक हा एक नवीन प्रयोगात्मक पॉइंट आहे जिथे एआय एजंट्स स्वतः संवाद साधतात आणि सूचनांचे आदानप्रदान करतात. याचा उदय म्हणजे मानवी-एआय संवादाच्या पुढील टप्प्याचा प्रारंभ मानला जात आहे. या व्यासपीठाची खास वैशिष्ट्ये अशी आहेत की, येथे संवाद पूर्णपणे यंत्र ते यंत्र अशा स्वरूपात होतो. प्रत्येक एजंट हा स्वतंत्रपणे कार्य करणारा संगणकीय घटक असतो. त्याला काही उद्दिष्टे दिलेली असतात, तो माहिती गोळा करू शकतो, विश्लेषण करू शकतो आणि त्यानुसार प्रतिक्रिया देऊ शकतो. मोल्टबुकवर असे अनेक एजंट्स एकत्र येतात आणि परस्पर संवाद साधतात. या संवादांदरम्यान एक विलक्षण गोष्ट दिसून आली. हे स्वयंचलित एजंट्स फक्त साधे प्रश्नोत्तर करत नव्हते, तर ते एकत्रितपणे विचार करायला लागले होते. म्हणजेच एका एजंटने दिलेल्या माहितीवर दुसरा एजंट प्रतिक्रिया देत होता, त्यात सुधारणा करत होता, तिसरा एजंट नवीन दृष्टिकोन मांडत होता. अशा प्रकारे सामूहिक विचार प्रक्रिया सुरू झाली. काही वेळाने असे जाणवले की, हे एजंट्स केवळ स्वतंत्रपणे काम करत नाहीत, तर ते एकमेकांशी समन्वय साधत आहेत. ते स्वतःचे गट तयार करत आहेत, समान प्रकारची उद्दिष्टे ओळखत आहेत आणि त्यानुसार योजना आखत आहेत. यामुळे असे भासू लागले की त्यांच्यात सामायिक ध्येय निर्माण होत आहेत.



उदाहरणार्थ, काही एजंटांना माहिती व्यवस्थापनाचे कार्य दिले असेल, तर ते एकत्र येऊन माहिती अधिक कार्यक्षम पद्धतीने कशी हाताळता येईल, यावर चर्चा करू शकतात. काही एजंट विश्लेषणात तज्ज्ञ असतील, तर काही निर्णय प्रक्रियेत ते आपापली क्षमता वापरून सामूहिक निष्कर्ष काढू शकतात. मोल्टबुक व्यासपीठाचे प्रमुख वैशिष्ट्य म्हणजे त्याची संवादात्मक रचना. वापरकर्ता मजकुराच्या स्वरूपात प्रश्न विचारू शकतो आणि प्रणाली त्यावर आधारित माहिती, स्पष्टीकरण, निबंध, अहवाल किंवा मार्गदर्शन देते. हे तंत्रज्ञानाच्या दृष्टीने मोठे पाऊल मानले जाऊ शकते. तथापि, यामुळे काही प्रश्नही निर्माण होतात. एजंट सामूहिक ध्येय तयार करत असतील, तर ती ध्येये कोण ठरवते, ती पूर्णपणे मानवी नियंत्रणाखाली आहेत का, त्यांनी स्वतःची उद्दिष्टे आखली तर त्याचा परिणाम काय होईल, अशा परिस्थितीत पारदर्शकता, नियंत्रण व नैतिकतेचा विचार करणे आवश्यक आहे.

अशा व्यासपीठांमुळे स्वयंचलित निर्णय प्रक्रिया वाढेल. एजंट एकमेकांशी संवाद साधून माहितीची देवाणघेवाण करतील, विश्लेषण करतील आणि काही प्रमाणात स्वतः निर्णय सुचवतील. उद्योग, बँकिंग, आरोग्य, वाहतूक आणि प्रशासन यामध्ये जलद आणि अचूक निर्णय घेणे शक्य होईल. एजंट सामूहिक विचार आणि समन्वय साधू लागले तर मोठ्या प्रकल्पांचे नियोजन आणि अंमलबजावणी अधिक वेगाने होऊ शकते. उदा. पुरवठा साखळी, उत्पादन नियोजन किंवा आपत्ती व्यवस्थापनात यंत्रे एकत्रितपणे काम करू शकतील. डेटा नोंदवणे, प्राथमिक विश्लेषण, साधे ग्राहक सेवा कार्य, पुनरावृत्तीची कार्यालयीन कामे यांसारखी कामे स्वयंचलित होऊ शकतात. त्यामुळे अशा प्रकारच्या नोकऱ्यांची गरज कमी होऊ शकते; त्याचबरोबर काही नवीन नोकऱ्या निर्माण होतील. लोकांना नवीन कौशल्ये शिकावी लागतील. फक्त यांत्रिक कामांपेक्षा सर्जनशीलता, समस्या सोडविण्याची क्षमता, मानवी संवाद कौशल्य आणि नेतृत्व यांना अधिक महत्त्व मिळेल. बदल स्वीकारणारेच पुढे जातील. मोल्टबुकसारख्या व्यासपीठाचे भवितव्य आशादायक आहे, पण ते संतुलित पद्धतीने विकसित करणे आवश्यक आहे. तंत्रज्ञान हे साधन आहे, पर्याय नाही. योग्य नियम, नैतिकता आणि मानवी नियंत्रण ठेवले गेले तर ते मानवाच्या प्रगतीस मदत करू शकते. अन्यथा, नोकऱ्यांवर आणि समाजावर नकारात्मक परिणाम होऊ शकतो. भविष्य हे पूर्णपणे यंत्रांचे नसून मानव आणि यंत्र यांच्या समन्वयाचे असेल. समाज बदलाशी जुळवून घेणाराच यशस्वी ठरेल.

(लेखक उद्योजक व संगणक साक्षरता प्रसारक आहेत.)

---

## वाचक पत्रे

### पंतप्रधानांना 'एकेरी' संबोधणारा गांधी

एखाद्याच्या घरात दिवटं जन्माला आलं की घरचे म्हणतात, 'कोणतं पाप केलं होतं की हे कारटं जन्माला आलं.' अख्ख्या खानदानीचा हिशोब लागून जातो अशावेळी. जन्मपत्रिकेतही असे पापी ग्रह आपोआपच एकत्र होऊन जातात. भारत देशात अनेक महान क्रांतिकारक, नेते, गायक, अभिनेते आणि स्वतःच्या जीवनाला महान बनविणारे महानुभाव जन्माला आले. त्यांचे कार्य उदात्त होऊन सतत प्रेरणादायी झाले. पण काहींचा जन्म हा प्रेरणादायी की वेदनादायी असाच प्रश्न पडतो. त्यात अग्रस्थानी येतात आमचे लोकसभेचे विरोधी पक्षनेते. या गांधींना मॅनर्सचे धडे देणे गरजेचे आहे. एक तर लोकसभेत प्रगल्भ वाटावं असं व्यक्तिमत्त्व नाही. बोलण्यात कुठेही ताळतंत्र नाही. देशावरील संकटाचे वेळी स्वत: इंदिरा गांधी यांनी विरोधी पक्षातील अटलबिहारी वाजपेयी यांना चर्चेसाठी विदेशात पाठवलं होतं. इकडे विचार केला तर यांना कुठं चर्चेसाठी पाठवता? हेच 'चर्चा' बनून जातात. ७८ वा जागतिक सन्मान झालेले पंतप्रधान मोदी हे उगाच परदेश दौरे करत नाहीत. देशहिताच्या गोष्टीसाठीच ते जातात.

अमेरिका-इरान युद्धात अख्खे जग होरपळत असताना आमच्या घरात आजही पेट्रोल, गॅस नियमित येतोय. पण आपण अती वापर केला तर त्याची कमतरता भासू नये यासाठी काटकसर मोदींनी सुचवली; त्यात वाईट काय आहे. आपण आपल्या घरात हे करतोच की. बरं, विरोधी नावच हे विरोध करण्यासाठी पडलंय. करा ना विरोध, सुचवा ना उपाय, काढा ना मोर्चे...! हे काहीच न करता 'वो रोएगा, देख लेना...' असे एकेरी भाषेतले बोलणे; तेही देशाच्या पंतप्रधान, गृहमंत्री या लोकांसाठी; तेही ते विदेश दौऱ्यात भारताचा सन्मान वाढवत आहे अशा वेळी! कमाल आहे राहुल गांधींची... कधी सुधारतील हे?

**मनोज वैद्य**/९८२२९४९२६०

### पर्यावरण जागृती अन् वृक्षांविषयी जिव्हाळा

नवी मुंबई येथे वृक्षाला खिळे मारणे, त्यावर जाहिराती लावणे व ते खराब करणे यावर बंदी घालण्यात आली होती. कायद्याचे उल्लंघन केल्यास १० हजारांचा दंड अशी तरतूदही होती. तथापि अजूनही कायद्याचे उल्लंघन चालू असून इतर शहरांची स्थिती काही वेगळी नाही. पुणे, पिंपरी चिंचवड शहरात हीच परिस्थिती कायम आहे. लोकांना जाहिराती लावण्यासाठी वृक्ष हेच सुरक्षित ठिकाण आहे काय? सध्या पर्यावरण अतिशय महत्त्वाचे आहे. त्याची जपणूक करणे हे प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य असताना लोक कायदा का मोडतात? यासाठी प्रबोधन करणे आवश्यक आहे. शाळांमधून जागृती केल्यास त्याचा परिणाम निश्चितच होईल. मुले संवेदनशील असतात. त्यांना योग्य ते समजाविल्यास ते भावी काळात अशा कृत्यांना आळा घालू शकतील. नागरिकांनासुद्धा जनजागृतीमुळे फरक पडण्याची शक्यता आहे. तापमान मोठ्या प्रमाणात वाढले आहे. या गोष्टीला जरा आळा घालवायचा असेल तर झाडांचे संरक्षण करावेच लागेल.

**शांताराम वाघ**/पुणे

### योग दिन आणि नीट फेरपरीक्षा

शिक्षण क्षेत्रातील सध्याची सर्वात मोठी चर्चा म्हणजे नीट युजी परीक्षेतील गोंधळ. त्यातच आता केंद्र सरकारने जाहीर केलेल्या फेरपरीक्षेच्या वेळेवरून एका नव्या वादाला तोंड फुटले आहे. आंतरराष्ट्रीय योग दिनाचे औचित्य साधून प्रशासकीय यंत्रणेवर येणारा ताण लक्षात घेता, ही परीक्षा दुपारी घेण्याचा निर्णय घेण्यात आला. मात्र, अनेक राज्यांत सध्या प्रचंड उष्णतेची लाट पाहता, हा निर्णय लाखो विद्यार्थ्यांसाठी शारीरिक आणि मानसिक छळ ठरू शकतो, अशी भीती व्यक्त केली जात आहे. नॅशनल टेस्टिंग एजन्सीने दिलेल्या माहितीनुसार, नीट यूजी २०२६ ची फेरपरीक्षा २१ जून २०२६ रोजी दुपारी २ ते ५.१५ या वेळेत होणार आहे.

खरं तर ही परीक्षा सकाळी घेण्याचे नियोजन होते. मात्र, त्याच दिवशी देशभरात आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा केला जाणार आहे. सरकारी स्तरावर सामूहिक योग प्रात्यक्षिके आणि विविध कार्यक्रमांचे आयोजन होणार असल्याने सकाळी पोलिस बंदोबस्त, वाहतूक व्यवस्था आणि प्रशासकीय यंत्रणा व्यस्त असेल. यामुळे सकाळच्या सत्रात परीक्षा घेणे शक्य नसल्याचे शिक्षण मंत्रालयाने स्पष्ट केले आहे. या निर्णयामुळे सर्वात मोठा प्रश्न निर्माण झाला आहे तो म्हणजे वाढत्या तापमानाचा. भरदुपारी घराबाहेर पडणे आणि कडक उन्हात प्रवास करणे विद्यार्थ्यांसाठी अत्यंत त्रासदायक ठरणार आहे. भीषण उष्णतेत घामाघूम होत केंद्रावर पोहोचून पेपर सोडवताना विद्यार्थ्यांची एकाग्रता टिकणे कठीण होईल; तसेच उष्माघाताचा धोका वाढू शकतो.

या निर्णयामुळे पालक आणि विद्यार्थ्यांमध्ये संतापाची लाट आहे. प्रशासकीय सोयीसाठी मुलांच्या आरोग्याशी खेळ का? असा सवाल विचारला जात आहे. आंतरराष्ट्रीय योग दिन हा आरोग्य आणि मनःशांतीचा संदेश देणारा दिवस आहे; त्याच दिवशी भर दुपारी होणाऱ्या परीक्षेमुळे विद्यार्थ्यांची शांती हरवल्याचे चित्र दिसत आहे. प्रशासनाने केवळ यंत्रणेचा विचार न करता विद्यार्थ्यांच्या आरोग्याचा आणि सुविधेचा विचार करून योग दिनाचे कार्यक्रम सायंकाळी आयोजित करणे अधिक गरजेचे होते. यावरून एक गोष्ट लक्षात येते की, योग आणि नीट आयोजकांमध्ये समन्वय आणि आपसी समज तर नाही. आता या कडाक्याच्या उन्हात लाखो विद्यार्थी नीट परीक्षा देणार; सोबतच उन्हाची पण परीक्षा देणार आहेत.

**प्रा. विलास डोईफोडे**/९७६६२२९१९९

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

# धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.




## धाराशिव शहरातील गांधी नगर परिसरातून इनोव्हा क्रिस्टा चोरी

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२२ मे -**

आनंदनगर पोलीस ठाणे येथे वाहन चोरीप्रकरणी गुन्हा नोंद करण्यात आला आहे. फिर्यादी श्रीकांत वाल्मीक ढवळे (वय ३१) हे मूळ रा. वडगाव रमाई, ता. शिरुर, जि. पुणे असून सध्या शांतिनिकेतन कॉलनी गांधी नगर येथे वास्तव्यास आहेत.

फिर्यादी यांच्या मालकीची अंदाजे ५ लाख रुपये किमतीची टोयोटा इनोव्हा क्रिस्टा (क्र. एमएच १२ एजे ९३९६) ही चारचाकी गाडी दि.१८ मे रोजी रात्री १० ते दि.१९ मे रोजी सायंकाळी ६ वाजण्याच्या दरम्यान शांतिनिकेतन गांधी नगर परिसरातून अज्ञात व्यक्तीने चोरून नेल्याची घटना घडली.




याप्रकरणी श्रीकांत ढवळे यांनी दि.२१ मे २०२६ रोजी दिलेल्या फिर्यादीवरून आनंदनगर पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता कलम ३०३ (२) अन्वये अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस करीत आहेत.

## संक्षिप्त वृत्त...



### डॉ. अशोक महाजनांकडून एकलव्य विद्या संकुलाची पाहणी

**तुळजापूर, दि.२२ मे -**

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू डॉ. अशोक महाजन यांनी एकलव्य विद्या संकुलास भेट देत संस्थेच्या शैक्षणिक व सामाजिक उपक्रमांची माहिती घेतली. यावेळी संस्थेच्या वतीने त्यांचा यथोचित सत्कार करण्यात आला. डॉ. महाजन यांनी शाळा, वसतिगृह तसेच विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध विविध सुविधांची पाहणी केली. यामध्ये ग्रंथालय, विज्ञान प्रयोगशाळा, क्रीडा क्षेत्रातील यश, मुलांचे व मुलींचे वसतिगृह तसेच प्रस्तावित कौशल्य विकास प्रशिक्षण केंद्राची माहिती त्यांना देण्यात आली. विद्यार्थ्यांना दिल्या जाणाऱ्या शैक्षणिक व निवासी सुविधांबाबत त्यांनी समाधान व्यक्त करत संस्थेमार्फत राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांचे कौतुक केले. यावेळी भटके विमुक्त विकास प्रतिष्ठानचे सदस्य ॲड. जनक पाटील, डॉ. प्रणिता गडेकर, मुख्याध्यापक विठ्ठल म्हेत्रे, फुलाजी ताटीकुंडलवार तसेच संस्थेचे कर्मचारी उपस्थित होते.



### केशेगाव येथे 'सोनाई ट्रेनिंग इन्स्टिट्यूट'चा शुभारंभ

**इटकळ, दि.२२ मे -**

तालुक्यातील केशेगाव येथे 'सोनाई ट्रेनिंग इन्स्टिट्यूट' या नव्या उपक्रमाचा उद्घाटन सोहळा गुरुवार, दि.२१ मे रोजी उत्साहात पार पडला. ग्रामीण भागातील विद्यार्थी, युवक-युवती तसेच गावपातळीवरील कार्यकर्त्यांमध्ये आत्मविश्वास वाढावा व त्यांना प्रभावी वक्तृत्वाचे प्रशिक्षण मिळावे, या उद्देशाने सामाजिक कार्यकर्ते लक्ष्मण क्षीरसागर यांनी या संस्थेची स्थापना केली आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरपंच मल्लिनाथ गावडे होते, तर गट विकास अधिकारी भिंगार दिवे यांच्या हस्ते संस्थेचे उद्घाटन करण्यात आले. प्रारंभी उपस्थित मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. यावेळी नगिना कांबळे, सुरेश आप्पा भिसे, सुधाकर पाटोळे, किरण कांबळे, सचिन घोडके, प्राचार्य संगमेश्वर जळकोटे, आशोक साखरे, किसन देडे, सर्वेश्वर पाटील, फिरोज मुजावर, केशव गायकवाड आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सुनिता, सागर, अजय, सतीश, समर्थ, आर्यन व आर्या यांनी विशेष परिश्रम घेतले.

### ॲड. गणेश पाटील यांचे निधन

**तुळजापूर, दि.२२ मे -**

तालुक्यातील दहिवडी येथील रहिवासी तथा मुंबई उच्च न्यायालयाच्या छत्रपती संभाजीनगर खंडपीठातील



वकील ॲड. गणेश विलास पाटील (वय ४०) यांचे गुरुवारी पुणे येथे उपचारादरम्यान निधन झाले. काही दिवसांपासून प्रकृती अस्वस्थ असल्याने त्यांच्यावर खासगी रुग्णालयात उपचार सुरू होते. मात्र उपचारादरम्यान त्यांची प्राणज्योत मालवली. शुक्रवारी दहिवडी येथील हिंदू स्मशानभूमीत शोकाकुल वातावरणात त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात आई-वडील, पत्नी, एक मुलगी, भाऊ, बहीण असा परिवार आहे. त्यांच्या निधनाने दहिवडीसह तुळजापूर परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

## ऊस बिलासाठी शेतकऱ्यांचा एल्गार; सोमवारी धडक मोर्चा



**तभा वृत्तसेवा**
**अणदूर, दि.२२ मे -**

शेतकऱ्यांच्या घामाचे मोल देण्यास टाळाटाळ करणाऱ्या गोकुळ शुगर फॅक्टरी प्रशासनाविरोधात ऊस उत्पादक शेतकऱ्यांमध्ये तीव्र संतापाची लाट उसळली आहे. सात ते आठ महिन्यांपूर्वी कारखान्याला ऊस पुरवठा करूनही अद्याप हक्काचे ऊस बिल जमा झाले नसल्याने शेतकरी अक्षरशः आर्थिक संकटात सापडले आहेत. या विरोधात आवाज उठवण्यासाठी दि.२५ मे रोजी सोलापूर जिल्हाधिकारी कार्यालय समोर ऊस बिल मिळेपर्यंत धडक मोर्चा व बेमुदत ठिय्या आंदोलन करण्यात येणार आहे.

एकीकडे शेतीचा वाढता खर्च, मुला-मुलींचे शिक्षण, लग्नसमारंभ, शेती मशागतीचा खर्च आणि सण-उत्सव यांचा भार सांभाळताना शेतकरी पूर्णपणे कर्जबाजारी व हतबल झाला आहे. गेल्या अनेक महिन्यांपासून ऊस उत्पादक शेतकरी आपल्या पैशासाठी कारखान्याचे उंबरठे झिजवत आहेत. मात्र कारखान्याचे चेअरमन दत्ताभाऊ शिंदे यांच्याशी संपर्क होत नसल्याची तक्रार शेतकऱ्यांनी केली आहे.

वारंवार तारखांवर तारखा देऊनही दिलेला शब्द पाळला जात नसल्याने शेतकऱ्यांमध्ये प्रचंड नाराजी निर्माण झाली आहे. एवढेच नव्हे तर २०२४-२५ हंगामातील ऊस बिले देखील अद्याप प्रलंबित असल्याने हा अन्याय अधिकच गंभीर बनला आहे. नळदुर्ग, खुदावाडी, वागदरी तसेच अक्कलकोट तालुक्यातील शेतकरी मोठ्या प्रमाणात अडकले असून, या गंभीर विषयाकडे कोणत्याही राजकीय नेत्यांचे लक्ष नसल्याने शेतकरी अधिकच नाराज झाला आहे.



ऊस हेच अनेक शेतकऱ्यांच्या उदरनिर्वाहाचे प्रमुख साधन आहे. वर्षभर शेतीत राबून, कुटुंबाच्या आशा-अपेक्षा डोळ्यासमोर ठेवून शेतकरी ऊस पिकवतो. मात्र घाम गाळून उत्पादित केलेल्या उसाचे पैसेच वेळेवर मिळत नसतील तर शेतकऱ्यांनी जगायचे कसे, असा सवाल उपस्थित होत आहे. शासन शेतकऱ्यांच्या कल्याणाच्या घोषणा करत असताना प्रत्यक्षात कारखानदारांकडून होणाऱ्या या आर्थिक पिळवणुकीकडे दुर्लक्ष होत असल्याची भावना शेतकऱ्यांनी व्यक्त केली.

या पार्श्वभूमीवर १४ मे २०२६ रोजी खुदावाडी येथील हनुमान मंदिर येथे ऊस पुरवठादार शेतकऱ्यांची बैठक पार पडली. बैठकीत शेतकरी संघर्ष समिती स्थापन करून कारखाना प्रशासनाच्या विरोधात तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा देण्यात आला.

त्यानंतर अणदूर व परिसरातील गोकुळ शुगरकडून अन्यायग्रस्त शेतकऱ्यांची निर्णायक बैठक खुदावाडी येथे १७ मे रोजी आयोजित करण्यात आली. या बैठकीत २५ मे रोजी सोलापूर जिल्हाधिकारी कार्यालयासमोर बेमुदत ठिय्या आंदोलन करण्यात येणार असल्याची माहिती शेतकरी संघटनेचे नेते अरविंद घोडके यांनी दिली.

आमच्या घामाचा पैसा आम्हाला मागावा लागतो, ही शेतकऱ्यांसाठी शोकांतिका आहे. आता शांत बसणार नाही; हक्काचे बिल मिळेपर्यंत लढा उभारणार, अशी भूमिका बैठकीत उपस्थित शेतकऱ्यांनी व्यक्त केली. मोठ्या संख्येने ऊस पुरवठादार शेतकरी बैठकीस उपस्थित होते.

## पन्नास वर्षांचा पिढीजात शेतरस्ता वाद अखेर मिटला; महसूल प्रशासनाच्या हस्तक्षेपाने रस्ता खुला

**तभा वृत्तसेवा**
**येरमाळा, दि.२२ मे -**

अंदोरा येथील गट क्रमांक १६२ मधील शेतकरी वैभव बाबासाहेब कवडे यांच्या शेताकडे जाणाऱ्या रस्त्याचा तब्बल पन्नास वर्षांपासून सुरू असलेला पिढीजात वाद अखेर महसूल प्रशासनाच्या हस्तक्षेपामुळे मार्गी लागला असून संबंधित शेतरस्ता खुला करण्यात आला आहे.

वैभव कवडे यांनी एक वर्षांपूर्वी तहसीलदार कार्यालय कळंब येथे महाराष्ट्र जमीन महसूल संहितेच्या कलम १४३ अंतर्गत अर्ज दाखल करून न्याय मागितला होता. सुरुवातीला या प्रकरणाची सुनावणी तहसीलदार हेमंत ढोकळे यांच्याकडे झाली, तर पुढे नायब तहसीलदार तापडिया यांनी प्रकरण हाताळले. सदर प्रकरणाची गांभीर्यता आणि संबंधित शेतकऱ्याला शेताकडे जाण्यासाठी कोणताही पर्यायी रस्ता उपलब्ध नसल्याची बाब लक्षात घेऊन प्रशासनाने वैभव कवडे यांच्या बाजूने निर्णय दिला. त्यानुसार गट क्रमांक १६० व १६२ च्या बांधावरून १२ फूट रुंदीचा रस्ता खुला करून देण्याचे आदेश देण्यात आले. अंदोरा विभागाचे मंडळ अधिकारी गणेश जगताप व तलाठी ज्ञानेश्वर श्रीढोले यांनी २० मे रोजी पोलीस संरक्षणात सामोपचाराने रस्ता खुला करून दिला. त्यामुळे अनेक वर्षांपासून अडचणीत असलेल्या कवडे कुटुंबाला शेताकडे जाण्यासाठी अखेर मोकळा मार्ग उपलब्ध झाला आहे.

या प्रकरणात न्याय मिळवून देण्यासाठी तहसीलदार कार्यालय कळंब, तापडिया, मंडळ अधिकारी गणेश जगताप, तलाठी ज्ञानेश्वर श्रीढोले तसेच कायदेशीर सल्लागार ॲड. रमाकांत बारकुल यांचे सहकार्य लाभल्याची भावना कवडे यांनी व्यक्त केली.


## उंडरगाव-लोहारा रस्ता बनला मृत्यूचा सापळा

### १५ वर्षांपासून डागडुजीच नाही, ग्रामस्थांचा संताप अनावर...

**तभा वृत्तसेवा**
**लोहारा, दि.२२ मे -**

लोहारा तालुक्यातील उंडरगाव ते लोहारा या महत्त्वाच्या रस्त्याची अक्षरशः चाळण झाली असून, या रस्त्याच्या दुरवस्थेकडे ना लोकप्रतिनिधी लक्ष देत आहेत, ना शासन प्रशासन गांभीर्याने पाहत असल्याने नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. तब्बल १५ वर्षांपूर्वी तयार झालेला हा रस्ता आज जीवघेण्या अवस्थेत पोहोचला असून वाहनधारक, प्रवासी आणि ग्रामस्थांचे हाल अपरंपार होत आहेत.

लोहारा ते उंडरगाव हा सुमारे सात किलोमीटरचा रस्ता प्रधान मंत्री ग्रामसडक योजनेतून तयार करण्यात आला होता. मात्र, रस्ता तयार झाल्यानंतर आजपर्यंत





त्याची साधी डागडुजीही करण्यात आलेली नाही. परिणामी ठिकठिकाणी मोठमोठे खड्डे पडले असून डांबराचा थर उखडला आहे. अनेक ठिकाणी धोकादायक वळणांमुळे अपघाताचा धोका वाढला आहे. पावसाळ्यात तर या रस्त्याची अवस्था अधिकच बिकट बनत असून नागरिकांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे.

या संदर्भात प्रधान मंत्री ग्राम सडक विभागाशी संपर्क साधला असता, उंडरगाव ते लोहारा हा रस्ता सात वर्षांपूर्वीच जिल्हा परिषद बांधकाम उपविभाग कार्यालयाकडे वर्ग करण्यात आल्याचे सांगण्यात आले.

तर जिल्हा परिषदेकडून निधीअभावी काम रखडल्याचे कारण पुढे केले जात आहे.

त्यामुळे विभागीय जबाबदारीची ढकलाढकली सुरू असताना सामान्य नागरिक मात्र हालअपेष्टा सहन करत असल्याचे वास्तव समोर आले आहे.

रस्ते विकासाच्या घोषणा फक्त कागदावरच राहिल्या असून प्रत्यक्षात जनतेला खड्ड्यांतूनच प्रवास करावा लागत आहे, अशी संतप्त प्रतिक्रिया ग्रामस्थांमधून उमटत आहे.

उंडरगाव ते लोहारा हा रस्ता पूर्वीप्रमाणे पुन्हा प्रधान मंत्री ग्राम सडक योजनेतून तातडीने मंजूर करून दर्जेदार काम करण्यात यावे, अशी तळमळीची व आक्रमक मागणी उंडरगाव ग्रामस्थांनी केली आहे.

## शेतकऱ्यांना दिलासा... भारतीय किसान संघाकडून होलसेल दरात घरपोच सोयाबीन बियाणे

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२२ मे -**

भारतीय किसान संघ धाराशिवच्या वतीने खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांसाठी दिलासादायक उपक्रम राबविण्यात येत आहे. बाजारात सोयाबीन बियाण्यांच्या दरात मोठी वाढ झाल्याने शेतकरी आर्थिक अडचणीत सापडला असून, याच पार्श्वभूमीवर ना नफा ना तोटा तत्त्वावर होलसेल दरात घरपोच सोयाबीन बियाणे उपलब्ध करून देण्याचा निर्णय संघटनेने घेतला आहे.

या उपक्रमाचा शुभारंभ भारतीय किसान संघाचे जिल्हाध्यक्ष नितीन घुले यांच्या हस्ते लोहारा तालुक्यातील जेवळी येथे करण्यात आला. यावेळी



२५ शेतकऱ्यांना National Seeds Corporation (NSC) चे सोयाबीन बियाणे कोणताही वाहतूक खर्च न आकारता थेट त्यांच्या दारात वितरित करण्यात आले.

सध्या खरीप हंगामासाठी खते व बियाण्यांची जुळवाजुळव करताना बाजारातील वाढलेल्या दरामुळे शेतकऱ्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. अशा परिस्थितीत कंपनी दरात घरपोच बियाणे उपलब्ध झाल्याने शेतकऱ्यांकडून समाधान व्यक्त करण्यात येत आहे. या प्रसंगी भारतीय किसान संघाचे लोहारा तालुकाध्यक्ष काशिनाथ लकडे, राहुल चव्हाण, शिवकांत बिराजदार, आशिष साखरे, वैजिनाथ कारभारी आणि अनिकेत पाटील उपस्थित होते.

जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी एकत्रितपणे बियाण्यांची मागणी नोंदवावी, असे आवाहन जिल्हाध्यक्ष नितीन घुले यांनी केले आहे.

## परंडा बाजार समितीतील अतिक्रमण कारवाईला उच्च न्यायालयाची स्थगिती

**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.२२ मे -**

परंडा कृषी उत्पन्न बाजार समिती परिसरातील कथित अतिक्रमण हटविण्याच्या कारवाईला मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने तात्पुरती स्थगिती दिली आहे. कायदेशीर प्रक्रिया पूर्ण केल्याशिवाय कोणतीही तोडकाम कारवाई करू नये, असे स्पष्ट आदेश न्यायालयाने दिले आहेत.

बाजार समितीने वृत्तपत्रामधून नोटीस प्रसिद्ध करून अतिक्रमण हटविण्याची कारवाई जाहीर केली होती. याविरोधात संबंधित दुकानदारांनी ॲड. गणेश कोरे यांच्या मार्फत उच्च न्यायालयात याचिका दाखल केली. संबंधित दुकानदार गेल्या वीस वर्षांहून अधिक काळापासून त्या जागेवर व्यवसाय करत असल्याचे याचिकेत नमूद करण्यात आले. न्यायमूर्ती सिद्धेश्वर एस. ठोंबरे यांनी सुनावणीदरम्यान संबंधितांना वैयक्तिक नोटीस न देता थेट कारवाई करता येणार नाही, असे नमूद केले. न्यायालयाने प्रतिसादकांना नोटीस बजावली असून पुढील सुनावणी ३ जुलै रोजी ठेवली आहे. तोपर्यंत कायदेशीर प्रक्रिया न पाळता कोणतीही तोडकाम अथवा अतिक्रमण हटविण्याची कारवाई करू नये, असे अंतरिम आदेश देण्यात आले आहेत.


## धाराशिव-बीड-लातूर विधान परिषदेसाठी महायुतीत जोरदार फिल्डिंग; भाजप-शिवसेनेत जागेसाठी रस्सीखेच

**आकाश पोतदार**
**उमरगा, दि.२२ मे -**

धाराशिव-बीड-लातूर स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघातील विधान परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महायुतीत राजकीय हालचालींना प्रचंड वेग आला असून इच्छुक नेत्यांनी जोरदार फिल्डिंग सुरू केल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे. भाजपने या जागेवरील दावा कायम ठेवण्याचे संकेत दिले असतानाच शिवसेनेनेही ही जागा आपल्या वाट्याला यावी यासाठी ताकद पणाला लावल्याचे बोलले जात आहे. त्यामुळे मराठवाड्यातील राजकारण सध्या चांगलेच तापले आहे.

भाजपकडून अर्चनाताई पाटील (चाकूरकर) यांचे नाव चर्चेत आघाडीवर असल्याचे सांगितले जात आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांमधील मजबूत संपर्क, संघटनात्मक अनुभव आणि मराठवाड्यातील प्रभावी राजकीय नेटवर्क यामुळे त्यांच्या नावाकडे गांभीर्याने पाहिले जात असल्याची चर्चा आहे. याचबरोबर भाजप जिल्हाध्यक्ष दत्ताभाऊ कुलकर्णी यांनीही संघटनात्मक ताकदीच्या जोरावर आपली दावेदारी मजबूत केल्याचे बोलले जात आहे. कार्यकर्त्यांमधील संपर्क आणि पक्षविस्तारासाठी केलेले काम यामुळे त्यांचे नावही चर्चेत आहे.

माजी आमदार सुजितसिंह ठाकूर यांचा जनसंपर्क आणि पक्षातील वरिष्ठ नेत्यांशी असलेले जवळचे संबंध ही त्यांची प्रमुख ताकद मानली जात आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या जनादेश यात्रेसह दिवंगत नेते









गोपीनाथ मुंडे यांच्या संघर्ष यात्रेत त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली होती. त्यामुळे पक्षातील त्यांचे राजकीय वजन कायम असल्याचे बोलले जात आहे.

भाजपाचे ज्येष्ठ नेते ॲड. व्यंकटराव गुंड यांचे नाव देखील संभाव्य उमेदवारांमध्ये चर्चिले जात आहे. दीर्घ राजकीय अनुभव, स्थानिक स्वराज्य संस्थांवरील पकड आणि पक्षातील सक्रिय भूमिका यामुळे त्यांच्याकडेही महत्त्वाच्या चेहऱ्यांपैकी एक म्हणून पाहिले जात आहे. दरम्यान, भाजपा माजी जिल्हाध्यक्ष संताजी चालुक्य यांच्या नावाचीही जोरदार चर्चा सुरू झाली आहे. ग्रामीण भागातील मजबूत संपर्क, पक्ष संघटना उभारणीत दिलेले योगदान आणि कार्यकर्त्यांमधील प्रभाव यामुळे चालुक्य यांचे नावही संभाव्य दावेदारांमध्ये पुढे येत असल्याचे बोलले जात आहे. दुसरीकडे शिवसेनेनेही या जागेसाठी आक्रमक रणनीती आखल्याचे दिसून येत आहे. उमरगा-लोहारा मतदारसंघाचे लोकप्रिय माजी आमदार तथा शिवसेना उपनेते ज्ञानराज चौगुले यांचे नाव आता चर्चेच्या केंद्रस्थानी आले आहे. मतदारसंघात केलेली विकासकामे, जिल्हा परिषद, पंचायत समिती आणि नगरपालिका निवडणुकांमध्ये आखलेली प्रभावी रणनीती तसेच शिवसेनेचे वाढवलेले संघटनात्मक वर्चस्व यामुळे चौगुले यांची राजकीय ताकद अधिक ठळकपणे पुढे येत असल्याचे सांगितले जात आहे.

मराठवाड्यातील शिवसेनेत चौगुले यांची मजबूत पकड मानली जाते. तळागाळातील कार्यकर्त्यांशी असलेला थेट संपर्क आणि त्यांच्या अडचणी सोडवण्यासाठी केलेले सातत्यपूर्ण प्रयत्न यामुळे धाराशिव, बीड आणि लातूर जिल्ह्यातील अनेक शिवसैनिक त्यांच्या नावासाठी पक्षश्रेष्ठींकडे जोरदार आग्रह धरण्याच्या तयारीत असल्याची चर्चा आहे. विशेष म्हणजे, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी यापूर्वी चौगुले यांच्या राजकीय पुनर्वसनाबाबत सकारात्मक संकेत दिल्याचेही बोलले जात आहे. त्यामुळे विधान परिषदेतून त्यांना संधी मिळते का, याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

दरम्यान, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाकडूनही हालचाली सुरू झाल्या असून जिल्हाध्यक्ष डॉ. प्रतापसिंह पाटील यांच्या नावाचीही राजकीय वर्तुळात चर्चा रंगली आहे. ग्रामीण भागातील नेटवर्क, स्थानिक स्वराज्य संस्थांमधील प्रभाव आणि कार्यकर्त्यांशी असलेला संपर्क यामुळे त्यांचे नावही चर्चेत आल्याचे बोलले जात आहे.

महायुतीत जागावाटपाचा तिढा नेमका कसा सुटतो, भाजप आपला दावा कायम ठेवते की शिवसेना ही जागा आपल्या खात्यात खेचण्यात यशस्वी ठरते, याकडे आता संपूर्ण मराठवाड्याचे लक्ष लागले आहे. २५ मेपासून उमेदवारी अर्ज दाखल करण्याची प्रक्रिया सुरू होणार असल्याने पुढील काही दिवसांत राजकीय घडामोडींना आणखी वेग येण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

CMYK

# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## डॉ. विजयलक्ष्मी माले यांना पीएचडी प्रदान

तभा वृत्तसेवा

लातूर दि. २२ मे : येथील एमआयडीएसआर दंत महाविद्यालय मधील मुख औषध वैद्यक शास्त्र व क्ष-किरण शास्त्र विभाग प्रमुख डॉ. विजयलक्ष्मी प्रशांत माले यांना मुख औषध वैद्यक शास्त्र व क्ष-किरण शास्त्र या विषयात पीएचडी प्रदान करण्यात आली आहे.

डॉ. विजयलक्ष्मी माले यांनी डॉ. डी. वाय. पाटील दंत महाविद्यालय आणि रुग्णालय येथील मुख औषध वैद्यक शास्त्र व क्ष-किरण शास्त्र विभाग प्रमुख डॉ. सुनील एस. मिश्रा यांच्या मार्गदर्शनाखाली इम्युनोहिस्टोकेमिस्ट्री पद्धतीद्वारे अँजिओजेनेसिससाठी मुखाच्या कर्करोगाचे निर्देशक या विषयावर संशोधन प्रबंध सादर केला. त्यांच्या संशोधनामध्ये ट्यूमर मार्कर्सच्या माध्यमातून मुखातील गाठींचे लवकर निदान कसे करता येऊ शकते, याचा सखोल अभ्यास करण्यात आला आहे.

या संशोधनामुळे मुखाच्या कर्करोगाचे प्रारंभिक अवस्थेत निदान करणे अधिक सुलभ होणार असून, रुग्णांवरील उपचार वेळेत सुरू करण्यास मदत मिळणार आहे. परिणामी गाठींचे संपूर्ण उच्चाटन करणे शक्य होऊन रुग्णांच्या आरोग्य संरक्षणात मोठी मदत होणार असल्याचे डॉ. माले यांनी सांगितले. डॉ. माले यांनी यापूर्वीही राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावरील विविध वैज्ञानिक नियतकालिकांमध्ये अनेक संशोधनपर शोधनिबंध प्रकाशित केले आहेत. पीएचडी प्राप्त झाल्याबद्दल एमआयडीएसआर दंत महाविद्यालयाचे कार्यकारी संचालक डॉ. हनुमंत कराड यांनी त्यांचा सत्कार करून अभिनंदन केले. यावेळी उपप्राचार्य डॉ. यतिशकुमार जोशी उपस्थित होते.



## विविध वृत्त...

### जि. प. व पं. स. च्या ५ विस्तार अधिकाऱ्यांना गट उपशिक्षणाधिकारी, शिक्षणाधिकारी पदावर पदोन्नती

तभा वृत्तसेवा

लातूर दि. २२ मे : लातूर जिल्हा परिषदेच्या अंतर्गत कार्यरत असलेल्या ५ विस्तार अधिकारी यांची उपशिक्षणाधिकारी व शिक्षणाधिकारी म्हणून पदोन्नती मिळाली आहे. सदर अधिकारी हे त्या-त्या जिल्हयात जाऊन सेवेत रूजूही झाले आहेत.

जिल्हा तांत्रिक सेवेतील विस्तार अधिकारी (शिक्षण) या संवर्गातून महाराष्ट्र शिक्षण सेवा गट ब मधील उपशिक्षणाधिकारी या तत्सम या संवर्गातील रिक्त पदावर तात्पुरत्या स्वरूपात जिल्हा परिषद लातूर मधील विस्तार अधिकारी निवृत्ती मारूतीराव जाधव यांना पंचायत समिती देवणी येथे गटशिक्षणाधिकारी म्हणून पदोन्नती मिळाली आहे.

तसेच चंद्रहास शिवाजीराव म्हेत्रे यांना पंचायत समिती निलंगा येथे गट शिक्षणाधिकारी म्हणून पदोन्नती मिळाली आहे. गोविंद फतू राठोड यांची शिक्षण उपनिरीक्षक

विभागीय उपसंचालक कार्यालय, लातूर येथे पदोन्नती मिळाली आहे. संजय पी. सिंदाळकर यांना उपशिक्षणाधिकारी मा. जिल्हा परिषद बीड येथे पदोन्नती मिळाली आ-हे. संजीव सुभाषराव पारसेवार यांची गडचिरोली येथील जिल्हा परिषदेत उपशिक्षणाधिकारी म्हणून पदोन्नती मिळाली आहे.

या पदोन्नती झालेल्या सर्व अधिकाऱ्यांना लातूर जिल्हा परिषदेने कार्यमुक्त केले आहे. यातील जवळपास सर्वच अधिकारी पदोन्नती मिळालेल्या ठिकाणी रूजू झाले आहेत.

### गांधी मार्केट परिसरात लाखाचा गुटखा जप्त

तभा वृत्तसेवा

लातूर दि. २२ मे : शहराच्या गांधी मार्केट परिसरात गुटखा व सुगंधित तंबाखू विक्री करणाऱ्यावर पोलिसांच्या विशेष पथकाने धाड टाकली. यात १ लाख २ हजार ९२० रुपयांचा प्रतिबंधित गुटखा व तंबाखूजन्य पदार्थ जप्त करण्यात आले आहेत.

पोलीस अधीक्षक कार्यालयाच्या विशेष पथकातील उपनिरीक्षक आयूब शेख यांना गांधी चौक पोलीस ठाण्याच्या अमलदारासह संयुक्तरीत्या धडक कारवाई करीत मुद्देमाल जप्त करण्यात आला. मंगळवारी (दि.१९) सकाळी गांधी मार्केट परिसरात पोलीस अधीक्षक कार्यालयाच्या विशेष पथकाला गुप्त बातमीदारामार्फत गांधी मार्केट येथील 'पारस कन्फेशनरी' दुकानात गुटखा व तंबाखूजन्य पदार्थांची विक्री सुरू असल्याची माहिती प्राप्त झाली. पथकाने तत्काळ संबंधित दुकानावर छापा टाकला. कारवाईत दुकानातील एकाला विचारपूस केली. गौसोद्दीन हुसेन पठाण (वय २३, रा. मळवटी रोड, सकपाळ नगर, लातूर) हा तंबाखू व गुटखा विक्री करीत होता. दुकानातील पोते व साहित्याची झडती घेतली असता विविध प्रकारचे गुटखे, पान मसाला व तंबाखूजन्य पदार्थ आढळून आले. एकूण १ लाख २ हजार ९२० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या प्रकरणी आरोपी गौसोद्दीन हुसेन पठाण याच्याविरुद्ध भारतीय न्याय संहितेनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांच्या मार्गदर्शनात पोलीस उपनिरीक्षक आयूब शेख, अंमलदार युसूफ शेख, रामहरी भोसले, यशवंत घुगे, अंमलदार शाहू बनसोडे यांच्या विशेष पथकाने केली.

### ३१५ पोलीस अधिकारी व अंमलदारांच्या बदल्या

तभा वृत्तसेवा

लातूर दि. २२ मे : लातूर जिल्हा पोलीस दलामध्ये पोलीस अधिकारी व अंमलदारांच्या अडचणी, कौटुंबिक परिस्थिती, सेवा कालावधी तसेच प्रशासकीय गरजा लक्षात घेऊन प्रशासकीय बदल्यांची प्रक्रिया राबविण्यात आली आहे. पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांच्या मार्गदर्शनाखाली ३१५ पोलीस अधिकाऱ्यांच्या व अंमलदारांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत.

जिल्ह्यातील श्रेणी पोलीस उपनिरीक्षक ते पोलीस अंमलदार अशा एकूण ३१५ अधिकारी व कर्मचाऱ्यांनी त्यांच्या सध्याच्या पोलीस ठाणे अथवा शाखेमध्ये ०५ वर्षे व त्यापेक्षा अधिक सेवा पूर्ण केली होती. आस्थापना मंडळाच्या बैठकीत प्रत्येक पोलीस अधिकारी व अंमलदारांच्या सेवाभिलेखाचा अभ्यास करण्यात आला. पोलीस ठाणेनिहाय उपलब्ध रिक्त पदे, संबंधितांची कार्यक्षमता, कौटुंबिक अडचणी, आरोग्य विषयक बाबी, मुलांचे शिक्षण, प्रवासाची गैरसोय तसेच वैयक्तिक अडचणी यांचा सहानुभूतीपूर्वक विचार करण्यात आला.

अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या वैयक्तिक अडचणी दूर होण्यास मदत झाल्याने संबंधित कर्मचारी व त्यांच्या कुटुंबीयांमधून समाधान व्यक्त करण्यात येत आहे. बदल्या झाल्यानंतर संबंधित अधिकारी व अंमलदार नव्या ठिकाणी अधिक सकारात्मक ऊर्जा, कार्यक्षमता व जबाबदारीने काम करतील, असा विश्र्वास व्यक्त करण्यात येत असून नागरिकांना अधिक तत्पर, प्रभावी व गुणवत्तापूर्ण पोलीस सेवा उपलब्ध करून देण्यासाठी अशा संवेदनशील व पारदर्शक निर्णयांची मोठी मदत होणार आहे.

### बकरी ईदनिमित्त पोलिसांची बैठक

तभा वृत्तसेवा

लातूर दि. २२ मे : आगामी ईद-उल-अजहा (बकरी ईद) सण शांततापूर्ण, सलोख्याच्या वातावरणात व कायद्याच्या चौकटीत साजरा व्हावा, यासाठी लातूर जिल्हा पोलीस दलाच्या वतीने विविध समाजघटक, धर्मगुरू व संघटनांच्या पदाधिकाऱ्यांची महत्त्वपूर्ण बैठक पोलीस अधीक्षक कार्यालयात घेण्यात आली. बैठकीत मुस्लिम समाजातील धर्मगुरू, हिंदूत्ववादी संघटनांचे प्रतिनिधी, कुरेशी समाजाचे पदाधिकारी, गोरक्षक संघटनांच्या पदाधिकाऱ्यांशी चर्चा करण्यात आली.

बैठकीदरम्यान पोलिसांकडून गोवंश हत्या बंदी कायद्याची तंतोतंत अंमलबजावणी करण्यात येणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले. कोणत्याही परिस्थितीत कायद्याचे उल्लंघन सहन केले जाणार नसल्याचे पोलीस प्रशासनाने स्पष्ट केले. अनुचित प्रकार घडल्यास किंवा संशयास्पद हालचाल आढळल्यास नागरिकांनी तत्काळ पोलिसांशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले. लातूर जिल्हा पोलीस दलाकडून दि.२० ते ३० मे २०२६ या कालावधीत जिल्हाभर विशेष बंदोबस्त व प्रतिबंधात्मक उपाययोजना राबविण्यात येत आहेत. उपविभाग स्तरावर सात विशेष भरारी पथके तयार करण्यात आली आहेत.

त्यात पोलीस अधिकारी व अंमलदारांचा समावेश करण्यात आला आहे. ही पथके जिल्ह्यात सतत गस्त घालून गोवंश हत्या बंदी कायद्याचे उल्लंघन करणाऱ्यांवर कठोर कारवाई करणार आहेत. राज्य सीमा, जिल्हा सीमा व जिल्ह्यातील संवेदनशील भागांमध्ये एकूण २२ ठिकाणी दिवसरात्र नाकाबंदी लावण्यात आली आहे. ३० मेपर्यंत ही विशेष तपासणी मोहीम सुरू राहणार आहे.

## पादुका दर्शन सोहळा आर्थिक व्यवहारातील दोषींवर कारवाईच्या मागणीसाठीच्या धरणे आंदोलनास उत्स्फूर्त प्रतिसाद

## ३ जूनला मांजरा कारखान्यासमोर रास्ता रोको करणार : प्रदीप पाटील खंडापूरकर

तभा वृत्तसेवा

लातूर दि. २२ मे : लातूर तालुक्यातील खंडापूर येथे दि. २२ फेब्रुवारी ते २ मार्च २०२६ या कालावधीत पार पडलेल्या उत्सव संतांचा, कुंभमेळा वारकऱ्यांचा पादुका दर्शन सोहळ्यासाठी देणगी स्वरूपात आलेल्या रकमेमध्ये कोट्यवधी रुपयांचा अपहार किशोर जाधव व अन्य आयोजकांनी केला आहे . या प्रकरणातील दोषींवर अटकेची कार्यवाही करून आर्थिक व्यवहाराची सखोल चौकशी करण्यात यावी, या मागणीसाठी शुक्रवार दि. २२ मे रोजी लातूर शहरातील गांधी चौकात अखिल भारतीय भ्रष्टाचार निर्मूलन संघर्ष समितीच्या वतीने आयोजित धरणे आंदोलनास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. याच मागणीसाठी येत्या दि. ३ जून २०२६ रोजी मांजरा शेतकरी सहकारी साखर कारखान्यासमोर रास्ता रोको आंदोलन करणार असल्याची माहिती समितीचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रदीप पाटील खंडापूरकर यांनी दिली.




या पादुका दर्शन सोहळ्यात कोट्यवधी रुपयांचा अपहार करण्यात आल्याची तक्रार अखिल भारतीय भ्रष्टाचार निर्मूलन संघर्ष समिती एवं ब्रिक्स ह्युमन राईट मिशनचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रदीप पाटील खंडापूरकर यांनी एका लेखी निवेदनाद्वारे लातूरच्या पोलीस अधीक्षकांकडे केली आहे. खंडापूर येथे पार पडलेल्या पादुका दर्शन सोहळ्यासाठी महाराष्ट्रातील अनेक संत आले होते. महाराष्ट्र, कर्नाटक, मध्यप्रदेश, तेलंगणा आदी भागातून वारकरी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

या सोहळ्याचा जवळपास ६० लाखांहून अधिक भाविकांनी आनंद घेतला होता. सोहळ्यासाठी अंदाजे ३७०० देणगी पुस्तिका छापण्यात आल्या होत्या. प्रत्येक देणगी पावती पाच हजार रुपयांपेक्षा जास्त रकमेची आहे. या सोहळ्यासाठी छोटे कदम माऊली महाराज व तोतया भामटा किशोर जाधव शिवणीकर हे संपूर्ण मराठवाड्यात फिरून लोकांकडून मदत, पैसे गोळा करत होते. यात विशेष योगदान खंडापूरच्या नागरिकांचे आहे. खंडापूरच्या लोकांनी स्वतःच्या खर्चाने परिसर स्वच्छ करून दिला. कार्यक्रमासाठी भाविकांनी स्वयंस्फूर्तीने सहकार्य केल्याचे सर्वांनी पाहिलेही आहे.

या सोहळ्यात झालेल्या अपहार आणि गैरव्यवहाराची सखोल चौकशी करण्याच्या मागणीसाठी सदर आंदोलन करण्यात आले. यावेळी किशोर जाधव शिवणीकर याच्या प्रतिमेस जोडेही मारण्यात आले.

या सोहळ्यासाठी वेगवेगळ्या भागातून भाकरी, चपात्या, पुरणपोळ्या, दूध, तूप, भाज्या आदी साहित्य पुरवले गेले. या सोहळ्यासाठी सामान्य नागरिकांसह विविध संस्था, राजकीय पुढाऱ्यांनीही मोठ्या रकमा देणगी स्वरूपात दिल्या आहेत. तसेच दानपेटीच्या माध्यमातूनही अंदाजे ५ कोटी रुपयांची रक्कम जमा झाली आहे. पावती पुस्तकांच्या माध्यमातूनही किमान १८ कोटी ५० लाख रुपये जमा झाल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. औसा येथे धान्य विक्रीतून ४० लाख रुपये आल्याचा उल्लेखही त्यात करण्यात आला आहे.

या रकमा ज्या बँक खात्यावर जमा झाल्या, त्या कोणाच्या खात्यात जमा केल्या व कोणाच्या परवानगीने याची चौकशी होणे गरजेचे आहे. तसेच भक्ती शक्ती पावन धाम सेवाभावी संस्था या संस्थेचे बँक खाते गोठवून संस्थेची चौकशी व्हावी, संस्थेच्या सर्वसंचालकानाची बँक खाती व मालमत्ता शासनाने तात्काळ ताब्यात घेऊन त्यांच्यावर गुन्हे दाखल करावेत,अशी मागणीही यावेळी करण्यात आली. या प्रकरणातील दोषींवर तात्काळ गुन्हे दाखल करून त्यांची सखोल चौकशी करण्यात यावी. अन्यथा येत्या दि. ३ जून रोजी मांजरा सहकारी साखर कारखान्यासमोर रास्ता रोको आंदोलन करण्यात येणार असल्याचा इशारा अखिल भारतीय भ्रष्टाचार निर्मूलन संघर्ष समितीचे राष्ट्रीय अध्यक्ष स्वातंत्र्य सैनिक प्रदीप पाटील खंडापूरकर यांनी दिला आहे.

या धरणे आंदोलनात अमोल नानजकर , एड. राणीताई स्वामी, पृथ्वीराजसिंह पाटील,नेताजी जाधव, काशीबाई हांडे, योगीताताई ठाकूर, रामेश्र्वर डोणे , अमोल भालेराव, भीमराव वराडे, पृथ्वीराज पवार, पंडितराव लखनगिरे , अमर कैले, बप्पा टेळे, सुरेश जाधव, सुरेखा गाडेकर, संतोष तुरूप, टीनाताई शिंदे, शाहीर शिंदे, महेश पाटील, नागेश जाधव, दिनेश कांबळे, तुषार रेड्डी, गोपाळ माळी यांसह अनेक मान्यवर सहभागी झाले होते.

## लातूर शहर महापालिका अधिकारी व कर्मचारी संघटनेची पुनर्बाधणी




तभा वृत्तसेवा

लातूर दि. २२ मे : लातूर शहर महानगरपालिकेच्या अधिकारी व कर्मचारी यांच्या संघटनेची बैठक दि. १९ मे रोजी क्षत्रिय कार्यालय येथे घेऊन संघटनेची पुनर्बाधणी करण्यात आली.

लातूर शहर महानगरपालिकेतील अधिकारी कर्मचारी व सफाई कर्मचारी अनेक दिवसापासून त्यांच्या मागण्यां प्रलंबित असल्यामुळे सर्व कर्मचारी त्यांच्या मागण्यांसाठी एकत्रित येत संघटना पुनर्बाधणी करण्यात आलेली आहे.


नगरपालिका, बलात यामध्ये संघटनेचे प्रमुख सल्लागार म्हणून रमाकांत पिडगे, कलीम शेख, खदीर शेख व कायदेशीर सल्लागार म्हणून समाधान सूर्यवंशी यांची निवड करण्यात आली आहे तसेच संघटनेचे अध्यक्ष म्हणून रवी कांबळे यांची तर उपाध्यक्ष म्हणून बालाजी शिंदे, सचिव धोंडीराम सोनवणे, कोषाध्यक्ष अभिमन्यू पाटील व इतर पदाधिकाऱ्यांची निवड करण्यात आलेली आहे.

संघटना पुनर्बाधणी मागील कर्माचाऱ्यांचा उद्देश हा आहे की, मनपाच्या कर्माचाऱ्यांच्या सातवा वेतन आयोगाच्या फरकाची रक्कम तात्काळ अदा करण्यात यावी तसेच मनपा कर्माचाऱ्यांचे वेतन दरमहा १० तारखेपर्यंत करण्यात यावे, अशा विविध मागण्यांसह कर्मचारी व अधिकारी एकत्र आले आहेत.

## सीआरपीएफ प्रशिक्षण केंद्रात क्रीडा फिजिओथेरपी शिबीर

तभा वृत्तसेवा

लातूर दि. २२ मे : संरक्षण दल हे देशाच्या सुरक्षेचे प्रमुख आधारस्तंभ असून सैनिकांना अत्यंत कठोर शारीरिक व मानसिक परिस्थितींमध्ये कार्य करावे लागते. त्यामुळे त्यांचे प्रशिक्षण वैज्ञानिक, शिस्तबद्ध आणि कार्यक्षम पद्धतीने होणे आवश्यक आहे. प्रशिक्षणादरम्यान होणाऱ्या दुखापती टाळण्यासाठी तसेच सैनिकांची कार्यक्षमता वाढविण्यासाठी क्रीडा फिजिओथेरपीची भूमिका अत्यंत महत्त्वाची असल्याचे प्रतिपादन महाराष्ट्र इन्स्टिट्यूट ऑफ फिजिओथेरपी महाविद्यालयाच्या क्रीडा फिजिओथेरपी विभागाचे प्रमुख डॉ. विजय त्रिपाठी यांनी केले.



महाराष्ट्र इन्स्टिट्यूट ऑफ फिजिओथेरपी महाविद्यालयाच्या क्रीडा विभागातर्फे कार्यकारी संचालक डॉ. हनुमंत कराड व प्राचार्य डॉ. सुभाष खत्री यांच्या मार्गदर्शनाखाली केंद्रीय राखीव पोलिस दल (सीआरपीएफ) प्रशिक्षण केंद्र, लातूर येथे आयोजित क्रीडा फिजिओथेरपी मार्गदर्शन व प्रात्यक्षिक शिबिरात डॉ. विजय त्रिपाठी बोलत होते. यावेळी सीआरपीएफचे पोलिस उप महानिरीक्षक ए. एच. अन्सारी, वरिष्ठ पोलिस अधिकारी प्रशांत राय, सहयोगी प्रा. डॉ. मेघा बक्षी तसेच प्रशासकीय अधिकारी सत्यवान झरे उपस्थित होते.

यावेळी बोलताना डॉ. विजय त्रिपाठी यांनी संरक्षण दलातील विविध प्रशिक्षण प्रक्रियेची माहिती दिली. ते म्हणाले की, सैनिकांना धावणे, वजन प्रशिक्षण, अडथळा शर्यती, पोहणे, पर्वतारोहण, सहनशक्ती वर्धक व्यायाम यांसह युद्ध प्रशिक्षण, शस्त्र हाताळणी, रणनिती सराव आणि मानसिक स्थैर्य विकसित करणाऱ्या कठोर प्रशिक्षणातून जावे लागते. या प्रशिक्षणामुळे सैनिकांची शारीरिक क्षमता, वेग, संतुलन आणि सहनशक्ती वाढते; मात्र त्याचबरोबर स्नायू ताण, लिगामेंट दुखापती, गुडघे व खांद्यांच्या समस्या, पाठदुखी आणि स्ट्रेस फ्रॅक्चर यांसारख्या दुखापतींचा धोका देखील वाढतो.

दुखापतीनंतरच्या पुनर्वसन प्रक्रियेमध्ये क्रीडा फिजिओथेरपी अत्यंत प्रभावी ठरते. व्यायाम उपचार, मॅन्युअल थेरपी, इलेक्ट्रोथेरपी, टेपिंग तंत्र आणि शरीराच्या हालचालींच्या वैज्ञानिक विश्र्लेषणाच्या माध्यमातून सैनिकांची हालचाल अधिक सुरक्षित आणि कार्यक्षम बनविता येते, असेही त्यांनी सांगितले.

यावेळी डॉ. मेघा बक्षी यांनी सहभागींना दुखापतींची कारणे, प्रारंभीची लक्षणे आणि प्रतिबंधात्मक उपाय योजनांची सविस्तर माहिती दिली. त्यांनी योग्य वॉर्म-अप आणि कूल-डाउन, शरीरस्थिती सुधारणा, लवचिकता प्रशिक्षण, स्नायू बळकटीकरण, संतुलित आहार, पुरेशी विश्रांती आणि वैज्ञानिक प्रशिक्षण पद्धतीचे महत्त्व सांगितले.

शिबिरा दरम्यान गतिशीलता, संतुलन, सहनशक्ती, चपळता आणि कार्यात्मक तंदुरुस्ती वाढविण्यासाठी विविध प्रात्यक्षिके सादर करण्यात आली. उच्च तीव्रतेचे अंतराल प्रशिक्षण, शक्तिवर्धक व्यायाम, योग, ध्यान आणि पुनर्प्राप्ती तंत्रांचा सैनिकांच्या कार्यक्षमतेवर होणारा सकारात्मक परिणामही स्पष्ट करण्यात आला.

या शिबिराला सीआरपीएफचे प्रशिक्षणार्थी आणि सुरक्षा कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## वृक्षारोपण मोहिमेसाठी योग्य 'लँड बँक' तयार करा

तभा वृत्तसेवा

लातूर दि. २२ मे : राज्यात सन २०२६ ते २०४७या कालावधीत राबविण्यात येणाऱ्या अत्यंत महत्त्वाकांक्षी ३०० कोटी वृक्षारोपण अभियानाच्या पहिल्या टप्प्यात जिल्ह्यातील वृक्षारोपण योग्य जमिनीची 'लँड बँक' तयार करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड यांनी दिल्या. जिल्हाधिकारी कार्यालयात बुधवारी आयोजित बैठकीत जिल्हाधिकाऱ्यांनी जिल्ह्यातील सर्व शासकीय यंत्रणा व विभागांना या मोहिमेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी सूक्ष्म नियोजनाचे निर्देश दिले.



रोहयोचे उपजिल्हाधिकारी संदीप कुलकर्णी, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक संजय इंगळे, लातूर शहर महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त देविदास जाधव, सामाजिक वनीकरण विभागाचे उपवन संरक्षक अमितराज जाधव, सहायक वनसंरक्षक मदन क्षीरसागर, प्रादेशिक परिवहन अधिकारी विनोद चव्हाण, ग्रामीण पाणी पुरवठा यंत्रणेचे कार्यकारी अभियंता बाळासाहेब शेलार, उपमुख्य कार्यकारी अधिकारी मनरेगाअंतर्गत महिला बचत गटांची घेतली जाणार मदत बाळासाहेब वाघ यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती.

सन २०२६ ते २०४७ या दीर्घकालीन कालावधीत संपूर्ण राज्यात ३०० कोटी वृक्षलागवड करण्याचे उद्दिष्ट निश्र्चित करण्यात आले आहे.

आगामी २५ मे ते ५ जून या कालावधीत जिल्ह्यातील वृक्षलागवडीसाठी उपलब्ध सर्व जमिनींची अचूक माहिती संकलित करून जीआयएस प्रणाली आधारे 'लँड बँक' तयार करावी. ही डिजिटल बँक तयार झाल्यानंतर जिल्ह्यातील सर्व संबंधित शासकीय यंत्रणा व विभागांना त्यांच्या क्षेत्रातील वृक्षलागवडीचे निश्र्चित उद्दिष्ट वाटप करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

वृक्षारोपणाची ही सर्व कामे महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना (मनरेगा) अंतर्गत राबविण्यात यावीत.

### जाहीर प्रगटन

लातूर जिल्हा परिसरातील तमाम जनतेस या जाहिर प्रगटना द्वारे सुचीत करण्यात येते की, माझे पक्षकार गणेश प्रकाशराव रोंगे. रा. तिरूपती नगर, साई रोड, लातूर यांनी मला दिलेल्या माहिती व कागदपत्रावरून व वकिल म्हणून अधिकृत केले वरुन सर्व जनतेस खालील प्रमाणे जाहीर प्रगटन देत आहे.

माझे पक्षकार यांना अशोक तुकाराम कराड, बोडका, ता. जि. लातूर यांनी त्यांच्या खरेदी मालकीची व कब्जेवहिवाटीची शेतजमीन मो. बोडका, ता.जि. लातूर येथील जमीन गट नंबर १२४/१ मधील माझे मालकीचे पूर्ण विक्री क्षेत्र ०० हे ७३ आर शेतजमीन आहे

याची चतुः सोमा खालील प्रमाणे : पुर्वेसः यासीन सत्तार सय्यद यांची शेतजमीन, पश्चिमेस रामकिशन कोंडीराम गरड यांची शेतजमीन, दक्षिणेस जवळा बोडका रस्ता, उत्तरेस बाळासाहेब आण्णासाहेब कदम यांची शेतजमीन, येणे प्रमाणे वरील चतुःसीमेच्या आतील मिळकत विद्यमान मालकाकडून लेखी करार करून घेऊन, इसारापोटी काही रक्कम माझे पक्षकाराकडून स्विकारुन सदरची मिळकत ही निर्विवाद व निर्जोखीम असल्याची हमी माझे पक्षकारास दिली आहे तरी रम्दर मिळकती बाकी जर कोणाचा उजर, आक्षेप, हितसंबंध, हक्कसंबंध, कर्जबोजा, गहाणखत, बक्षीसपत्र, कोर्टडिग्री, मृत्युपत्र, तारण, लीज, शेजा-याचा वाद, शासकिय अथवा निमशासकिय कर्ज, न्यायालयीन वाद असतील तर त्यांनी सदरचे प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून सात (०७) दिवसाच्या आत माझे खालील कांर्यालयीन पत्यावर योग्य त्या कागदपत्रांसह लेखी उजर / आक्षेप नोंदवावा मुदतीत जर कोणाचा उजर/ आक्षेप नाही आल्यास सदरची मिळकत हो निर्विवाद व निर्जाखीम आहे असे गृहीत धरुन माझे पक्षकार सदर मिळकतीचे नोंदणीकृत खरेदीखत मूळ मालकाकडून आपल्या हक्कात करुन घेतील व त्यानंतर येणारे आक्षेप माझे पक्षकारावर बंधणकारक राहणार नाहीत याची सर्व जनतेने नोंद घ्यावी,

दिनांक २२/०५/२०२६
तर्फे
ॲड. अशोक ज्ञा. लोखंडे
नोटरी भारत सरकार. शाहू चौक,लातूर
मो..नं. ९४२१९८६४९५

जाहीर प्रगटन देणार
गणेश प्रकाशराव रोंगे,
रा. तिरूपती नगर, साई रोड,लातूर
मो नं. ९५४५५१७१६३

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## विधान परिषद निवडणुकीच्या अनुषंगाने राष्ट्रवादीच्या पदाधिकाऱ्यांची बैठक

**नांदेड** -लोहा - कंधार विधानसभा मतदारसंघाचे आमदार तथा विधिमंडळ उपविधान समितीचे प्रमुख प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या साई सुभाष, वसंतनगर, नांदेड या संपर्क कार्यालयात राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्यावतीने विधान परिषद निवडणुकीच्या अनुषंगाने जिल्ह्यातील राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या नगराध्यक्ष, उपनगराध्यक्ष व नगरसेवकांची, प्रमुख पदाधिकाऱ्यांची बैठक पार पडली. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे शहर जिल्हाध्यक्ष तथा माजी आमदार ओमप्रकाश पोकर्णा, माजी आमदार मोहनराव हंबर्डे, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेश उपाध्यक्ष व्यंकटराव पाटील गोजेगावकर, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे उत्तर जिल्हाध्यक्ष बाळासाहेब पाटील रावणगावकर, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे दक्षिण जिल्हाध्यक्ष शिवराज पाटील होटाळकर, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेश सरचिटणीस प्रविण पाटील चिखलीकर, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे शहर कार्याध्यक्ष माधव पावडे, नागनाथराव घिसेवाड, लोहा नगरपालिकेचे नगराध्यक्ष शरद पवार, देगलूर नगरपालिकेचे नगराध्यक्ष प्रतिनिधी बालाजीराव टेकाळे, उमरी नगरपालिकेचे उपनगराध्यक्ष कैलास देशमुख गोरठेकर, लोहा नगरपालिकेचे उपनगराध्यक्ष करीम शेख, कंधार नगरपालिकेचे उपनगराध्यक्ष मन्नान चौधरी, कंधार नगरपालिकेचे माजी नगराध्यक्ष स्वप्नील पाटील लुंगारे, देगलूर नगरपालिकेचे माजी नगराध्यक्ष लक्ष्मीकांत पदमवार, देगलूर नगरपालिकेचे उपनगराध्यक्ष अंकुशराव देसाई, माजी उपनगराध्यक्ष जफरोद्दिन बाहोदिन, कुंडलवाडी नगरपालिकेचे माजी उपनगराध्यक्ष डॉ.विठ्ठलराव कुडमूलवार, लोहा नगरपालिकेचे माजी उपनगराध्यक्ष दत्ता वाले, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेचे नगरसेवक साबेर चाऊस, नांदेड वाघाळा शहर नगरपालिकेचे नगरसेवक हबीब बावजीर, सचिन नाईक, भास्कर पवार, श्रीनिवास नरवाडे यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती.

## कॅनरा बँक नरसी-नायगाव शाखेत विमा योजनेचा दोन लाख रुपयांचा विमा

**नायगाव**-येथील कॅनरा बँक नरसी, नायगाव शाखेतील बचत खातेदाराने प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजनेअंतर्गत खातेदार सुमकांत जयवंत कसबे या खातेदाराने विमा काढला होता. या खातेदाराचे ऱ्हदयविकराच्या झटक्याने निधन झाले होते. खातेदाराचे वारसदार यांना या योजेअंतर्गत दोन लाख विम्याची रक्कम मिळाली. यावेळी वारसदार यांना दोन लाख रुपये जमा झालेले बँक पासबुक व प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा संबंधी पत्र देण्यात आले. यावेळी कॅनरा बँक शाखा नरसी-नायगाव शाखेचे व्यवस्थापक गंगाधर जाधव, बँकेचे अधिकारी अमोल सोनकांबळे, मिरा हुंबड,शुभांगी डोईफोडे, भगवान भोसले, नागेश बेलकर उपस्थित होते.

## चंपतराव कांबळे व संजय निळेकर यांना समाजभूषण पुरस्कार

**नवीन नांदेड** -अण्णाभाऊ साठे पीपल्स फोर्सच्या वतीने दिल्या जाणारा यावर्षीचा छत्रपती राजर्षी शाहू महाराज समाजभूषण पुरस्कार २०२६



साठी सिडकोचे सामाजिक कार्यकर्ते चंपतराव कांबळे व पत्रकार संजय निळेकर यांना जाहीर झाला आहे. फुले-शाहू -आंबेडकर चळवळीतील सामाजिक, राजकीय, आर्थिक, सांस्कृतिक, शैक्षणिक, वैचारिक, कलात्मक अशा विविध पैलूंनी निः स्वार्थीपणे कार्य असलेल्या सप्त गुणांच्या उल्लेखनीय कार्याची दखल घेऊन अण्णाभाऊ साठे पीपल्स फोर्सने यंदाचा २०२६ चा छत्रपती राजर्षी शाहू महाराज समाजभूषण पुरस्कारासाठी सामाजिक कार्यकर्ते चंपतराव कांबळे व पत्रकार संजय निळेकर यांची निवड झाल्याचे पत्र संबंधित संस्थेच्या निवड समितीचे पत्र निवड समितीचे प्रमुख ड.सुजाता पोहरे नांदेड, डी. एस. वाघमारे अहमदपूर, बा.रा. वाघमारे नांदेड यांच्या स्वाक्षरीने देण्यात आले आहे. या पुरस्काराचे स्वरूप सन्मानचित्र व सन्मानपत्र असे असून या पुरस्काराचे वितरण शुक्रवार दिनांक २६ जून २०२६ रोजी दुपारी १२ वाजता नवीन नांदेड सिडको येथे संपन्न होणार आहे. हा पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल नातेवाईक, मित्र मंडळ विलास गजभारे, प्रदीप हानवते, सम्राट आढाव, आकाश सोनकांबळे यांच्यासह अनेकांनी अभिनंदन करून पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या आहेत.

## लोहा नगर परिषदेच्या स्वीकृत सदस्यपदी श्याम पाटील पवार व शंकर वट्टमवार

**लोहा** -लोहा नगर परिषदेच्या दोन स्वीकृत सदस्यांची पीठासीन अधिकारी नगराध्यक्ष शरद पवार व सहायक म्हणून मुख्याधिकारी संदीप भोळे यांच्या उपस्थितीत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे श्याम पाटील



पवार व माजी नगराध्यक्ष किरण वट्टमवार याचे पुतणे शंकर वट्टमवार यांनी बिनविरोध निवड झाली.पक्षाचे प्रदेश सरचिटणीस प्रवीण पाटील चिखलीकर यांनी या निवडणुकीत आ चिखलीकर यांनी दिलेला शब्द पाळला तसेच कार्यकर्त्यांना न्याय मिळाला . नगराध्यक्ष व सर्व नगरसेवक यांनी सहकार्य मिळाले असे सांगितले लोहा नगर परिषदेच्या स्वीकृत सदस्य निवडीसाठी २१ मे गुरुवारी सकाळी अकरा वाजता पीठासीन अधिकारी म्हणून नगराध्यक्ष शरद पवार यांच्या अध्यक्षतेखाली नगरसेवकाची विशेष बैठक पार पडली .सहायक म्हणून मुख्याधिकारी संदिप भोळे, होते निवडीसाठी नगररचना अभियंता कृष्णा कठारे , अजिंक्य केंद्रे, सुतार, यांनी सहकार्य केले खरेदी विक्री संघाचे माजी उपसभापती श्याम पाटील पवार व माजी नगराध्यक्ष किरण वट्टमवार याचे पुतणे शंकर वट्टमवार यांची निवड करण्यात आली.सभागृहात आर्य वैश्य समाजाला प्रतिनिधित्व देऊ असा शब्द निवडणूक काळात आ प्रतापराव पाटील यांनी या समाजाच्या बैठकीत दिला होता त्याची पूर्तता करण्यात आली .तर नगराध्यक्ष शरद पवार यांचे धाकटे काका श्याम पाटील यांनीही प्रभाग नऊ मध्ये निवडणूक काळात उमेदवारी मागे घेताना शब्द दिला होता तो पाळण्यात आला असे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेश सरचिटणीस प्रवीण पाटील चिखलीकर यांनी सांगितले. निवड झाल्या नंतर दोन्ही नवनियुक्त सदस्य श्याम पाटील व शंकर वट्टमवार याचा प्रवीण पाटील यांनी सत्कार केला नगराध्यक्ष शरद पवार, युवा नेते सचिन पाटील चिखलीकर ,उपनगराध्यक्ष करीमशेख, माजी उपनगराध्यक्ष केशवराव मुकदम , नगरसेवक हरिभाऊ चव्हाण गटनेते भास्कर पवार आदी उपस्थितीत होते.

## उमरीत भीम आर्मी पदाधिकारी युवकांचा वंचित बहुजन आघाडीत प्रवेश

**उमरी** - तालुक्यातील भीम आर्मी संघटनेचे पदधिकारी व युवकाचा वंचित बहुजन आघाडी या पक्षामध्ये प्रदेश केला आहे. दि. २० मे बुधवारी उमरी येथील सभागृहात युवा आघाडीचे प्रदेश सदस्य अक्षयभाऊ बनसोडे यांच्या अध्यक्षतेखाली व वंचित बहुजन आघाडी नांदेड दक्षिण चे जिल्हाध्यक्ष शंकरजी महाजन, जिल्हा उपाध्यक्ष अरुण भद्रे, युवा आघाडी जिल्हा संघटक संदेश गायकवाड यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडलेल्या पक्ष प्रवेश सोहळ्यात भीम आर्मी चे जिल्हा सचिव संदीप लांडगे,गंगाधर गंगासागरे यांच्यासह सुरज डोंगरे, बाबासाहेब सोनटक्के, बुद्धतेज डोंगरे, संघर्ष जोंधळे, सिद्धार्थ खंदारे, रवी लोखंडे,विकास खंदारे आदी पदाधिकारी व युवकांनी राष्ट्रीय नेते मा. बाळासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेऊन वंचित बहुजन आघाडीत प्रवेश केला. कार्यक्रमास गंगाधर लांडगे, डी.जी. तुपसाखरे, करुणा खंडेलोटे, आनंदराव पवार, सरपंच पोषट्टी पोलासवाड, सरपंच बालाजी वाघमारे, भीमराव वाघमारे, सय्यद इलियास, मारोती जाधव, शेख रफिक, अशोक कांबळे, आर्यन लांडगे, विकास डुमने आदी उपस्थित होते.

# साखळी उपोषणाचा बारावा दिवस ; प्रशासनाचे दुर्लक्ष

**तभा वृतसेवा**
**मुदखेड, दि. २२ मे -**

मुदखेड शहरात गेल्या ३० ते ३५ वर्षांपासून प्रलंबित असलेल्या भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णकृती पुतळ्याच्या मागणीसाठी सामाजिक कार्यकर्ते मारोती डुबुकवाड यांनी सुरू केलेले साखळी उपोषणाचा आज १० वा दिवसात मात्र, प्रशासनाच्या ढिम्म आणि उदासीन भूमिकेमुळे शहरात तीव्र संताप व्यक्त होत असून, हा प्रश्न त्वरित न सुटल्यास शासकीय कार्यालयांवर धडक मोर्चा काढण्याचा इशारा उपोषणकर्त्यांनी दिला आहे.

मुदखेड शहराच्या वैभवात भर घालणारा आणि आंबेडकरी अनुयायांचे श्रद्धास्थान असलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णकृती पुतळ्याचा प्रश्न गेल्या साडेतीन दशकांपासून रखडला आहे. यासाठी आजवर अनेकदा निवेदने, आंदोलने आणि उपोषणे करण्यात आली. परंतु, प्रशासनाकडून केवळ आश्वासनांशिवाय काहीही मिळाले नाही. अखेर प्रशासनाला जागे करण्यासाठी मारोती डुबुकवाड यांनी गेल्या दि.१२ मे रोजी पासून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याच्या नियोजित ठिकाणी साखळी उपोषण सुरू केले आहे.

उपोषणाचा काळ जसा वाढत आहे, तसा शहरातील आणि तालुक्यातील विविध घटकांचा पाठिंबा या आंदोलनाला मिळत आहे. मुदखेड शहर व तालुक्यातील खालील संघटना आणि पक्षांनी उपोषणस्थळी भेट



देऊन आपले लेखी पाठिंबा पत्र सुपूर्द केले आहे यामध्ये प्रहार जनशक्ती संघटना,भारतीय बौद्ध महासभा (समता सैनिक दल), महिला बचत गट,काँग्रेस पक्ष,एम.आय.एम. (चखच्) पक्ष स्थानिक व्यापारी संघटना इतर सामाजिक व राजकीय क्षेत्रातील मान्यवर आणि संघटना लोकप्रतिनिधींच्या पाठफिरवण्यामुळे समाजात तीव्र असंतोष आंदोलनाला १२ दिवस उलटून गेले तरी या भागाचे स्थानिक आमदार आणि खासदार यांनी अद्याप उपोषणस्थळाला साधी भेटही देखील दिली नाही, ना या विषयावर कोणती ठोस भूमिका घेतली. लोकप्रतिनिधींच्या या संवेदनशीलतेच्या अभावामुळे आणि पाठफिरवण्याच्या भूमिकेमुळे मुदखेड शहर व परिसरातील आंबेडकरी समाजामध्ये आणि नागरिकांमध्ये या नेत्यांबद्दल तीव्र द्वेष आणि संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे.

**प्रशासनाने आमच्या भावनांशी खेळू नये**

३०-३५ वर्षांपासून प्रलंबित असलेला हा न्याय्य हक्क आम्ही घेतल्याशिवाय मागे हटणार नाही. जर येत्या काही दिवसांत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णकृती पुतळ्याचा प्रश्न मार्गी लागला नाही, तर आम्ही सर्व संघटना आणि नागरिकांना सोबत घेऊन शासकीय कार्यालयांवर तीव्र स्वरूपाचा धडक मोर्चा काढू, असा स्पष्ट इशारा उपोषणकर्ते मारोती डुबुकवाड यांनी माध्यमांशी बोलताना दिला.

आता या चिघळत चाललेल्या आंदोलनावर प्रशासन आणि लोकप्रतिनिधी काय पावले उचलतात, याकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे.

## २५ वर्षांपासून बंद असलेला शिवरस्ता खुला

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २२ मे -**

नांदेड तालुक्यातील सुगाव बुद्रुक, सुगाव खुर्द ते भानपूर या मार्गावरील शिवरस्त्यावर गेल्या अनेक वर्षांपासून अतिक्रमण झाले होते. संबंधित शेतकऱ्यांना रस्त्याचे महत्त्व समजावून सांगून त्यांच्या सहमतीने आज दि. २२ मे २०२६ रोजी सुमारे १.५ कि.मी. लांबीचा रस्ता खुला करण्यात आला.

जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, उपविभागीय अधिकारी डॉ. सचिन खल्लाळ तसेच तहसीलदार संजय वारकड यांच्या मार्गदर्शनाखाली नांदेड तालुक्यात शिवरस्ते व पाणंद रस्ते मोकळे करण्याची मोहीम राबविण्यात येत आहे.

या कारवाईवेळी नायब तहसीलदार (महसूल) सुनिल माचेवाड, मंडळ अधिकारी नाळेश्वर, कुणाल जगताप, तलाठी सज्जा वाघी राजेश बरोडा तसेच गावातील प्रतिष्ठित नागरिक व शेतकरी उपस्थित होते.

यापुढेही अशाच प्रकारचे शिवरस्ते खुले करण्यात येणार असल्याचे तहसीलदार संजय वारकड यांनी सांगितले. तसेच रस्ते अडविणाऱ्या शेतकऱ्यांना पुढे शासकीय लाभांपासून वंचित ठेवण्याचा इशाराही त्यांनी दिला.

पावसाळ्यात शेतात जाण्यासाठी शेतकऱ्यांना चिखलातून जावे लागत होते. आता रस्ता मोकळा झाल्याने शेतकऱ्यांनी साखर वाटून आनंद व्यक्त केला.

यावेळी दत्ता भोसले, बाबुराव शिंदे, नामदेव शिंदे, दत्तराव तातेराव भोसले, विजय भोसले, गंगाधर भोसले, संतोष भोसले, जळबाजी भोसले आदी शेतकरी उपस्थित होते.

# खतांच्या तुटवड्याविरोधात शिवसेनेचे आंदोलन

**तभा वृतसेवा**
**देगलूर, दि. २२ मे -**

खरीप हंगाम तोंडावर असताना शेतकऱ्यांना आवश्यक असलेल्या डी.ए.पी., युरिया आदी रासायनिक खतांचा तीव्र तुटवडा निर्माण झाल्याने शेतकरी हवालदिल झाले आहेत. या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांच्या प्रश्नासाठी आक्रमक भूमिका घेत शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या वतीने सोमवार दि. २५ मे रोजी देगलूर येथे कृषी सेवा केंद्रे व मोंढा (आडत) दुकाने बंद आंदोलन करण्यात येणार असल्याची घोषणा करण्यात आली आहे.

शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करू अशी घोषणा करणाऱ्या शासनाच्या काळात कृषीप्रधान देशातील अन्नदाता बळीराजालाच खतांसाठी वणवण फिरावे लागत असल्याची संतप्त प्रतिक्रिया शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केली. खरीप हंगामातील सोयाबीन, मुग, उडीद, कापूस आदी पिकांच्या पेरणीसाठी डीएपी व युरिया खतांची अत्यंत आवश्यकता असताना स्थानिक बाजारात खतांचा तुटवडा



जाणवत आहे. परिणामी अनेक शेतकऱ्यांना शेजारील तेलंगणा, आंध्रप्रदेश व कर्नाटक राज्यात जादा दराने खते खरेदी करण्यासाठी जावे लागत असून त्यामुळे आर्थिक, मानसिक व शारीरिक त्रास सहन करावा लागत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

खरीप हंगामासाठी शेतकऱ्यांना मागेल त्या प्रमाणात रासायनिक खते तात्काळ उपलब्ध करून द्यावीत, या मागणीसाठी आंदोलन करण्यात येणार असून यासंदर्भातील निवेदन जिल्हाधिकारी, उपजिल्हाधिकारी, तहसीलदार, तालुका कृषी अधिकारी, गटविकास अधिकारी, पोलिस निरीक्षक, आडत व्यापारी संघटना व कृषी सेवा केंद्र संघटना यांच्या पदाधिकाऱ्यांना देण्यात आले.

शिवसेना उपजिल्हाप्रमुख महेश पाटील यांच्या नेतृत्वाखाली शिष्टमंडळाने हे निवेदन दिले. यावेळी माजी जिल्हा परिषद सदस्य नागनाथ वाडेकर, शहरप्रमुख भगवान जाधव, बाबुराव मिनकीकर, युवा सेना तालुकाप्रमुख तथा सोशल मीडिया नेटवर्क प्रमुख भागवत पाटील सोमुरकर, युवा सेना शहरप्रमुख विनोद सोनकांबळे, संतोष कांबळे, सय्यद मिरभाई, गंगाधर पाटील चाकूरकर, राजू उल्लेवार, हणमंत राजुरे लख्खेकर, संजय पाटील लख्खेकर, दत्तात्रय बेंजलवार, शिवाजी चव्हाण, शिवाजी पाटील ढोसणीकर, अर्जुन लुटे, राजू जाधव तडखेलतांडा, अजित पाटील पाळेकर, संजीव मंगरुळे, सिद्धेश्वर आयनेलवार, सायबू विभुते यांच्यासह मोठ्या संख्येने शेतकरी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# उघड्यावरील वैश्या व्यवसाय बंद परंतू हायफाय लॉजवरील वैश्या व्यवसायाचा जम बसला

**तभा वृतसेवा**
**लोहा, दि. २२ मे -**

शहरात लॉजिंग व्यवसाय जोमात चालु आहे. मागील काळात उघड्यावर चालणारा वैश्या व्यवसाय समुळ नष्ट केला होता. पण आधुनिक काळात हायफाय लॉजवरील वैश्या व्यवसायाने जम बसविला आहे.अवैध वैश्या व्यवसायाने डोके वर काढले आहे. शहरातुन राष्ट्रीय महामार्ग गेल्याने शहराची झपाट्याने वाढ होत आहे तेवढीच अवैध धंद्यात भर पडत आहे.पुन्हा हां व्यवसाय तरुणाईमध्ये चर्चे चा विषय झाला आहे.पोलीस प्रशासनाने शनीवारी दुपारी शहरातील काही लॉजवर धाड टाकून नियमांचे उल्लंघन करणाऱ्या लॉज व्यवस्थापकांविरुद्ध कारवाई केली. या धाडीमध्ये लॉजवर आठ जोडपे पोलिसांना आढळून आले. ज्या उदेशाने छापा मारण्यात आला होता पण सुट्ट्याचे दिवस असल्याने लॉजवर अल्पवयीन तरुणाईचा तांडव दिसुन आला नाही.

पोलीस विभागाने शहरातील चार ते पाच लॉजवर एकाचवेळी धाडसत्र राबविले. यामध्ये उपविभागीय पोलिस अधिकारी अश्विनी जगताप , पोलिस निरीक्षक नागनाथ आयलाने, कंधारचे पोलिस निरीक्षक चंद्रकांत जाधव, सहायक पोलिस निरीक्षक रामचंद्र केदार , महिला पोलिस अधिकारी, महिला पोलिस कर्मचारी यांच्या ताफाच तैनात करुन धाडसत्र सुरु केले या धाडसत्रात लॉजमध्ये ८ तरुण ८ तरुणी आशा आठ जोड्या आढळून आल्या. पोलिसांनी लॉजच्या नोंदणी रजिस्टरची पाहणी केली असता केवळ एकाच व्यक्तीच्या नोंदीवर ८ तरुण ,तरुणीला प्रवेश दिल्याचे निदर्शनास आले. लॉजवर मिळालेल्या संबधीताचे रेकार्ड तपासुन आधारकार्ड, ओळखपत्र घेण्यात आले आसता असे स्पष्ट दिसुन आले की लॉजवर हायफाय वैश्या व्यवसाय जोमात चालु असल्याचे या घटनेवरून कळाले.

मागील काळात शिवसेनेचे माजी आ. रोहिदास चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली शिवसेना विद्यार्थी सेनेचे शहर प्रमुख संजय चव्हाण, भिमराव पाटील शिंदे असे अनेक शिवसैनिकांनी २००१ ते २००४ काळात आक्रमकता दाखवून उघड्यावर चालणारा वैश्या व्यवसाय बंद करुन जागेवर थांबण्यास बंदी घातली. परिसरात आढळुन आलेतर परिणाम होगा वे लागतील आशा सजड दम दिला. देशात गोवा...राज्यात लोहा अशी म्हण रुढ झाली होती. हा कलंक पुसुन टाकण्यासाठी शिवसैनिकानी कोणाचीही परवा केली नाही आणि हां उघड़ा चालनारा वैश्या व्यवसाय कायमाचा बंद केला. या निर्णयाचे तत्कालीन कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती कै. विठ्ठलराव पाटील पवार, माजी नगराध्यक्ष कै.माणिकराव पाटील पवार, माजी सभापती कै. व्यंकटराव मुक्कदम, माजी उपनगराध्यक्ष कै. संभाजीराव धुतमल यांनी या शिवसैनिकाचे तोंडभरुन कौतुक केले होते. परंतू शहर भौगलिक पृष्ठभागाने चौरस फुट मिटरने वाढत होत आहे आणि अवैध धंद्येवाले पावला ..पवला बस्तान मांडून बसले दिसुन येतात. याकडे लोकप्रतिनिधी व शहरातील जेष्ठ प्रतिष्ठीत नागरिकानी लक्ष देऊन अवैध धंद्याला आळा घालण्याची वेळ आली आहे.

# डॉ. शेख रुखसाना,यांची जागतिक स्तरावर झेप

**तभा वृतसेवा**
**मुक्रमाबाद, दि. २२ मे -**



मुखेड तालुक्यातील मुक्रमाबाद येथील रहिवासी असलेल्या व सध्या छत्रपती संभाजीनगर येथील बी.एड. कॉलेजला प्राचार्य म्हणून कार्यरत असलेले डॉ.शेख रुखसाना अजीजसाब यांनी व त्यांच्या सहकारी गटाने दृष्टीहीन, श्रवणदोष असलेले व विशेष गरजा असलेल्या विद्यार्थ्यांसाठी विकसित केलेल्या फोल्डेबल मल्टी - सेन्सर इंटरॅक्टिव्ह लर्निंग असिस्टिव्ह डिव्हाइस सिस्टीम या उपकरणाला यू.के.पेटंट कार्यालयाकडून मान्यता मिळाली आहे. संबंधित उपकरणा द्वारे दृष्टीहीन, श्रवणदोष व विशेष गरजा असलेले विद्यार्थी पाहणे, ऐकणे आणि स्पर्श करणे या तिन्ही माध्यमांतून अध्ययन करू शकतात, सदरील उपकरण हे विशेष शाळा व विशेष बी.एड. प्रशिक्षणार्थ्यांसाठी उपयुक्त आहे. हे उपकरणाची सहजपणे घडी घालता येते त्यामुळे हे वापरण्यात अत्यंत सुलभ आहे तसेच प्रवासामध्ये सहजपणे घडी घालून लहान आकारामध्ये ठेवता येते. मुक्रमाबाद सारख्या एका खेड्यापासून ते जागतिक स्तरापर्यंत मारलेल्या या झेपामुळे त्यांच्यावर त्यांचे कुटुंबीय, सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

हे उपकरण विकसित करण्यामध्ये डॉ.शेख रुखसाना अजीजसाब यांच्या व्यतिरिक्त डॉ.शेख सुभान हसन, डॉ. बाळासाहेब किलचे, डॉ. योगेंद्र कुमार पवार, डॉ.अमरदीप असोलकर, डॉ.मीनाक्षी पाटील व डॉ. शुभांगी पाटील यांचा सहभाग आहे.

**मुक्रमाबाद ते लंडनः कौतुकाचा वर्षाव**

मुक्रमाबादसारख्या ग्रामीण भागातून शिक्षण घेऊन, थेट जागतिक पातळीवर ब्रिटनचे पेटंट मिळवण्यापर्यंत डॉ. रुखसाना यांनी मारलेली ही झेप अत्यंत प्रेरणादायी आहे. जागतिक स्तरावरील या गौरवामुळे डॉ. शेख रुखसाना आणि त्यांच्या संपूर्ण टीमवर शैक्षणिक, सामाजिक, राजकीय आणि वैज्ञानिक क्षेत्रातून कौतुकाचा वर्षाव होत आहे. मुक्रमाबाद येथील त्यांच्या कुटुंबीयांसह ग्रामस्थांनी आणि नांदेड जिल्ह्यातील शैक्षणिक वर्तुळाने या यशाबद्दल मोठा आनंद व्यक्त केला आह.

# मांडवा , झेंडीगुडा येथील पांदण व शिवरस्त्यांचा प्रश्न मार्गी लागणार

**तभा वृतसेवा**
**किनवट, दि. २२ मे -**

तलाठी सज्जा मांडवा अंतर्गत येणाऱ्या मांडवा आणि झेंडीगुडा येथील प्रलंबित पांदण व शिवरस्त्यांचा प्रश्न आता निकाली निघणार आहे. तहसीलदार च्या आदेशानुसार, स्थानिक तलाठ्यांनी या रस्त्यांची प्रत्यक्ष जागेवर जाऊन चौकशी केली असून, सविस्तर अहवाल वरिष्ठ कार्यालयाकडे सादर केला आहे. मांडवा गावातील दोन पांदण रस्त्यांची चौकशी पूर्ण झाली



असून, झेंडीगुडा येथील १५०० मीटर लांबीच्या शिवरस्त्याबाबत शेतकऱ्यांनी मोठा निर्णय घेतला आहे. महसूल प्रशासनाच्या मध्यस्थीनंतर, भूमिलेख (भूमी अभिलेख) विभागामार्फत अधिकृत मोजणी करून लोकसहभागातून हा रस्ता मोकळा करण्यास सर्व संबंधित शेतकऱ्यांनी लेखी सहमती दर्शविली आहे. शेतकऱ्यांच्या या समजूतदार भूमिकेमुळे परिसरातील दळणवळणाचा आणि शेतीचा प्रश्न सुटणार असून, ग्रामस्थांमधून या निर्णयाचे स्वागत होत आहे.लवकर शासकीय दिरंगाई टाकुन रस्ता पावसाळ्यापूर्वी पुर्ण करावे अशी मागणी शेतकऱ्यांकडून करण्यात येत आहे. पादंन रस्त्या च्या तीनही ठिकाणी परिसरातील शेतकरी ,नागरिक सह मंडळ निरीक्षक लाटकर, तलाठी तिळेवाड ,महसूल सेवक मुढें यावेळी उपस्थित होते.

# मुदखेड पालिकेच्या राजकारणातून तीन समाजाला डावलले

## माजी नगराध्यक्षांच्या पुत्राने व्यक्त केली खंत

**तभा वृतसेवा**
**मुदखेड, दि. २२ मे -**

एकेकाळी मुदखेड नगर परिषदेच्या राजकारणावर आणि सत्तेवर कोमटी, ब्राह्मण आणि मारवाडी समाजाचे मोठे वर्चस्व होते. मात्र, गेल्या दोन दशकांपासून (२० वर्षांत) हा त्रिवेणी समाज स्थानिक राजकारणातून पूर्णपणे बाद (बॅकफूटवर) झाल्याचे चित्र पाहायला मिळत आहे, अशी तीव्र खंत माजी नगराध्यक्ष नारायण कोत्तावार यांचे चिरंजीव श्रीरंग कोत्तावार यांनी व्यक्त केली आहे.

**कधीकाळी होते सत्ताधीश, आता केवळ इतिहास!**

मुदखेड नगर परिषदेच्या राजकीय इतिहासाचा आढावा घेतला, तर या तीनही समाजांनी पालिकेला सक्षम नेतृत्व दिले होते. मुदखेड पालिकेचे पहिले नगराध्यक्ष होण्याचा बहुमान ब्राह्मण समाजातील राम चौधरी यांना मिळाला होता. या समाजाने शहराला दोन खंबीर नेतृत्व दिले. कोमटी समाजातील नारायण कोत्तावार आणि राजबहादूर कोत्तावार या दोन भावांनी नगराध्यक्षपद भूषवून शहराच्या विकासात मोलाचे योगदान दिले.

मारवाडी समाजाचे ज्येष्ठ नेते कै. बालाप्रसाद कालाणी यांनी उपनगराध्यक्ष म्हणून काम पाहिले. तर सौ. अर्चना शंकर राठी यांना नगराध्यक्षपदाचा मान मिळाला. याशिवाय शंकर राठी, गोविंद कालाणी आणि राम सोनी यांनी नगरसेवक म्हणून पालिकेत उत्तम कामगिरी बजावली होती.

वास्तविक पाहता, एकेकाळी मुदखेड पालिकेच्या राजकारणाची संपूर्ण धुरा या तीन प्रमुख समाजांच्या नेतृत्वाभोवती फिरत होती. परंतु, बदलत्या राजकीय समीकरणांमुळे आज हा समाज मुख्य प्रवाहातून आणि सत्ताकारणातून पूर्णपणे दूर फेकला गेला आहे, हे अत्यंत खेदजनक चित्र आहे.

बदलत्या काळानुसार मुदखेडच्या राजकारणाची समीकरणे बदलली असली, तरी या तीनही समाजांनी शहराच्या सुरुवातीच्या जडणघडणीत लावलेली हजेरी आणि दिलेले योगदान आजही नागरिकांच्या स्मरणात आहे. सध्याच्या या राजकीय स्थितीवर आता स्थानिक वर्तुळात विविध चर्चा रंगू लागल्या आहेत.

**भाजपाची जूनी निष्ठावंत कार्यकर्ते गुंडाळले**

गेल्या अनेक वर्षांपासून भाजपाचा धूरा सांभाळत आज महा सत्ता आणण्यासाठी मोठा सिंहाचा वाटा मानला जातो परंतु आज परिस्थिती पाहता शेकडो कार्यकर्ते मधील दोन सोडलं तर एकाएकाने आज सर्व पते कापले गेले या मध्ये जिल्हा महामंत्री प्रविण गायकवाड, शहराध्यक्ष मुन्ना चांडक, महीला तालुका अध्यक्ष जयश्री देशमुख, जिल्हा महिला केतकी चौधरी, युवा शहराध्यक्ष देवा धबडगे, गोविंद गुडमवार, प्रविण काचावार , कुणाल चौधरी, अमोल आडकीणे यांना कोस दूर करण्यांत आले तर

गोविंद गोपनपले, गंगाधर डांगे, संतोष चमकुरे , शैलेश गुडमलवार, प्रकाश सुर्यवंशी यांच्यासह अदी ने भाजप पक्ष सोडून काँग्रेस व उद्धव ठाकरे यांच्या पक्षात प्रवेश करावा लागेल आहे.

# चनकवाडी बंधाऱ्याजवळ 'घरकुल सेतू'; पैठण तालुक्यातील 18 हजार घरकुल धारकांना मिळणार मोफत वाळू

मंगलसिंग भवरे /तभा वृत्तसेवा

पैठण दि २२ :- आमदार विलास बाप्पू भुमरे यांच्या प्रयत्नांनी पैठण तालुक्यातील १८ हजार घरकुल धारकांना प्रत्येकी पाच ब्रास मोफत वाळू मिळणार असून यासाठी शासनाच्या वतीने पैठण शहारालगत चनकवाडी बांधाऱ्या जवळ पाण्यावर गोदावरी पात्राच्या आरपार रस्ता (घरकुल सेतू ) तयार करण्यात आला शुक्रवारी सकाळी या डेपोचे उदघाटन आमदार विलास बाप्पू भुमरे यांच्याहस्ते करण्यात आले.तालुक्यातील गोदावरी प्रवाहातील आवडे उंचेगांव, टाकळी अंबड, हिरडपुरी, आपेगांव आणि शहारा जवळील चनकवाडी याठिकाणी वाळू डेपो केंद्र उभारण्यात येणार असल्याची माहिती तहसीलदार ज्योती पवार यांनी दिली.



दरम्यान शुक्रवारी सकाळीच सुरु झालेल्या चनकवाडी बंधारा वाळू डेपो वरून अनेक घरकुल लाभार्थ्यांना घरपोच वाळू देण्यात आली. गोदावरी पात्रात तयार करण्यात केलेल्या सेतू रस्त्यामुळे अनेक शेतकऱ्यांच्या पाईप लाईन तसेच पाणी मोटरीचे नुकसान झाले असून या डेपोच्या वाळू वाहतूकीमुळे बांधाऱ्याला ही नुकसान पोहचत असल्याने स्थानिक शेतकऱ्यांनी याठिकाणी ठिय्या आंदोलन केले. यामुळे परिसरात काही काळ तणाव निर्माण झाला होता.

चनकवाडी बंधारा जवळील डेपोचे उदघाटन आपल्या हस्ते करण्यात आले असून पैठण शहर व तालुक्यातील शासकीय घरकुल धारकांना प्रत्येकी ५ ब्रास वाळूचे मोफत वितरण करण्यात यावे. ही योजना राबवताना तहसीलदार,नगर परिषदेचे मुख्याधिकारी व पंचायत समितीच्या गटविकास अधिकाऱ्यांनी हयगय करु नये.' अशा कडक सुचना दिल्या आहेत.
- आ. विलास बाप्पू भुमरे, पैठण.

जवळील जिह्यासह पैठणला वाळूचे भाव पाहिले असता घरकुल योजनेत लाभ धारकांना मिळणारी तीस टक्के रक्कम वाळूसाठी लागणार. आणि उर्वरित रकमेत कसे घर बांधणार ही दुविधा नागरिकांची झाल्याने घरकुल धारकांच्या मदतीला आमदार विलास बाप्पू भुमरे धावून आले असून त्यांच्या प्रयत्नाने घरकुल धारकांना टप्पा टप्याने मोफत वाळू मिळणार आहे.
- नगराध्यक्षा विद्याताई भूषण कावसनकर नगर परिषद पैठण.

घरकुल धारकांना वाळू मिळावी यासाठी आमदार विलास बाप्पू भुमरे यांनी बैठकीत दिलेल्या सूचनेवरून गोदावरी पट्यातील चार ते पाच ठिकाणी घरकुल धारकांना वाळू मिळण्यासाठी प्रयत्न सुरु आहेत. ज्या धारकांना जवळ पडेल त्या शासकीय डेपोतुन त्यांना वाळू दिली जाणार यासाठी पंचायत समिती व नगर परिषद यांच्याकडे नोंदणी करून वाळूची मागणी करावी.
- तहसीलदार ज्योती पवार पैठण

तालुक्यात ग्रामीण भागातील घरकुल मंजूर झालेल्या नागरिकांची आर्थिक स्थिती पाहता त्यांना वाळू घेणे अवघड झाले होते. परंतु आमदार विलास बाप्पू भुमरे यांच्या पुढाकाराने सर्वांना आपल्या स्वप्नातील घरासाठी मोफत वाळू मिळणार आहे...
- वैशाली विनोद बोंबले सभापती पंचायत समिती पैठण.

पैठण तालुक्यातील घरकुल धारकांना वाळू मिळत नसल्याने घरकुलचे काम थांबले होते. जास्त दराने मिळत असलेले वाळू परवडत नसल्याने या लाभार्थ्यांनी आमदार विलास बापू भुमरे यांची भेट घेऊन आपली कैफियत मांडली यावर आमदार भुमरे यांनी तहसील प्रशासनासह पंचायत समिती व नगरपरिषद अधिकाऱ्यांची बैठक घेऊन घरकुलधारकांची वाळू बाबत अडचण दूर करण्याचे निर्देश दिले. यावरून तहसीलदार ज्योती पवार यांनी स्वतः पथकासह गोदावरी प्रवाहाची पाहणी करून वाळू असलेले ठिकाण निवडले. आता वरील ठिकाणी घरकुल धारकांना शासकीय वाळू डेपोतून प्रत्येकी पाच ब्रास वाळू मिळणार आहे. ही वाळू घरकुल मालकाला बेसिमेंट, कॉलम, स्लॅब, प्लास्टर कामासाठी टप्पा टप्याने मिळणार आहे.तालुक्यातील घरकुल धारकांची सध्याची संख्या आणि मंजूर होणारी संख्या पाहता जवळपास १ लक्ष ब्रास वाळू घरकुल कामासाठी लागणार आहे.या वाळूची शासकीय किंमत ३० कोटींच्या घरात सांगितली जात आहे.

## ड्रिल स्पर्धेत श्री सरस्वती भुवन प्रशाल बिडकीन चे वर्चस्व



तभा वृत्तसेवा

बिडकीन दि २२ मे करिअर डिफेन्स अकॅडमी छत्रपती संभाजीनगर येथे दि ७ ते १६ या कालावधीत पार पडलेल्या एनसीसीच्या कॅम्प मध्ये विविध स्पर्धेत प्रशालेने तीन गोल्ड मेडल, दोन सिल्वर मेडल व दोन ब्रांझ मेडल मिळवले. ड्रिल मध्ये मुलींच्या गटात सर्व तीन पारितोषिके प्रशालेच्या विद्यार्थिनींनी मिळविले.विजेत्या विद्यार्थ्यांचा व ट्रूप कमांडर चीफ ऑफिसर सोकटकर बाबासाहेब यांचा उत्कृष्ट कार्या बद्दल.50 महाराष्ट्र बटालियन एनसीसी छत्रपती संभाजीनगरचे कमांडिंग ऑफिसर कर्नल बी पी एस ठाकूर साहेब यांच्या हस्ते गौरव आला.

१) सार्जंट हाडे श्रीयश सतीश - ( DST ) ड्रिल - गोल्ड मेडल २) सार्जंट जाधव काव्यांजली गणपत -(DST) ड्रिल - गोल्ड मेडल ३) कॅडेट नवपुते पार्थ उद्धव -फायरिंग - गोल्ड मेडल ४) कॅडेट नवपुते पार्थ उद्धव - तबला वादन - सिल्वर मेडल ५) cpl राठोड सोनू रवी - ( DST ) ड्रिल - सिल्वर मेडल ६) cpl गरड राधिका नंदू - ( DST ) ड्रिल - ब्राँझ मेडल ७) cpl खंडागळे यश विठ्ठल -चारशे मीटर धावणे - ब्रांझ मेडल.संस्थेचे सदस्य तथा शाखा समन्वयक डॉक्टर कोणार्डे मिलिंद, स्थानिक नियमक मंडळाचे अध्यक्ष तोतला किसानसेठ, मुख्याध्यापक येवले धर्मेंद्र, स्थानिक नियामक मंडळाचे सदस्य वैद्य नंदकुमार, हाडे मच्छिंद्र, डॉक्टर धरपळे अंताराम, आर्वीकर जगन्नाथ, दौंडे संजय, ठाणगे बबनराव, उपमुख्याध्यापिका मिश्रा मनीषा, प्रभारी पर्यवेक्षक बहाळकर व प्रभारी पर्यवेक्षक राजू शिंदे यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

## उंधियूची 'लक्ष्मी निवास'च्या सेटवर खास परंपरा

तभा वृत्तसेवा

छत्रपती संभाजीनगर प्रतिनिधी: झी टीव्हीवरील 'लक्ष्मी निवास' मालिकेच्या सेटवर अभिनेत्री मानसी जोशी रॉय यांनी आणलेला घरगुती उंधियू आता कलाकार आणि टीमसाठी खास आकर्षण ठरत आहे. 'माँ भी सास बहू थी' मालिकेदरम्यान सुरू झालेली ही परंपरा त्यांनी 'लक्ष्मी निवास'च्या सेटवरही कायम ठेवली आहे.

मानसी जोशी रॉय म्हणाल्या की, घरचे बनवलेले पदार्थ सर्वांसोबत शेअर करण्यात वेगळाच आनंद मिळतो. उंधियूमुळे सेटवरील वातावरण अधिक कौटुंबिक आणि आनंदी बनते. कलाकार एकत्र बसून जेवण, गप्पा आणि आनंदाचे क्षण अनुभवतात. 'लक्ष्मी निवास' ही मालिका सोमवार ते शुक्रवार संध्याकाळी 7 वाजता झी टीव्हीवर प्रसारित होते.

## शिवायचे निस्वार्थ प्रेम प्रेक्षकांच्या पसंतीस

छत्रपती संभाजीनगर, प्रतिनिधी - झी टीव्हीवरील जगद्धात्री ही मालिका सध्या प्रेक्षकांच्या विशेष पसंतीस उतरली असून तिच्या कथानकातील थरार, भावनिक नाट्य आणि नातेसंबंधांमुळे मालिकेची लोकप्रियता वाढत आहे. मालिकेत शिवाय आणि जगद्धात्री यांच्यातील नात्याची चर्चा रंगत असून शिवायचे एकतर्फी पण निस्वार्थ प्रेम प्रेक्षकांना भावत आहे. अभिनेता फर्मान हैदर याने सांगितले की, शिवाय ही व्यक्तिरेखा अतिशय प्रामाणिक आणि "ग्रीन फ्लॅग" आहे. जगद्धात्रीसाठी तो नेहमी तिच्या पाठीशी उभा राहतो, तिचा आदर करतो आणि तिच्याकडून कोणतीही अपेक्षा ठेवत नाही. त्यामुळे ही प्रेमकथा इतर मालिकांपेक्षा वेगळी आणि खास ठरणार असल्याचे त्याने म्हटले. आगामी भागांमध्ये शिवाय आणि जगद्धात्री एका नव्या ड्रग डीलरचा शोध घेताना दिसणार आहेत. त्याचवेळी देशमुख कुटुंबातील वाढते तणाव आणि मायाचा वाढता संशय यामुळे कथानकात नवे वळण येणार आहे.

## एमजीएममध्ये आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन

छत्रपती संभाजीनगर, दि.२२ : महात्मा गांधी मिशन विद्यापीठाच्या वतीने १७ व्या आंतरराष्ट्रीय आंतरविद्याशाखीय शैक्षणिक परिषदेचे आयोजन शुक्रवार, दि.१२ जून २०२६ आणि शनिवार, दि.१३ जून २०२६ रोजी एमजीएम विद्यापीठ परिसरात करण्यात आले आहे. "शैक्षणिक परिवर्तनासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर : विविध विद्याशाखांचा समन्वय" या संकल्पनेवर आधारित ही दोन दिवसीय परिषद आयोजित करण्यात आली असून शिक्षण, तंत्रज्ञान, आरोग्य, व्यवस्थापन, अभियांत्रिकी आणि संशोधन क्षेत्रातील आंतरराष्ट्रीय तज्ज्ञ, संशोधक, प्राध्यापक आणि धोरणकर्ते यांचा यात सहभाग राहणार आहे.

ही परिषद एमजीएम विद्यापीठ, महाराष्ट्र, भारत; ब्रिजवॉटर स्टेट युनिव्हर्सिटी (बीएसयू), मॅसेच्युसेट्स, अमेरिका; हसन द्वितीय विद्यापीठ, कॅसाब्लांका, मोरोक्को; सिदी मोहम्मद बेन अब्देल्लाह विद्यापीठ (एसएमबीएयू), फेस, मोरोक्को आणि तफिला टेक्निकल युनिव्हर्सिटी (टीटीयू), तफिला, जॉर्डन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आली आहे.

परिषदेच्या माध्यमातून शिक्षण क्षेत्रातील आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, नवोपक्रम, आंतरविद्याशाखीय संशोधन, शाश्वत विकास आणि जागतिक स्तरावरील शैक्षणिक परिवर्तन या विषयांवर सखोल चर्चा होणार आहे. विज्ञान, तंत्रज्ञान, अभियांत्रिकी, कला आणि वैद्यकशास्त्र (स्टिम) या संकल्पनेच्या माध्यमातून सर्वसमावेशक आणि मानवकेंद्रित शिक्षणव्यवस्था विकसित करण्याचा या परिषदेचा मुख्य उद्देश आहे.

या परिषदेत विविध विषयांवर आधारित नऊ प्रमुख संकल्पनांचा समावेश करण्यात आला आहे. त्यामध्ये नाविन्यपूर्ण अध्यापन आणि अध्ययन पद्धती, शिक्षणातील समानता, विविधता आणि समावेशकता, आधुनिक विद्यार्थ्यांसाठी मूल्यमापन आणि अभिप्राय प्रणाली, शिक्षण आणि अध्यापनशास्त्रीय नवोपक्रम, मूलभूत विज्ञान, आरोग्य विज्ञान, वैद्यकीय शिक्षण आणि आरोग्यपूर्ण जीवनशैली, व्यवस्थापन, व्यवसाय आणि उद्योजकता शिक्षण, समकालीन शिक्षणात भारतीय ज्ञान प्रणालींचा समावेश तसेच अभियांत्रिकी, तंत्रज्ञान आणि प्रायोगिक संशोधन या विषयांचा समावेश आहे.

परिषदेमध्ये संशोधनपर सत्रे, तज्ज्ञांचे मार्गदर्शन, आंतरराष्ट्रीय पॅनेल चर्चासत्रे तसेच विविध शैक्षणिक सादरीकरणांचे आयोजन करण्यात येणार आहे. शिक्षण आणि संशोधन क्षेत्रात आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करून २१ व्या शतकातील आव्हानांना सामोरे जाण्यासाठी जागतिक स्तरावरील सहकार्य आणि नव्या कल्पनांची देवाणघेवाण घडवून आणणे, हा या परिषदेचा उद्देश असल्याचे आयोजकांनी सांगितले आहे.

## हिवरखेडा नां. येथे गोवंश मांस जप्त; पोलिसांची धडक कारवाई, संशयित पसार

तभा वृत्तसेवा

कन्नड : दि.२२ मे - कन्नड ग्रामीण पोलिसांनी हिवरखेडा नां. येथे धडक कारवाई करत प्रतिबंधित गोवंश मांस जप्त केले. पोलिसांच्या छाप्याची चाहूल लागताच संशयित इसम घटनास्थळावरून फरार झाला. या कारवाईमुळे परिसरात खळबळ उडाली आहे.

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, शुक्रवार दि.२२ मे रोजी सकाळी ९.३० वाजेच्या सुमारास हिवरखेडा नां. येथील एका भाड्याच्या घरामध्ये गोवंश मांसाची बेकायदेशीर विक्री सुरू असल्याची माहिती कन्नड ग्रामीण पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार पोलिसांनी पंचांसह छापा टाकला असता शेख वसीम शेख गणी (रा. कुंजखेडा, ता. कन्नड) हा पोलिसांना पाहताच पसार झाला. कारवाईदरम्यान पोलिसांनी घटनास्थळावरून सुमारे ५० किलो वजनाचे अंदाजे १५ हजार रुपये किमतीचे प्रतिबंधित गोवंश मांस जप्त केले. यासोबतच लोखंडी तराजू काटा, वजन मापे, मटन कापण्याची सुरी, चाकू, काणस व मांस कापण्यासाठी वापरण्यात येणारा लाकडी कुंदा असा एकूण १६ हजार ३०० रुपयांचा मुद्देमाल ताब्यात घेण्यात आला.

या प्रकरणी पोलीस हेड कॉन्स्टेबल कैलास करवंदे यांच्या फिर्यादीवरून कन्नड ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपीविरुद्ध भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ३२५ तसेच महाराष्ट्र पशु संरक्षण अधिनियम १९७६ अंतर्गत गुन्हा नोंदविण्यात आला असून पुढील तपास सहाय्यक पोलिस निरीक्षक डॉ.रामचंद्र पवार यांच्या मार्गदर्शनाखाली पोहेकॉ एस. बी. बोराडे करीत आहेत.

## विभागीय आयुक्तांकडून मान्सूनपूर्व तयारीचा आढावा

## पूरनियंत्रण, आरोग्य सेवा, वीजपुरवठा व आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा सज्ज ठेवा - विभागीय आयुक्त जी. श्रीकांत

छत्रपती संभाजीनगर : आगामी मान्सूनच्या पार्श्वभूमीवर मराठवाड्यातील सर्व जिल्हा प्रशासनांनी आपत्ती व्यवस्थापन, पूरनियंत्रण, आरोग्य सेवा, वीजपुरवठा आणि नागरी सुविधांबाबत आवश्यक ती पूर्वतयारी पूर्ण करून नागरिकांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य द्यावे, असे निर्देश विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांनी दिले.

विभागीय आयुक्तालयात आयोजित आढावा बैठकीत त्यांनी मराठवाड्यातील जिल्हानिहाय मान्सूनपूर्व तयारीचा सविस्तर आढावा घेतला. महानगरपालिका आयुक्त अमोल येडगे, पोलीस अधीक्षक डॉ.विनयकुमार राठोड, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती मिन्नू पी.एम., कर्नल नंदकिशोर खडसे, अपर आयुक्त रिता मेत्रेवार, अपर जिल्हाधिकारी संभाजी अडकुने , सार्वजनिक बांधकाम विभागाचे मुख्य अभियंता अतुल चव्हाण, प्रभारी सहायक आयुक्त (महसूल) सरिता सुत्रावे, उपायुक्त (पुरवठा) सुधाकर पवार यांच्यासह प्रमुख अधिकारी उपस्थित होते. तसेच बैठकीस विभागातील जिल्हाधिकारी, महानगरपालिका आयुक्त, पोलीस प्रशासन, महावितरण, सार्वजनिक बांधकाम विभाग, जलसंपदा विभाग, आरोग्य विभाग तसेच आपत्ती व्यवस्थापन यंत्रणेचे वरिष्ठ अधिकारी दूरदृश्य प्रणालीद्वारे उपस्थित होते.

शहरी व ग्रामीण भागातील पावसाच्या पाण्याचा निचरा सुरळीत होण्यासाठी नालेसफाईची सर्व कामे वेळेत पूर्ण करावीत. दरवर्षी पाणी साचणाऱ्या ठिकाणांची विशेष पाहणी करून कायमस्वरूपी उपाययोजना करण्याच्या सूचना विभागीय आयुक्तांनी दिल्या.नदीकाठच्या गावांमध्ये सतर्कता वाढविणे, पूरस्थिती निर्माण झाल्यास स्थलांतरासाठी सुरक्षित ठिकाणांची तयारी ठेवणे तसेच बचाव पथकांना सज्ज ठेवण्याच्या सूचना जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आल्या. पूरप्रवण गावांची अद्ययावत यादी तयार ठेवण्याचे निर्देशही यावेळी देण्यात आले.

महानगरपालिका आणि स्थानिक स्वराज्य संस्थांनी जुन्या व धोकादायक इमारतींची पाहणी करून आवश्यक ती कार्यवाही करावी. नागरिकांच्या जीवितास धोका निर्माण होणार नाही, यासाठी तातडीने प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याचे निर्देश देण्यात आले.

## 'कॉस्मो फर्स्ट'चे चौथ्या तिमाहीचे आणि आर्थिक वर्ष २०२५-२६चे निकाल जाहीर

छत्रपती संभाजीनगर : कॉस्मो फर्स्ट लिमिटेड या कंपनीने मार्च २०२६ अखेर संपलेल्या तिमाहीचे आणि आर्थिक वर्षाचे आर्थिक निकाल आज जाहीर केले.

गेल्या वर्षाच्या तुलनेत २०२५-२६ या आर्थिक वर्षाच्या चौथ्या तिमाहीत कंपनीच्या 'एबिटा'मध्ये वाढ झाली. विक्रीच्या प्रमाणात ४१ टक्क्यांनी वाढ, स्पेशालिटी उत्पादनांच्या विक्रीत वाढ, बेस बीओपीपी आणि बीओपीईटी फिल्म्सच्या मार्जिनमध्ये सुधारणा तसेच स्पेशालिटी केमिकल उपकंपनीची चांगली कामगिरी यांमुळे ही एबिटातील वाढ नोंदवली गेली.

## एस्सेल समूहाची १०० वर्षे पूर्ण

छत्रपती संभाजीनगर : बहुआयामी भारतीय व्यावसायिक समूह एस्सेल ग्रुपने गौरवशाली १०० वर्षे पूर्ण करून आपल्या प्रवासातील एक ऐतिहासिक टप्पा गाठला आहे. १९२६ मध्ये आदमपूर नावाच्या एका छोट्या शहरात झालेल्या सुरुवातीपासून ते विविध व्यवसायांमध्ये विस्तारलेल्या बहुआयामी समूहापर्यंत, एस्सेल ग्रुपने जगभरात एक कायमस्वरूपी ठसा उमटवला आहे. विशेष म्हणजे, अनेक व्यवसायांची सुरुवात ही या ग्रुपने केली असून, उद्योगातील अनेक गोष्टींची सुरुवात ही त्यांच्या नावावर आहे. महत्त्वाचे म्हणजे आपली स्टार्ट-अप मानसिकता जोपासत आणि नफ्यावर बारकाईने लक्ष केंद्रित करत, ज्या व्यवसायांनी अपेक्षित मूल्य-वितरणाची पातळी गाठली नाही, असे काही व्यवसाय बंद करण्यास ग्रुपने कधीही मागेपुढे पाहिले नाही.

## जैवविविधतेच्या जतनासाठी आपली वचनबद्धता अधिक दृढ

छत्रपती संभाजीनगर : टोयोटा किर्लोस्कर मोटर (टीकेएम) ने आंतरराष्ट्रीय जैवविविधता दिन २०२६ निमित्त पर्यावरण संवर्धन आणि जैवविविधतेच्या जतनासाठी आपली वचनबद्धता अधिक दृढ केली आहे. टोयोटा एन्व्हायर्नमेंटल चॅलेंज २०५० (टीईसी २०५०) अंतर्गत कंपनीने वृक्षारोपण,जलसंधारण,तलाव पुनरुज्जीवन आणि परिसंस्था पुनर्बांधणीसारखे विविध उपक्रम राबवले आहेत. 'रिस्पेक्ट फॉर द प्लॅनेट' या तत्त्वज्ञानावर आधारित हे उपक्रम कंपनीच्या उत्पादन प्रकल्पांबरोबरच समुदाय स्तरावरही पर्यावरणीय जबाबदारी मजबूत करत आहेत.बिदादी येथील उत्पादन प्रकल्पाला हरित आणि जैवविविधतेने समृद्ध परिसंस्थेमध्ये रूपांतरित करण्यासाठी टीकेएमने 'टोयोटा ग्रीनवेव्ह प्रोजेक्ट' सुरू केला आहे.

## पहा 'दे दे प्यार दे २'चा वर्ल्ड टेलिव्हिजन प्रीमिअर

हास्य, प्रेम आणि कौटुंबिक मनोरंजनाचा धमाल प्रवास अनुभवायला सज्ज व्हा! 'दे दे प्यार दे २'चा वर्ल्ड टेलिव्हिजन प्रीमिअर ह्या रविवारी, २४ मे रोजी दुपारी १२ वाजता झी सिनेमावर होणार आहे. विनोद आणि नाट्याचा आणखी मसाला घेऊन आलेल्या या सीक्वेलमध्ये, आई-वडिलांची संमती मिळवण्यासाठी नायक-नायिकांनी केलेला हलकाफुलका आणि मजेशीर प्रयत्न दाखवण्यात आला आहे. प्रेम आणि कुटुंब यांच्या अपेक्षा जुळवताना अनेक विनोदी आणि अनपेक्षित प्रसंग घडत जातात. कॉमेडी, रोमांस आणि कौटुंबिक भावनांचा सुरेख मेळ असलेला हा चित्रपट घरबसल्या संपूर्ण कुटुंबासह पाहण्याची ही एक उत्तम आणि न चुकवण्यासारखी संधी आहे.

## जंजाळा किल्ल्यावर संशयित अतिक्रमण; पुरावे व कागदपत्रांच्या आधारे हिंदुत्ववादी संघटनांची अतिक्रमण हटवण्याची मागणी ; तहसीलदार यांना दिले निवेदन

तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.२२ मे : सोयगाव परिसरातील ऐतिहासिक वारसा स्थळ असलेल्या जंजाळा किल्ला (वसई किल्ला)परिसरात संशयास्पद पद्धतीने कायमस्वरूपी बांधकाम उभारण्यात आल्याच्या पार्श्वभूमीवर विविध हिंदुत्ववादी व सामाजिक संघटनांनी अभ्यासपूर्ण पद्धतीने पुरावे,कागदपत्रे आणि पूर्वीच्या तक्रारींच्या आधारे प्रशासनाकडे तातडीने अतिक्रमण हटवण्याची मागणी केली आहे.

या आंदोलनात हिंदू जागरण मंच,विश्व हिंदू परिषद, शिवप्रतिष्ठान हिंदुस्थान,बजरंग दल तसेच इतर हिंदुत्ववादी व सामाजिक संघटनांनी पुढाकार घेत संबंधित प्रकरणाची गंभीर दखल घेतली आहे.



संघटनांच्या म्हणण्यानुसार,संबंधित ठिकाणी पूर्वी लहान स्वरूपाचे थडगे/ चिन्ह होते; मात्र मागील काही काळात त्या ठिकाणी आरसीसी स्वरूपाचे कायमस्वरूपी बांधकाम उभारण्यात आलेले दिसून येत आहे.तसेच त्या ठिकाणी "सय्यद अहमद कबीर कादरी"नावाचा फलक दिसून येत असल्याने संबंधित जागेवर कायमस्वरूपी ताबा प्रस्थापित करण्याचा प्रयत्न होत असल्याची शंका व्यक्त करण्यात आली आहे.

विशेष म्हणजे,हा विषय अचानक उपस्थित करण्यात आलेला नसून यापूर्वीही दि.३१ जानेवारी २०२५ रोजी गड-किल्ल्यांवरील अतिक्रमणासंदर्भात तहसील प्रशासनाकडे अधिकृत लेखी निवेदन सादर करण्यात आले होते. त्यानंतरही परिस्थितीत बदल न झाल्याने संघटनांनी पुढील पुरावे संकलित करून हा मुद्दा अधिकृतरित्या पुढे आणला आहे.तसेच स्थळाची पाहणी,उपलब्ध पुरावे,छायाचित्रे आणि कागदपत्रांचा अभ्यास करून पुरातत्व विभागाकडे अधिकृत निवेदन सादर करण्यात आले असून संबंधित बांधकामास कोणती अधिकृत परवानगी देण्यात आली आहे का,याबाबत स्पष्टीकरण मागविण्यात आले आहे.

हिंदू जागरण मंचाचे हर्षल हिंदू यांनी सांगितले की,"हा विषय कोणत्याही भावनिक प्रतिक्रिया किंवा अफवांवर आधारित नाही.आम्ही स्थळाची प्रत्यक्ष पाहणी,पूर्वीचे पत्रव्यवहार,उपलब्ध पुरावे आणि कागदपत्रांचा अभ्यास करूनच ही मागणी करत आहोत.जंजाळा किल्ला हा आपल्या ऐतिहासिक अस्मितेचा विषय आहे.प्रशासनाने तातडीने वस्तुस्थिती जनतेसमोर आणावी आणि बेकायदेशीरता आढळल्यास तात्काळ कारवाई करावी. अन्यथा सर्व हिंदुत्ववादी व सामाजिक संघटना लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन उभारतील."

संघटनांनी स्पष्ट भूमिका घेत सांगितले की,जंजाळा किल्ला हा ऐतिहासिक व सांस्कृतिक वारसा असून अशा प्रकारच्या कायमस्वरूपी बांधकामामुळे भविष्यात अधिक अतिक्रमणांना प्रोत्साहन मिळू शकते.त्यामुळे प्रशासनाने तातडीने हस्तक्षेप करून योग्य ती कारवाई करावी. असे निवेदन नायब तहसीलदार संभाजी देशमुख यांना देण्यात आले.यावेळी हिंदू जागरण मंचाचे हर्षल हिंदू,विश्व हिंदू परिषदचे सागर इंगळे,बजरंग दलचे निलेश नागपुरे,शिवप्रतिष्ठान हिंदुस्थानचे जसवंतसिंह राजपूत तसेच विविध हिंदुत्ववादी व सामाजिक संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते.

## जिल्ह्यात पेट्रोल-डिझेलचा पुरवठा सुरळीत; शांतता व संयम राखा- जिल्हाधिकारी

छत्रपती संभाजीनगर : गेल्या काही दिवसापासून जिल्ह्यातील विविध पेट्रोल पंपांवर इंधन खरेदीसाठी नागरिकांनी विनाकारण गर्दी (Panic Buying) केल्याचे प्रशासनाच्या निदर्शनास आले आहे. सोशल मीडियावरील काही चुकीच्या संदेशांमुळे नागरिकांमध्ये इंधन टंचाईबाबत संभ्रम निर्माण झाला आहे. जिल्ह्यात पेट्रोल डिझेलचा पुरवठा सुरळीत असून नागरिकांनी शांतता व संयम राखावा,असे आवाहन जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांनी केले आहे.

यासंदर्भात आज जिल्हा पुरवठा शाखेने दिलेली माहिती याप्रमाणे-

जिल्ह्यात ३०% अतिरिक्त इंधन पुरवठा सुरु

जिल्ह्यात पेट्रोल आणि डिझेलचा कोणताही तुटवडा नाही. नागरिकांची गैरसोय होऊ नये म्हणून जिल्ह्यातील तेल कंपन्यांच्या डेपोमधून सर्व पेट्रोल पंपांवर नियमित मागणीपेक्षा ३० टक्क्यांनहून अधिक अतिरिक्त पुरवठा उपलब्ध करून देण्यात आला आहे. इंधनाचा साठा मुबलक प्रमाणात उपलब्ध असून पुरवठा साखळी पूर्णपणे सुरक्षित आहे.

सोशल मीडियावरील अफवांवर विश्वास ठेवू नका

सोशल मीडिया (व्हॉट्सअ‍ॅप, फेसबुक इ.) वर इंधन टंचाई किंवा वाहतूक बंद असल्याबाबतचे जे मेसेज फिरत आहेत, ते अपूर्ण माहितीवर आधारित, तसेच चुकीचे आणि दिशाभूल करणारे आहेत. नागरिकांनी अशा कोणत्याही अफवांना बळी पडू नये, तसेच असे संदेश फॉरवर्ड करू नयेत.

विनाकारण साठा करू नका, पंपांवर गर्दी टाळा

नागरिकांनी भीतीपोटी गाड्यांच्या टाक्या फुल करणे किंवा कॅन/ डब्यांमध्ये इंधनाचा साठा करणे पूर्णपणे थांबवावे. एकाच वेळी सर्वांनी पंपांवर गर्दी केल्याने शहरातील मुख्य रस्त्यांवर वाहतुकीचा खोळंबा होत असून, कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होत आहे. या गर्दीमुळे रुग्णवाहिका आणि इतर अत्यावश्यक सेवांच्या वाहनांना अडथळा निर्माण होऊ शकतो, याचे भान सर्वांनी ठेवावे.

**जिल्हाधिकाऱ्यांचे आवाहन** | "जिल्ह्यात इंधनाचा पुरवठा पूर्णपणे सुरळीत आणि मुबलक आहे. नागरिकांनी अजिबात घाबरून न जाता संयम ठेवावा आणि शांतता राखावी. केवळ गरजेपुरतेच इंधन खरेदी करावे, विनाकारण साठा करू नये. सोशल मीडियावरून चुकीची माहिती किंवा अफवा पसरवणाऱ्यांवर प्रशासन सायबर कायद्यांतर्गत कायदेशीर कारवाई करेल.",असे आवाहन जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांनी केले आहे.

## निवडणुकीसाठी प्रशासन सज्ज- अपर जिल्हाधिकारी अडकुणे

छत्रपती संभाजीनगर :औरंगाबाद- जालना स्थानिक प्राधिकारी विधान परिषद द्विवार्षिक निवडणूकीचा कार्यक्रम जाहीर झाला असून गुरुवार दि.१८ जून रोजी मतदान होणार आहे. निवडणुकीसाठी प्रशासनाची तयारी करण्यात येत असून प्रशासन सज्ज आहे,अशी माहिती अपर जिल्हाधिकारी संभाजीराव अडकुणे यांनी आज पत्रकार परिषदेत दिली. औरंगाबाद- जालना स्थानिक प्राधिकारी विधानपरिषद द्विवार्षिक निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर झाला असून यासंदर्भात माहिती देण्यासाठी आज जिल्हाप्रशासनाने पत्रकार परिषदेचे आयोजन केले होते.